म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# एकटक्का विरुद्ध ९९ टक्के



## प्रॅक्टीकल सोशॅलिझम-भाग २

नीलकंठ खाडिलकर

संपादक, 'नवाकाळ'

REFBK-0024659

- प्रॅक्टीकल सोशॅलिझम व सद्यस्थिती
- डॉ. आंबेडकरांना नेमके काय हवे होते ?
- गौतम बुद्धाने आम्हाला काय शिकविले ?

अप्रभ गुप्त
६६५
१७६५८
महाराष्ट्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

9 OCT 1991

29 JUN 1994

(क्र. मा. पद्दा)
५०००—३—८४

६६५
७२६५८

नीलकंठ खाडिलकर
संपादक, ' नवाकाळ '

# एक टक्का विरुद्ध ९९ टक्के

REFBK-0024659

' संबोधि ' प्रकाशन
गोरेगाव, मुंबई ४०० १०४.

# एक टक्का विरुद्ध ९९ टक्के
# [EK TAKKA VIRUDDHA 99 TAKKE]

प्रकाशन क्रमांक ६

आवृत्ती पहिली

१ जून १९८५

प्रकाशक

**जगदीश रा. मोरे**

'सबोधि' प्रकाशन, १७/५२६, शास्त्रीनगर
गोरेगाव [पश्चिम], मुंबई ४०००१४.

मुद्रक :

आर. व्ही देवनाळकर
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भुपेश गुप्ता भुवन, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© नीलकंठ खाडीलकर
संपादक 'नवाकाळ'
'नवाकाळ' बिल्डिंग, खाडिलकर मार्ग,
गिरगाव, मुंबई ४०० ००४

मुखपृष्ठ :

चित्रकार दत्ता टाककर

**मूल्य पंधरा रुपये**

# एक टक्का
# विरुद्ध
# ९९ टक्के

# अनुक्रमणिका

मनोगत

## प्रॅक्टीकल सोशॅलिझम आणि सद्यःस्थिती

१. लोकशाही समाजवादाचे कासव १
२. लोकशाहीतून भांडवलशाही ५
३. भांडवलशाहीतून भ्रष्टाचार ११
४. काळ्या पैशाची प्रचंड वाढ १५
५. लोकशाही नाही ! समाजवाद नाही ! १९
६. प्रथम समाजवाद ! त्यासमवेत लोकशाही ! २४
७. नव्याण्णव टक्के लोकांच्या लढ्याचा कार्यक्रम ३२
८. कार्यक्रम हाच ' हिरो ' असला पाहिजे ३७
९. टीकाकारांच्या शंकाचे निरसन ४१

## डॉ. आंबेडकरांना नेमके काय हवे होते ?

१०. ब्राह्मणांची रोजगार हमी ५२
११. पोकळ विचारवंताची जन्मकथा ५६
१२. दडवते बुद्धिमंत आणि गडवते बुद्धिमंत ६१
१३. विसंगतींच्या जीवनाविरुद्ध डरकाळी ६५
१४. स्टेटस् अॅण्ड मायनॉरिटीज ७०
१५. पंडित नेहरूंचे महत्त्वाचे पत्र ७४
१६. समाजवादी लोकशाही ८१
१७. हीच वेळ आहे ८७

## गौतम बुद्धाने आम्हाला नेमके काय शिकविले ?


१८. परिवर्तनशील बुद्ध धम्म ९४
१९. नास्तिक नसलेला मज्झिपद धम्म ९९
२० बुद्धाचा विधायक उपदेश १०३
२१. तृष्णा हेच मूळ आहे १०८
२२ गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स ११२
२३ कार्ल मार्क्सची चार आर्यसत्ये ११८
२४. बुद्ध धम्माचे परिवर्तन १२१
२५. विज्ञानाची मशाल १२५

# मनोगत

'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' ही विचारसरणी १९८३ सालच्या उत्तरार्धात दैनिक 'नवाकाळ'मधून लोकासमोर सादर केली प्रथम आठ अग्रलेख (रविवार १७ जुलै ते रविवार २४ जुलै १९८३) लिहिले त्यानतर पाच प्रदीर्घ अग्रलेखातून (रविवार २८ ऑगस्ट ते १ सप्टेंबर १९७८) 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'ची विचारधारा कार्यक्रमासकट माडण्यात आली सदर पाच अग्रलेख दैनिक 'नवशक्ति'मधूनही सपादक पु रा बेहरे याच्या सौजन्याने लेखांच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले होते लोकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला

धुळयाच्या 'स्वतत्र भारत'ने पुस्तकातील विविध प्रकरणे छापलीच, पण त्यावर सपादक प्रा सदाशिवराव माळी यानी अग्रलेख-मालाही लिहिली त्यातून जे विचारमथन सुरू झाले त्यात अनेक मान्यवरही सामील झाले त्याचा लाभ घेऊन आणि आपल्याला जे सांगावयाचे आहे ते सुस्पष्ट व्हावे या दृष्टीने लेखनात काही सुधारणा करून 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' हे पुस्तक ७ नोव्हेंबर १९८३ रोजी प्रसिद्ध झाले या पुस्तकाला अशी लोकप्रियता मिळाली की, अवघ्या सव्वादोन महिन्यांनी १५ जानेवारी १९८४ रोजी पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली

दरम्यान ऑक्टोबर १९८३ मध्ये दसऱ्याच्या दिवशी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवाजीपार्कवरील भव्य मेळाव्यात 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'चा पुकारा केला त्याच दिवशी शिवसेना प्रमुखाच्या स्वत च्या लेखासह 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'चे पांच प्रदीर्घ अग्रलेख छापलेल्या एक लाख खास अंकांची विक्री झटपट झाली

विख्यात विचारवत पा वा गाडगीळ याचे "प्रॅक्टीकल सोशॅलिझम"-वरील दोन लेख 'लोकमत' आणि 'धमाल'च्या दिवाळी अकांत प्रसिद्ध झाले भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे एक प्रमुख पुढारी कॉ ए बी बर्धन याची प्रॅक्टीकल सोशॅलिझमवरील समीक्षा फेब्रुवारी १९८४ मध्ये मराठी आणि इग्रजी अशा दोन्ही भाषात पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली कॉ बर्धन याचे टीका-लेख त्यापूर्वी १४ जानेवारी ते ३ फेब्रुवारीच्या 'नवाकाळ'च्या अकात प्रसिद्ध झाले होते

४ जानेवारी १९८४ रोजी एक महत्त्वाची घटना घडली डॉ बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत माझे 'डॉ आंबेडकर आणि प्रॅक्टीकल सोशॅलिझम' या विषयावर मुबई मराठी पत्रकार सघाच्या आझाद मैदानावरील सभागृहात भाषण झाले एकच गर्दी उसळली होती 'स्टेटस ॲन्ड मायनॉरिटीज' ही घटना १९४६ साली डॉ बाबासाहेबानी घटना समितीला सादर करण्या-साठी तयार केली होती त्यातील "प्रथम घटनेद्वारे अपरिवर्तनीय स्वरूपात

समाजवाद आणि त्यासमवेत संसदीय लोकशाही" ही त्यांची संकल्पना मी भाषणात विस्ताराने मांडली डॉ बाबासाहेबांची सदर संकल्पना विचारातसुद्धा न घेता लोकशाही समाजवादाचा मार्ग भारताने स्वीकारला परिणामी, लोकशाहीतून भांडवलशाही, मांडवलशाहीतून भ्रष्टाचार, भ्रष्टाचारातून बडे मांडवलदार–सत्ताधारी–नोकरशहा यांची हातमिळवणी आणि त्यातून स्मगलर–गुंडांसह या लुटारू टोळ्यांचा हैदोस माजत गेला एक टक्का लोकांची हुकूमशाही आणि ९९ टक्के लोकांची हलाखी अशी दुर्दैवी स्थिती ओढवली

जर ९९ टक्के लोकांची ससेहोलपट थांबवून त्यांचा विकास करावयाचा असेल तर काय केले पाहिजे ? लोकशाही समाजवाद डोक्यावर उभा आहे त्याला उलटे फिरवून पायावर उभे केले पाहिजे —म्हणजेच 'प्रथम समाजवाद व त्यासमवेत संसदीय लोकशाही' अमलात आणण्यासाठी ९९ टक्के लोकांनी एकवटले पाहिजे, असा त्या व्याख्यानाचा मथितार्थ होता सदर व्याख्यानाचा प्रदीर्घ वृत्तांत ८ जानेवारी १९८४ रोजी 'नवाकाळ'मध्ये दिला

या व्याख्यानाने फार खळबळ झालीच, पण 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फरट'ची स्थापना झाली व्याख्यान ऐकण्यासाठी समाचे पोस्टर पाहून आलेले व सभागृहाबाहेरच्या गर्दीत असलेले दलित पँथरचे एक प्रभावी नेते भाई संगारे विस्मयचकित झाले कारण डॉ आंबेडकरांचे 'स्टेटस अॅन्ड मायनॉरिटीज'-मधील विचारधन तोपर्यंत कुणीच इतक्या खुलासेवार आणि सुसंगत स्वरूपात लोकांसमोर मांडले नव्हते मी जी मांडणी केली तिच्या अचूकपणाबद्दल भाई संगारे यांनी खात्री करून घेतली आणि 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फरट' स्थापन करण्याचा स्वयस्फूर्त निर्णय घेतला हा निर्णय सांगण्यासाठी व्याख्यानानंतर काही दिवसांनी भाई संगारे मला भेटले ही त्यांची व माझी पहिलीच भेट होती 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फरट' आपण स्थापन करीत आहोत असा निर्णय त्यांनी सांगून टाकला त्यानुसार २६ मार्च १९८४ रोजी भाई संगारे यांनी रविंद्र बागडे यांच्यासह 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फरट' स्थापन झाल्याची एका पत्रकाद्वारे घोषणा केली ती २७ मार्चच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली

प्रॅक्टीकल सोशॅलिझमच्या अनुषंगाने सतत वाचन-मनन-चर्चा आणि जाहीर सभा सुरू असतानाच डॉ आंबेडकरांचे विचार, गौतम बुद्धांची शिकवणूक आणि प्रॅक्टीकल सोशॅलिझम यावर तीन लेखमाला कसोशीने तयारी करून 'नवाकाळ'मधून लिहिल्या त्यातूनच सदर पुस्तक आकाराला आले आहे या तीन लेखमालांमधे वैचारिक सुसूत्रता आहे 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'वरील हे दुसरे पुस्तकही वाचकांच्या स्वागताला पात्र ठरेल अशी आशा आहे.

– **नीलकंठ खाडिलकर**

संपादक, 'नवाकाळ'

: १ :

# लोकशाही समाजवादाचे कासव

भारताचा स्वातंत्र्यानंतरचा इतिहास म्हणजे लोकशाहीचे रुपांतर भांडवलशाहीत आणि समाजवादाचे रुपांतर माजवादात करणारा इतिहास आहे

ब्रिटीशांनी भारतावर दीडशे वर्षे राज्य केले १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला, पण भारतीय नेतृत्वावर ब्रिटीश विचारसरणीचा वरचष्मा चालूच राहिला ब्रिटनमध्ये विसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात 'फेबियन सोशॅलिझम'ची फॅशन होती जॉर्ज बर्नार्ड शॉ (१८५६ ते १९५०) आणि सिडने वेब (१८५९ ते १९४७) हे फेबियन सोशॅलिझमचे नेते होते १९२० साली सिडने वेब आणि त्यांच्या पत्नी बिएट्रीस वेब यांनी ग्रेट ब्रिटनच्या समाजवादी घटनेची रुपरेषाही पुस्तकरुपाने सादर केली भारतीय नेतृत्वावर या फेबियन सोशॅलिझमची फार छाप पडली

पंडित नेहरुंचा जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्याशी पत्रव्यवहारही चालायचा पंडित नेहरुंनी शॉ यांना लिहिलेले ४ सप्टेंबर १९४८ या दिनांकाचे पत्र पहा पंडित नेहरु म्हणतात—"माझ्या पिढीतील अनेकांप्रमाणेच मी तुमच्या लेखनाच्या आणि ग्रंथांच्या संगतीतच वाढलो मला वाटते की, माझ्या व्यक्तिमत्वाचा एक भाग तुमच्या विचारांनी घडविला अनेक भारतीय तुम्हाला तुमची भारतीय प्रश्नावरील मते विचारून भंडावून सोडतात याबद्दल मी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे" (पान ५१६–ए बंच ऑफ ओल्ड लेटर्स) फेबियन सोशॅलिझमची छाप भारतीय नेतृत्वावर किती पडली होती त्याचा हा पुरावा पुरेसा आहे

## हप्त्याहप्त्याने समाजवाद

फेबियन सोशॅलिझम म्हणजे काय? फेबिअस मॅक्झीमस या नांवाचा एक रोमन सेनापती होता. हॅनीबालशी त्याने समोरासमोर निकाली झुंज न देता लढाई लांबवित नेली. पुरवठ्याचे मार्ग तोडायचे आणि लहान-मोठ्या चकमकी करायच्या असे विलंब लावणारे तंत्र वापरून त्याने हॅनीबालला हैराण केले. यावरून 'फेबियन सोशॅलिझम' हे नाव आले, कारण हप्त्याहप्त्याने आणि उत्क्रांतीच्या पद्धतीने लोकशाहीतून समाजवादाची निर्मिती करावयाची असा हा विचार होता.

क्रांतीचा पुकारा करणारा कार्ल मार्क्स १८८३ साली मरण पावला आणि हप्त्याहप्त्याने समाजवादाचे उद्दिष्ट सांगणाऱ्या फेबियन सोसायटीची १८८४ मध्ये स्थापना झाली. कार्ल मार्क्सने लंडनमध्ये तीस वर्षे ब्रिटीश म्युझियमच्या लायब्ररीत अभ्यास केला. दारिद्र्याचे सर्व चटके सहन केले. ब्रिटीश वृत्तपत्रे व नियतकालिके मार्क्सचे लेख छापण्यास सपशेल नकार देत होती आणि मार्क्सला त्याशिवाय उत्पन्नाचे साधन नव्हते. त्याने एका रेल्वे कंपनीकडे कारकुनाच्या जागेसाठी अर्ज केला, पण अक्षर वाईट म्हणून त्याचा अर्ज फेटाळण्यात आला. भाडे भरले नाही म्हणून त्याचे सारे सामान खोलीबाहेर काढून रस्त्यावर फेकण्यात आले आणि त्याची पत्नी जेनी आपल्या चार मुलांसह थंडीत कुडकुडत कार्ल मार्क्सची वाट पहात बसली! त्याच्या मृत्यूनंतर जी फेबियन सोसायटी स्थापन झाली तीही मार्क्सची क्रांतिकारक विचारसरणी फेकून देण्यासाठीच जणू काही जन्माला आली होती. या विचाराचे सर्व नेते खाऊनपिऊन सुखी समृद्ध होते आणि त्यांना मार्क्सवादी ताणाव तसेच संघर्ष नको होता. भांडवलशाही संपूर्णपणे उलथणारी कामगार-वर्गाची रक्तरंजित क्रांती त्यांना नामंजूर होती. म्हणूनच लोकशाहीतून हप्त्याहप्त्याने समाजवादाची त्यांनी घोषणा केली. 'सोशॅलिझम विदाऊट टीअर्स'—डोळ्यात अश्रुसुद्धा न येता समाजवादाचे मोहक स्वप्न त्यांनी रंगविले.

विख्यात विचारवंत आणि समाजवादी नेते अशोक मेहता यांनी फेबियन विचारसरणीचे फार सुंदर वर्णन केले आहे. ते म्हणतात—"फेबियन सोशॅलिझम म्हणजे कासव आहे! हळूहळू पण सतत चालत राहून आपण मार्क्सवादी सशाला मागे टाकू असा त्याला विश्वास वाटतो. एकेक सुधारणा करायची हप्त्याहप्त्याने, पायरीपायरीने वाटचाल करायची. सामाजिक परिवर्तन अटळ आहे, पण अगदी मंदगतीनेच होणार आहे यावर फेबियन सोशॅलिझमचा विश्वास आहे. उदाहरणार्थ, सिडने वेब आणि त्याची पत्नी बिएट्रीस वेब यांना

क्रांतीच्या मार्गाने एकदम समाज परिवर्तन घडवू पहाणाऱ्याबद्दल बिलकूल सहानुभूती नव्हती।" (डेमोक्रॅटिक सोशॅलिझम—अशोक मेहता—पान ३०-३१)

## इंच इंच लढवू

चीनने भारतावर १९६२ साली हल्ला केला तेव्हा भारताला युद्ध-साहित्याचा तुटवडा पडला, पण कवितांचा सुकाळ झाला त्या सुकाळात लोकशाही समाजवादी कवि वसंत बापट यांची एक कविता फार ऐकू यायची—

उत्तुंग आमुची उत्तर सीमा
इंच इंच लढवू
अभिमान धरू—बलिदान करू
ध्वज उंच उंच चढवू

"फेबियन सोशॅलिझम' म्हणजे 'इंच इंच लढवू' म्हणणारा सोशॅलिझम! त्याचीच छाप भारतीय नेतृत्वावर होती आणि त्यामुळे 'लोकशाही समाजवाद' ही ब्रिटनमधील फेबियन सोशॅलिझमची एक आवृत्ती संसदीय लोकशाहीसह भारताने स्वातंत्र्यानंतर स्वीकारली

घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना 'इंच इंच सोशॅलिझम' मुळीच मान्य नव्हता त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंना आग्रहपूर्वक सांगितले की, "आपण समाजवादाची प्रस्थापना घटनेद्वारेच अपरिवर्तनीय स्वरूपात करू या आणि त्यासमवेत संसदीय लोकशाहीचा स्वीकार योग्य होईल जर आर्थिक समता निर्माण केली नाही, तर लोकशाही निरर्थक होईल" तथापि, डॉ आंबेडकरांचा विचार घटना समितीने सपशेल फेटाळलाच, पण पंडित नेहरूंनीही क्रांतिकारक बदल घडविण्यास नकार दिला परिणामी लोकशाही समाजवादाचे कासवच भारताला लाभले इंचाइंचाने समाजवादाच्या उभारणीचा मार्ग स्वीकारण्यात आला

चिनी आक्रमणाच्या वेळी 'इंच इंच लढवू' चे काय झाले? चीनने आपल्याला हवा तेवढा भारताचा प्रदेश बळकावला आणि आजतागायत त्यापैकी एक इंचही भूमी आपण परत मिळविली नाही दरम्यानच्या काळात चीनची लष्करी ताकद अफाट वाढली असून एक हजार अणुबॉम्ब तसेच अणुबॉम्बवाहक क्षेपणास्त्रे, विमाने, पाणबुड्या यासह चीन जबरदस्त सामर्थ्यवान झाला आहे चीनच्या ताब्यातील इंचभर भूमीही परत घेण्याचे कुणी नांवच काढीत नाही

तेच 'इंच इंच समाजवादा'चे म्हणजे लोकशाही समाजवादाचे झाले

आहे। मक्तेदार भांडवलशाही इतकी प्रचंड वाढली आहे की, समाजवादाचे फक्त नावच उरले।

तसेच घडणार होते। कारण फेबियन सोशॅलिझममध्ये किंवा लोकशाही समाजवादात आमच्या मते मूलभूतच दोष आहे. अशोक मेहता म्हणतात की, क्रांतिकारक मार्क्सवादाच्या यशाला यथावकाश मागे टाकणारे हे कासव आहे। तथापि, ही स्पर्धा क्रांतिकारक मार्क्सवादाशी नसते. समाजवाद आणि मार्क्सवाद यांच्यातील ही स्पर्धा आहे असे मानणे हा मूलभूत प्रमाद आहे. समाजवाद आणि भांडवलशाही यांचीच तीव्र स्पर्धा असते. लोकशाहीचा अमाप फायदा भांडवलशाहीलाच होतो. भांडवलशाहीचा ससा हा नफ्याच्या प्रेरणेने, पैशाकडे पैसा जातो या नियमाने आणि प्रत्येक माणसाला त्याची किंमत देऊन विकत घेता येते या तत्त्वाने सतत वेगात धावतच रहातो आणि समाजवादी कासव त्याला कधीच गाठू शकत नाही। भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या सदतीस वर्षांत भांडवलदारी सशाने इतका पल्ला गाठला आहे की, समाजवादी कासवाला आता आशाच वाटत नाही। लोकशाही समाजवादाचे रुपांतर भांडवलशाहीत आणि समाजवादाचे रुपांतर भाजवादात अपरिहार्यपणे झाले आहे, तर समाजवादी पक्षाची नामनिशाणीही उरली नसून समाजवादी पक्षाचे अर्धशतकी श्राद्ध समारंभ गेल्याच वर्षी १९८४ साली 'ना खंत ना खेद' अशा प्रकारे पार पडले।

: २ :

# लोकशाहीतून भांडवलशाही

संसदीय लोकशाहीतून हळूहळू समाजवाद प्रस्थापित करण्याचा मार्ग भारताने स्वीकारला आणि त्यासाठी १९५१ साली पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. नियोजनाच्या मार्गाने स्वातंत्र्यानंतर भारताची आर्थिक प्रगती झाली हे आंधळासुद्धा मान्य करील. पण या प्रगतीमुळे जे अगोदरच लठ्ठ होते ते अधिकच गलेलठ्ठ झाले आणि जे हाडकुळे होते त्यांचा हाडांचा सांपळा झाला. जे श्रीमंत होते ते अधिक श्रीमंत झाले आणि जे गरीब होते ते अधिक गरीब झाले. असे का झाले?

त्याचे कारण छत्रपती शाहू महाराजांनी सर्वात सोपेपणाने सिद्ध केले. एक मजबूत घोडा होता आणि दुसरा मरतुकडा होता. शाहूमहाराजांनी चंदा टाकला आणि दोन्ही घोड्यांना सोडले. मजबूत घोड्याने चंदा फस्त केला आणि मरतुकडा घोडा मात्र उपाशी राहिला.

तथापि, नामवंत नेते आणि विचारवंत मात्र चकित झाले की हजारो कोटी रुपयांचा खर्च नियोजनाद्वारे करूनही गरिबी अधिकाधिक भेसूर का होत आहे? भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचवार्षिक योजनांचा, औद्योगिकरणाचा आणि विज्ञानाच्या विकासाचा पाया घातला. दोन पंचवार्षिक योजना पार पडल्यानंतर एक दिवस त्यांनी जाहीर भाषणात आश्चर्य व्यक्त केले की, "राष्ट्राची एकूण संपत्ती वाढत आहे, पण ती जात आहे कुठे? गरीब तर अधिक गरीब होत आहेत" पंडितजींनी या गुपिताचा शोध लावण्यासाठी "महालनोबिस कमिटी" १९६० साली

नेमली शाहू महाराजांनी दोन घोड्यासमोर चंदा टाकून जे सिद्ध केले तेच विख्यात अर्थशास्त्रज्ञ महालनोबिस यांनी आंकडेवारीच्या अभ्यासाने चार वर्षांत शोधून काढले आणि आपला अहवाल १९६४ साली सादर केला की, पैशाकडे पैसा गेला आणि विकासाच्या वाटचालीतून निर्माण होणारी वाढती महागाई गरिबाकडे गेली!

मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक एम एल दांतवाला हे नामवंत अर्थशास्त्रज्ञ त्याना १९६९ साली पद्मविभूषण ही पदवी देण्यात आली प्रा दातवाला आपल्या 'पॉव्हर्टी इन इंडिया' या ग्रथात म्हणतात—"स्वातंत्र्य मिळाल्यानतर आम्हाला सर्वांनाच असे वाटत होते की, आर्थिक नियोजनातून आपण हप्त्याहप्त्याने दारिद्र्य व पिळवणूक याचे उच्चाटन करू पण या तीन पचवार्षिक योजनांनतर असे दिसते की, एकूण राष्ट्रीय सपत्ती वाढली असली तरी गरिबी जशीच्या तशी आहे किंबहुना गरिबीची तीव्रता अधिकच झाली आहे!" म्हणजे केवळ पतप्रधानच चकीत झाले नाहीत तर प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्राध्यापकही चक्रावून गेले!

राष्ट्रीय सपत्तीत जी वाढ होते ती जाते कुठे? याचा शोध गेल्या चोवीस वर्षांत अनेक विचारवत आणि अर्थशास्त्रज्ञ घेत आहेत डॉ आर के हजारी याचा अहवाल १९६६ मध्ये सादर होताच ससदेत खळबळ माजली आणि १९६७ मध्ये दत्त कमिटी औद्योगिक परवान्याबाबत चौकशीसाठी नेमण्यात आली या कमिटीने जुलै १९६९ मध्ये अहवाल सादर केला आणि बड्या मांडवलदार घराण्यानी औद्योगिक परवाने कसे लाटले त्यावर प्रकाश टाकला अशा अनेकांचे सशोधन सादर झाले मक्तेदारांची मालमत्ता अफाट वाढतच राहिली आणि कमिट्या नेमून शोध चालूच राहिला गेल्याच वर्षी केंद्रीय मत्री ना वसंतराव साठे यानी 'टूवर्डस सोशल रेव्होल्यूशन' हा ग्रथ सादर केला त्यात ते म्हणतात—"नियोजनातून निर्माण होणारी सपत्ती जाते कुठे याचा शोध पंडित नेहरूनी नेमलेल्या महालनोबिस कमिटीपासून आजतागायत सुरू आहे विकासाची फळे फार थोड्या लोकांच्या हाती पडली आहेत प्रचड जनसमुदायाला विकासाचा लाभ झाला नाहीच, पण विकासाच्या सधीही त्यांना मिळत नाहीत"

अशी शोधाशोध करण्याची काहीही जरुरी नव्हती मक्तेदार मांडवलशाहीने हा सर्व विकास आपल्या थैलीत टाकला आहे आणि त्याची थैली अनेकपट फुगत आहे ही उघड गोष्ट आहे ती सर्वांना माहीत आहे १९५१ साली बिर्लांची उद्योगधद्यांतील मालमत्ता ५१ कोटी १४ लाख होती १९८२ साली ही मालमत्ता २००४ कोटी ७४ लाख रुपयावर गेली अशी माहिती

लोकसभेत २८ फेब्रुवारी १९८४ रोजी देण्यात आली मालमत्तेची अशीच बेफाम वाढ मक्तेदार ८१ औद्योगिक घराण्याची झाली १९७० साली अमलात आलेल्या मोनोपोलीज ॲण्ड रिस्ट्रीक्टीव्ह ट्रेड प्रॅक्टीसीस कायद्याखाली या ८१ औद्योगिक घराण्यांची नोंद झाली आणि तरीही त्यांची तुफानी भरभराट सुरूच राहिली त्यातील पन्नास औद्योगिक घराण्यांची १९८२ मधील अधिकृत मालमत्ता पहा कोटी रुपयात सर्व आकडे आहेत

| मक्तेदार घराणी | मालमत्ता कोटी रुपये १९७६ मधील | मालमत्ता कोटी रु. १९८२ मधील |
|---|---|---|
| टाटा | ९८०.७७ | २४३१ |
| बिर्ला | ९७४ ६३ | २००५ |
| जे के सिंघानिया | २४१ २३ | ६२० |
| मफतलाल | २५६ ५४ | ६११ |
| रिलायन्स टेक्स्टाईल | ३० २७ | ५१२ |
| ए सी सी | १६०.२१ | ४७३ |
| थापर | २०२ २४ | ४६५ |
| आय सी आय | १९८ ९९ | ३७८ |
| साराभाई | ११६ ७३ | ३७४ |
| मोदी | ११७ ७९ | ३५९ |
| किर्लोस्कर | १५२.४७ | ३३७ |
| बांगुर | १९५ ३३ | ३३७ |
| बजाज | १०१ ५१ | ३३४ |
| श्री राम | १७१ ७० | ३३३ |
| लारसन ॲण्ड टुब्रो | १४७ ७४ | ३२३ |
| अशोक लेलॅन्ड | ६१ ५१ | २९३ |
| हिंदुस्थान लिव्हर | १२२ ५१ | २८७ |
| टी व्ही एस अय्यगार | १०५.७८ | २८३ |
| वालचंद | १२९ ४२ | २७० |
| महिंद्र ॲन्ड महिंद्र | १२६ ०६ | २६० |
| आय टी सी. | १०५.०८ | २३९ |
| डनलॉप | ९९ १० | २१९ |
| सिंदिया | १७७.०८ | २०८ |
| खटाव | १००.२२ | १९९ |
| चौगुले | ८०.१५ | १९२ |

| मक्तेदार घराणी | मालमत्ता कोटी रुपये १९७६ मधील | मालमत्ता कोटी रु. १९८२ मधील |
|---|---|---|
| कस्तुरभाई लालभाई | १०९ ६३ | १९० |
| भिवंडीवाला | १६६ ४३ | १८६ |
| सिम्पसन | ७० ५६ | १६७ |
| एस्कॉर्टस | ६४ ५४ | १६७ |
| युनायटेड ब्रुअरीज | ५२ ९२ | १६६ |
| फिलिप्स | ५७ ०२ | १४९ |
| जी के डब्ल्यू | ७४ ६२ | १३७ |
| गोदरेज | ६५ १७ | १३४ |
| अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी | — | १३२ |
| नायडू जी व्ही | ६९ ७३ | १३२ |
| व्ही रामकृष्ण | ३८ ७७ | १२९ |
| युनियन कार्बाईड | ७१ ३१ | १२७ |
| गरवारे | — | १२३ |
| मॅकनेल अँन्ड मॅगर | ११३ ३५ | ११५ |
| इ टी डी पॅरी | ९१ ११ | ११४ |
| ओबेरॉय (एम एस) | ४७.२९ | १११ |
| रौनाग सिंग | ४४ ४३ | १०८ |
| मेटल बॉक्स | ३८ ६२ | १०६ |
| साळगांवकर | ७१ १९ | १०४ |
| नौरोजी वाडिया | ५९ ६४ | १०३ |
| ब्रुकबॉन्ड | ६५ ६७ | १०२ |
| व्ही एस डेम्पो | ६७ ८८ | १०२ |
| गोएंका के पी. | ३४.९२ | ९६ |
| श्री अंबिका | ४५ २६ | ९० |
| कमानी | ५० ३८ | ८९ |
| एकूण | एकूण ६७२१ ९० | १५,५२१ |

म्हणजे अवघ्या ५० औद्योगिक घराण्यांची मालमत्ता १९८२ साली १५,५२१ कोटी रु होती भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांची मालमत्ता १५,००० कोटी रुपयांनी वाढली तेव्हा नियोजनाने जी संपत्ती वाढली ती गेली कुठे याचा खास शोध घेण्याची काही आवश्यकता आहे काय ? असे

असताही मार्च १९८५ मध्ये भारत सरकारने जो अर्थसंकल्प जाहीर केला त्यात मक्तेदारी नियंत्रण कायदा २० कोटी रुपयाऐवजी १०० कोटी रुपये किमान मालमत्ता असणाऱ्याना लागू होईल अशी खास उदार सवलत जाहीर केली !

२५ मार्च १९८५ रोजी राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय उद्योग खात्याचे राज्य मंत्री अरीफ मोहमद खान यांनी टाटा व बिर्ला यांच्यातील संपत्तीची विदारक स्पर्धाच सादर केली ती अशी—(आकडेवारी कोटी रुपयात)

| | टाटा मालमत्ता | बिर्ला मालमत्ता | टाटा उलाढाल | बिर्ला उलाढाल |
|---|---|---|---|---|
| १९८० | १५३८ ९७ | १४३१ ९९ | १९४२ ९० | १८५४ २० |
| १९८२ | १८४० १६ | १६९१ ६९ | २३८९ ७७ | २१६१ ५५ |
| १९८२ | २४३० ८३ | २००४ ७४ | २८८३ १५ | २३७८ ९९ |
| १९८३ | २६७२ ४० | २८३० ९४ | ३०६९ ३८ | २७६५ ०४ |

तरीही शोध चालूच रहाणार आहे ! कारण मक्तेदार औद्योगिक घराण्याच्या कंपन्या समाजाने ताब्यात घेतल्या पाहिजेत हा उघड तोडगा सरकारला नको आहे आणि जोपर्यंत हा तोडगा नको आहे तोपर्यंत वारंवार शोध घेण्याखेरीज दुसरा कोणता मार्ग आहे ? शोध घेतल्यानंतर भोंगळ सोडवणूक सांगण्याखेरीज दुसरा कोणता उपाय आहे ? म्हणून आपणास असे दिसते की, भोंगळ विचारवंतांचे, अर्थशास्त्रज्ञांचे, विद्वानांचे आणि नेत्याचे उदंड पीक आले आहे त्याची दोन उदाहरणे पाहू या

केंद्रीय मंत्री ना वसंतराव साठे म्हणतात—

"राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी नि शस्त्र दरिद्री लोकांचे सैन्य प्रचंड ताकदीच्या ब्रिटिश सत्तेशी लढण्याकरिता महात्मा गांधींनी उभे केले ! मग दारिद्र्यापासून मुक्ततेसाठी हाच चमत्कार का घडवू नये ? त्यासाठी सर्व जनतेनेच पुढे आले पाहिजे ही गोष्ट खरी की, नेता हवा, पण नेत्यांच्या बाबतीत भारत भाग्यशाली असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे नेते आपल्यालाही लाभले आहेत पूर्वी जवाहरलाल नेहरू, नंतर इंदिरा गांधी ! उणीव एवढीच आहे की, बुद्धिमंतात इच्छा नाही आणि आत्मविश्वास नाही !"

दारिद्र्यावरचा हा उपाय पाहिलात ? १) तमाम दरिद्री लोकांनी एकजूट करावयाची २) त्यानी भांडवलशाहीविरुद्ध किंवा सरकारविरुद्ध लढावयाचे नाही पंतप्रधानालाच नेता मानायचे आणि ३) स्वत च स्वत च्या दारिद्र्याविरुद्ध लढायचे ! यापेक्षा अधिक भोंगळपणाचा उपाय जगात कुणी सांगितला आहे का ? जर ना वसंतराव साठे यांच्या पुस्तकाची नवी आवृत्ती निघाली तर या उपायात त्यांना आणखी चार शब्दाची भर टाकावी लागेल

ते चार शब्द म्हणजे--पूर्वी जवाहरलाल नेहरू, नंतर इंदिरा गांधी "आणि आता राजीव गांधी!"

भोंगळपणाचे दुसरे उदाहरण आपण पाहू या मोनोपोलीज इन्क्वायरी कमिशन नेमण्यात आले आणि त्याने १९६४ साली जी शिफारस केली तिचा मतितार्थ असा होता--"मालमत्तेची मक्तेदारी ही मूलत च अनिष्ट नाही फक्त या मक्तेदारीचा गैरवापर होता कामा नये त्यासाठी आपण मक्तेदारी भांडवलशाहीवर डोळ्यात तेल घालून नजर ठेवली पाहिजे आणि सामाजिक हिताला धक्का पोचला तर तत्काळ नियंत्रण केले पाहिजे!"

आता डोळ्यात तेल घालून कोट्यावधी रुपयांच्या संपत्तीवर नजर ठेवता येते काय? तशी नजर ठेवणाऱ्याना दोस्त बनविण्याकरिताच भांडवलशाहीने काळा पैसा निर्माण केला!

म. ठाँ. ग्रं. संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

: ३ :

# भांडवलशाहीतून भ्रष्टाचार

भारतात लोकशाहीतून मक्तेदार भांडवलशाही सतत फोफावत गेली याचे पहिले कारण असे की, नियोजनाचा फायदा तेच घेऊ शकत होते कारखाने उभारण्यासाठी भांडवल लागते कारखान्याच्या पूर्व तयारीसाठी तज्ज्ञ माणसे लागतात बँका, विमा कंपन्या, सार्वजनिक पतपुरवठा संस्था यांच्याकडून कर्ज मिळविण्यासाठी पत आणि तारण आवश्यक असतात सरकारी योजनांची व सवलतींची सांगोपांग माहिती असणारा आणि वेळच्या वेळी सुव्यवस्थित अर्ज करणारा सराईत कर्मचारीवर्ग हवा असतो अशी ही सर्व सामुग्री बड्या भांडवलदाराकडे जय्यत तयार होतीच

दुसरे कारण त्याहीपेक्षा महत्त्वाचे आहे बड्या भांडवलदारांच्या कारखानदारीमुळे त्यांना काळा पैसा अमाप निर्माण करता येत होता यंत्रात लुब्रिकेटींग ऑईल म्हणजेच वंगण टाकल्यावर चाके सफाईदार फिरतात त्याचप्रमाणे बड्या भांडवलदारांच्या काळ्या पैशाच्या वंगणाने सरकार दरबारची चक्रे झटपट फिरत होती काळा पैसा हे मक्तेदार भांडवलशाहीचे मोहिनी अस्त्र होते आणि त्या हुकमी अस्त्रासमोर जवळ जवळ कुणाचाच निभाव लागत नव्हता बड्या भांडवलदारांची औद्योगिक मालमत्ता स्वातंत्र्यानंतरच्या सदतीस वर्षांत चाळीस पटीने वाढली त्याचे इंगित हेच आहे.

आता या कारणाचा पुरावा सादर करू या

१) मक्तेदारी चौकशी आयोगाने (मोनोपोलीज इन्क्वायरी कमिशन अहवाल, १९६४) म्हटले आहे "औद्योगिक परवान्याची पद्धत अशा रीतीने

हाताळली गेली की, काही थोड्या बड्या मांडवलदार घराण्यांना परवान्यांचा भरमसाट वाटा मिळाला त्यांच्या ताब्यात अनेक कंपन्या होत्या आणि एकाच परवान्यासाठी ते अनेक कंपन्यांतर्फे वेगवेगळे अर्ज दाखल करीत असत तसेच या भांडवलदार घराण्यांना परवाना पद्धतीचे 'मेकॅनिझम' आणि 'विकनेसीस' (कमकुवत दुवे) उमजले होते !''

पूर्वीच्या काळी स्त्री नवऱ्याचे नाव उखाण्यात घेत असे त्याप्रमाणे मक्तेदारी चौकशी आयोगाने, 'मेकॅनिझम' आणि 'विकनेसीस' या शब्दांच्या उखाण्यात काळ्या पैशाचा वापर सूचित केला आहे

## 'स्पीड मनी' आणि 'हश मनी'

२) २ मार्च १९७० रोजी न्यायमूर्ती के एन वांछू यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध 'वांछू कमिटी' नेमण्यात आली करचुकवेपणाचा शोध घेण्यासाठी ही कमिटी होती या कमिटीने म्हटले आहे की, ''काळा पैसा सरकारी खात्यात दोन प्रकारांनी प्रभाव पाडतो 'स्पीड मनी' म्हणजे लायसेन्सीस आणि परमिट झटपट मिळविण्याकरिता वापरला जातो तो पैसा दुसरा 'हश मनी' म्हणजे नियमभंगाबाबत गप्प बसण्याकरिता दिला जातो तो पैसा यामुळे नियोजनपूर्वक औद्योगिकरणासाठी जी लायसेन्सीसची पद्धती अमलात आणली तीच धोक्यात आली'' (अहवालाचा परिच्छेद १९ वा—प्रकरण दुसरे)

ज्यांना लायसेन्सीस आणि परमिटे भरमसाट आणि झटपट मिळाली ती बडी भांडवलदार घराणीच आहेत अर्थात या घराण्यांनीच काळ्या पैशाची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली

३) औद्योगिक परवाने कसे व कुणाला दिले जातात याची चौकशी आर के हजारी यांनी केली, त्याचप्रमाणे दत्त कमिटीने केली दत्त कमिटीचा १९६९ चा अहवाल जबरदस्त धक्कादायक आहे कमिटीने म्हटले आहे—''आर्थिक मक्तेदारीविरोधी धोरण १९४८ सालापासून भारत सरकारने वारंवार जाहीर केले पण आम्हाला असे दिसले की, लायसेन्सीस देणाऱ्या अधिकारीवर्गाला मक्तेदारीविरोधी धोरणाच्या सूचनाच मिळालेल्या नव्हत्या ! १९६५ मध्ये मक्तेदारी चौकशी आयोगाचा अहवाल आला आणि महालनोबिस कमिटीचा अहवालही आला होता प्रत्येक बड्या औद्योगिक घराण्यांच्या कंपन्यांची यादी लायसेन्सीस देणाऱ्या अधिकारीवर्गाला यानंतर मिळाली ! पण तरीही त्यांच्या बाबतीत कोणते धोरण आहे त्याच्या स्पष्ट सूचना दिल्या नाहीतच !'' (पान १८३) दत्त कमिटी अहवालाने सिद्ध झाले की, सत्ताधारी-नोकरशाही आणि बडी भांडवलदार घराणी यांच्यात 'घनिष्ट संबंध' असून त्यामुळे समाजवादी घोषणांची व नियमांची कुचेष्टाच झाली होती !

## घनःश्याम नयनी आला

४) जी डी बिर्ला म्हणून ओळखले जाणारे घनश्यामजी बिर्ला हे बिर्ला साम्राज्याचे सस्थापक १९५१ साली भारतात पहिली पचवार्षिक योजना सुरू झाली तेव्हा बिर्ला उद्योगधद्याची मालमत्ता ५१ कोटी रुपये होती हीच मालमत्ता १९८२ साली २००५ कोटी रुपये झाली! अवघ्या तीस वर्षांत अधिकृत मालमत्ता १९०० कोटी रुपयानी वाढली ती कशी ? १९८३ साली बिर्लांची मालमत्ता २८४० कोटी होऊन त्यानी टाटाना मागे टाकून पहिला क्रमाक मिळविला त्याचे तत्र कोणते ?

ॲल्युमिनियमचे प्रकल्प सरकारी क्षेत्रातच उभारावयाचे असे १९५६ च्या औद्योगिक धोरण प्रस्तावात स्पष्ट म्हटले होते त्यानुसार सरकारी क्षेत्रात ॲल्युमिनियम प्रकल्प उभारण्यासाठी नॅशनल इडस्ट्रीयल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन (एनआयडीसी) स्थापन करण्यात आले कॉर्पोरेशनने ॲल्युमिनियम प्रकल्पाच्या उभारणीसाठी २५ नोव्हेंबर १९५७ रोजी आपला अहवालही सादर केला

पण भारताचे तेव्हाचे अर्थमत्री टी टी कृष्णम्माचारी या अहवालासाठी थाबले नव्हते एक दिवस त्याच्या नयनी 'घनश्याम' आला! म्हणजे त्याना घनश्यामजी बिर्लांची आठवण झाली! याबाबत स्वत घनश्यामजी बिर्लाच म्हणतात—"एका सकाळीच अर्थमत्री टी टी कृष्णम्माचारी मला भेटायला आले मला म्हणाले की, असे पहा जी डी, आम्हाला आणखी ॲल्युमिनियम हवे आहे! तुम्ही रिहाण्ड, मिर्झापूर येथे ॲल्युमिनियमचा कारखाना उभारा"

यानतर बिर्लांचा सुप्रसिद्ध हिंडाल्को (हिंदुस्थान ॲल्युमिनियम कॉर्पोरेशन) हा उद्योग प्रस्थापित झाला जी डी बिर्लांचा कारखाना सरकारी धोरणांना हरताळ फासून स्थापन झालाच, पण त्यासाठी अनेक सवलती देण्यात आल्या परकी चलनाची मुभा यथेच्छ देण्यात आली भाडवल पुरवठा करण्यात आला त्यांना एक-तृतीयाश दरात वीजपुरवठा सुरू झाला आज भारतातील निम्मे ॲल्युमिनियम उत्पादन हिंडाल्कोचे आहे

औद्योगिक परवान्याच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या दत्त कमिटीने १९६९ साली सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे—"बिर्लांना ॲल्युमिनियम प्रकल्प स्थापन करण्यास मजुरी द्यायची हा निर्णय बिर्लांनी अर्ज करण्यापूर्वीच झाला होता!"

५) सर्वांत भयानक पुरावा १९८५ च्या प्रारभीच जगासमोर आला एस माणिकलाल इडस्ट्रीजचा नवी दिल्लीतील रिजनल मॅनेजर कूमर नारायण याने पतप्रधानाच्या सचिवालयातील तसेच सरक्षण खात्यातील व अर्थखात्या-

तील बड्या अधिकाऱ्याना खरेदी केले होते। माणेकलाल इडस्ट्रीजसाठी सर्व सोयी-सवलती मिळविल्या त्याच वेळी देशाची सर्वोच्च गुपिते या बड्या अधिकाऱ्याकडून खरेदी करून विदेशाना विकली आणि त्याच्या मोबदल्यात माणेकलाल इडस्ट्रीजसाठी विदेशाकडूनही अफाट व्यापारधदा मिळविला कूमर नारायणने कबुलीजबाबात सागितले की, "मी गेली २५ वर्षे हेरगिरीचेही काम केले। त्यामुळे माणेकलाल इडस्ट्रीजचा कोटयवधी रुपयाचा लाभ झाला आणि मला लाखो रुपये मिळाले।" म्हणजे भाडवलशाहीवर 'नजर ठेवणाऱ्यांचे' काय झाले ते पाहा। त्याना बड्या भाडवलदाराच्या काळ्या पैशाने देश-हिताचा लिलावही करण्यास प्रवृत्त केले।

या सर्व विवेचनावरून स्पष्ट दिसून येते की, राष्ट्रीय सपत्तीची वाढ गिळकृत करणारी मक्तेदार भांडवलशाही रोखण्याची तीव्र इच्छाशक्ती कोणत्याच पातळीवर नव्हती त्याचवेळी जनताजनार्दनाच्या डोळ्यात भोंगळ घोषणाबाजीची आणि शोध कमिटयाची धूळ फेकण्यात येत होती लहान मुलाने लपायचे व मुलगा कुठे लपला आहे ते माहीत असतानाही कौतुकाने आईवडिलांनी त्याला शोधत फिरायचे असा लटका खेळ चालतो ना? तसाच हा खेळ पुढीलप्रमाणे चालविण्यात आला —

१) नियोजनाने जी राष्ट्रीय सपत्ती वाढली ती गेली कुठे याचा शोध प्रथम सुरू झाला त्यासाठी एकामागून एक कमिटया नेमल्या बड्या भाडवलदाराकडे सपत्ती गेली असा शोध दर वेळी लागला, पण कमिटया नेमून शोध चालूच राहिला

२) बड्या भाडवलदाराचेच साम्राज्य का वाढले त्याचा शोध सुरू झाला काळ्या पैशाचा वापर हे प्रमुख कारण असून त्यामुळे सत्ताधारी–नोकरशहा–बडे भाडवलदार याची 'दोस्ती' घनिष्ट झाल्याचे अप्रत्यक्षपणे मान्य केले

३) अर्थात काळ्या पैशाचा शोध जारीने सुरू झाला तो आहे किती, येतो कुठून, जातो कुठे आणि थाबवायचा कसा याचा शोध अद्याप सुरू आहे

या सर्व विडबनातील किस्सा म्हणजे अमेरिकेत महात्मा गाधीवर भाषणे करून परतलेले एके काळचे समाजवादी नेते प्रा राम जोशी याचे डिसेंबर १९८४ मधील भाषण पहा ते म्हणाले, "गेली पन्नास वर्षे आपण समाजवादी आंदोलन केले, पण ते सारे गेले कुठे? आपण त्याचा शोध केला पाहिजे।"

भारत सरकार या नव्या शोधासाठी 'जोशी कमिटी' केव्हा नेमणार?

: ४ :

# काळ्या पैशाची प्रचंड वाढ

लोकशाहीतून मांडवलशाही आणि मांडवलशाहीतून भ्रष्टाचार याची अतोनात वेगाने वाढ झाली किंबहुना मांडवलशाहीने भ्रष्टाचार वाढविला आणि भ्रष्टाचाराने मांडवलशाही वाढविली। त्यातून काळा पैसा जिकडे तिकडे पसरत गेला न्यायमूर्ती वांछू यांच्या कमिटीने म्हटले आहे की, काळा पैसा हा कॅन्सर आहे आणि कॅन्सरसारखा वाढत आहे कमलनयन काब्रा आपल्या 'ब्लॅक इकॉनॉमी' या १९८२ च्या ग्रंथात म्हणतात की, काळा पैसा एखाद्या हिंस्र जनावरासारखा भयकर झाला आहे

काळा पैसा आहे तरी किती? याचाही शोध गेली तीस वर्षे सुरू आहे प्रोफेसर निकोलस काल्डर यानी १९५३-५४ साली पहिली पहाणी केली न्यायमूर्ती वांछू कमिटीचा अहवाल डिसेंबर १९७१ मध्ये प्रसिद्ध झाला पूनम गुप्ता व सजीव गुप्ता या तज्ज्ञानी १९८१-८२ साली आपल्या पहाणीचे निष्कर्ष प्रसिद्ध केले याखेरीज अनेकानी लेख लिहिले, पुस्तिका छापल्या मांडवलशाहीची पालखी वहाणारे प्राप्तीकर तज्ज्ञ नानी पालखीवाला यानी अदाज सांगितला की, दर तासाला दीड कोटी रुपये या वेगाने काळा पैसा दरसाल तेरा हजार एकशे कोटी रुपये निर्माण होतो!

पण सर्वात महत्त्वाचे पाऊल १९८३ साली जूनमध्ये टाकण्यात आले 'इन्स्टिटयूट ऑफ पब्लीक फायनान्स अँण्ड पॉलिसी' या नामवत सस्थेवर काळ्या पैशाचा शोध घेण्याची कामगिरी सोपविण्यात आली २७ ऑगस्ट १९८४ रोजी राज्यसभेत तेव्हाचे राज्य अर्थमंत्री एस एम कृष्णा यानी

सांगितले की, इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक फायनान्सचा अहवाल ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये लोकांसमोर येईल पण शेवटी १९८४ मध्ये हा अहवाल प्रसिद्ध झालाच नाही कारण तो अत्यंत खळबळजनक होता

काळ्या पैशाचा हिशोब पुढीलप्रमाणे आहे खुद्द केंद्रीय मंत्री ना वसंतराव साठे यांनीही काळ्या पैशाची हीच आंकडेवारी आपल्या ग्रंथासाठी स्वीकारली आहे (पृष्ठ ८४)

| आर्थिक वर्ष | काळा पैसा कोटी रु | राष्ट्रीय उत्पन्नाच्या किती टक्के? |
|---|---|---|
| १९७२–७३ | १५,१९५ | ३२ टक्के |
| १९७३–७४ | १५,८९५ | २७ " |
| १९७४–७५ | १४,५१८ | २१ " |
| १९७५–७६ | १८,४५८ | २५ " |
| १९७६–७७ | ३०,०१४ | ३९ " |
| १९७७–७८ | ३४,३३५ | ३९ " |
| १९७८–७९ | ४६,८६७ | ४९ " |
| १९८१–८२ | ६०,००० | ५० " |

१९७२ ते १९८२ या दहा वर्षांत काळा पैसा चौपट झाला याच काळात पाच बड्या भांडवलदार घराण्यांची मालमत्तासुद्धा जवळजवळ चौपटच झाली आहे असे पुढील अधिकृत कोष्टकावरून दिसून येते सर्व आंकडे कोटी रुपयांत आहेत

| सन | १९७२ | ७६ | ८० | ८२ |
|---|---|---|---|---|
| टाटा | ६४२ | ९८१ | १५३९ | २४३१ |
| बिर्ला | ५९० | ९७५ | १४२२ | २००५ |
| सिंघानिया | १२१ | २४१ | ४१३ | ६२० |
| मफतलाल | १८४ | २४६ | ४२७ | ६११ |
| थापर | १३६ | २०२ | ३४८ | ४६५ |
| | १६७३ | २६४५ | ४१५९ | ६१३२ |

यावरून असे स्पष्ट दिसते की, एमआरटीपी (मक्तेदारी नियंत्रण) कायद्याखाली ज्या बड्या ८१ भांडवलदार घराण्यांची नोंद आहे तेच भारतातील प्रचंड काळ्या पैशाचे प्रमुख आणि आद्य जनक आहेत! त्यांची भांडवलशाही आणि देशातील भ्रष्टाचारी काळा पैसा सारख्याच प्रमाणात आणि भरमसाट प्रमाणात वाढत आहेत! बड्या भांडवलशाहीने अफाट काळा पैसा निर्माण केला आणि त्या काळ्या पैशाने या देशातील सत्ताधारी-नोकरशाही-राजकीय

नेते याना खरेदी केल्यामुळेच त्यांची मालमत्ता चौपट होऊ शकली. या तुफानी घोडदौडीने त्यांनी "लोकशाहीची भांडवलशाही" करून टाकली सुखासीन बुद्धिमंतांना आणि विचारवंताना आपल्या कळपात लठ्ठ पगार देऊन ओढले. वृत्तपत्र व्यवसाय आपल्या मालकीत घेऊन पवित्र वृत्तपत्र स्वातंत्र्य हे 'शेठजींचे स्वातंत्र्य' मक्तेदारीतून बनविले. शेठजींनी ठेवलेले संपादक हे सतत खाजगी भांडवलशाहीची 'कार्यक्षमता' वर्णन करीत, काळ्या पैशाबद्दल शासकीय नियंत्रणांना दोष देऊ लागले आणि भांडवलशाही अनिर्बंध मोकाट सोडावी असा उलटा उपाय सांगू लागले.

## स्वतःचे १४७ कोटी आणि तुमचे २७,००० कोटी रुपये

आता या निष्कर्षांचे आणखी पुरावे पाहू या

१) स्वराज्य पॉल या विदेशात राहणाऱ्या भारतीय भांडवलदाराने भारतीय भांडवलशाहीचे नग्न स्वरूप १९ ऑगस्ट १९८२ रोजी प्रेस क्लब ऑफ इंडिया येथे मुलाखत देताना उघड केले. एक बडा भांडवलदारच उभा ठाकल्याने त्याने भांडवलशाहीचे नेमके वर्म आणि मर्म दाखवून दिले.

स्वराज्य पॉल म्हणाले, "भारतातील अकरा भांडवलदाराचा ज्या उद्योगधंद्यांवर ताबा आहे त्या अकरा भांडवलदाराची स्वतःची गुंतवणूक फक्त १४८ कोटी रुपये आहे आणि सार्वजनिक संस्थांची म्हणजेच जनतेच्या पैशाची गुंतवणूक २७,००० कोटी रुपये आहे. तसेच त्यांनी या उद्योगधंद्या-तून स्वतःची व्यक्तिगत कमाई केलेले २५,००० कोटी परदेशी बँकात ठेवले आहेत."

म्हणजे स्वदेशात चैन करायला आणि सत्ताधारी राजकीय नेते व सरकारी अधिकारी यांना आपल्या खिशात टाकायला काळा पैसा वापरून त्यानंतरही एवढी रक्कम परदेशी बँकात नेऊन ठेवली. शिवाय असा धंदा सार्वजनिक पैसा म्हणजेच जनतेचा पैसा वापरूनच केला!

२) स्वराज्य पॉल याचा हिशोब अचूक आहे असेच जणू जाहीर करणारी एक बातमी ऑक्टोबर १९८३ मध्ये सर्व वृत्तपत्रात झळकली. कमानी औद्योगिक घराण्याचा क्रमांक बड्या भांडवलदार घराण्यांत पन्नासावा लागतो. त्यांची मालमत्ता ९० कोटी, पण याच घराण्यातील एक हसमुख कमानी २,००० कोटी रुपयांचे परकी चलन (४०० कोटी स्वीस फ्रँक) घेऊन पळाले! कुटुंबातील इतर कमानी मुंबईतच आहेत. त्यांच्यावर धाड पडून रसिक आर. कमानी यांना अटक झाली. पण दुसऱ्या दिवशी त्यांची एक लाखाच्या जामिनावर सुटका झाली. कारण बंगलोरहून एक वकील विमानाने

आला आणि त्याने कमानीसाहेबांना हृदयविकार झाल्याचे सर्टीफिकीट कोर्टात दाखल करताच कमानीसाहेब जामिनावर मोकळे झाले !

३) ४६ लाख ६३ हजार रुपयांचे डॉलर हाँगकाँगला पाठविण्यासाठी अंबिका मिल्सचे संचालक सुरेंद्रा जयकिशन यांनी दोघा सहाय्यकाकडे दिले १९ मार्च १९८५ रोजी त्यांना मुंबईच्या सहार विमानतळावर निरोप देऊन जयकिशन अहमदाबादचे विमान पकडण्यासाठी निघून गेले तिघांनाही अटक झाली ही रक्कम हाँगकाँगच्या बँकेत ठेऊन नंतर अमेरिकेला पाठविणार होते असे प्राथमिक चौकशीत दिसून आले (इंडियन एक्सप्रेस, पान १, २१ मार्च १९८५)

या उदाहरणावरून पुनश्च स्पष्ट होते की, भारतात आज जो प्रचंड काळा पैसा खेळत आहे आणि त्याची समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे तो काळा पैसा मुख्यत बड्या ८१ भांडवलदार घराण्यांनीच निर्माण केला काळ्या पैशाचे इतरही काही उगम आहेत स्मगलिंग व अन्य बेकायदा धंदे काळा पैसा निर्माण करतात पण ते या भांडवलदार घराण्यांपुढे नगण्य आहेत किंबहुना या घराण्यानी निर्माण केलेल्या काळ्या पैशातूनच आणि त्यानी पसरविलेल्या भ्रष्टाचारातूनच भारतातील स्मगलर-बिल्डर-बडे घाऊक व्यापारी यांचे काळ्या पैशाचे उद्योग फैलावले बडी भांडवलशाही हीच भ्रष्टाचाराची गंगोत्री आहे

## जॉर्ज फर्नांडिस म्हणाले–

जनता पक्षाच्या राजवटीत समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस भारताचे उद्योगमंत्री होते तेव्हा ते म्हणाले होते की, "माझ्या खात्याच्या फाईलीत असा एकही कागद नाही की, ज्याची प्रत बिर्लांच्या फाईलीत नाही !"

दुसऱ्या एका भल्या मंत्र्याने हीच भीषण वास्तवता आम्हाला फार मर्मभेदी वर्णन करून सांगितली तो म्हणाला, "माझ्या खात्यातील नोकरशाही हे माझे सैन्य आहे मी त्याचा सेनापती आहे पण मी अशा सैन्याचा सेनापती आहे की, माझ्या सैन्याचा पगार बडे भांडवलदार देतात ! !"

काळ्या पैशाच्या सिमेंटने बांधलेली बड्या भांडवलशाहीची गगनचुंबी इमारत आपण पाहिली यानंतर गरिबीचे अक्राळविक्राळ दर्शन आपण घेऊ या अशा या परिस्थितीत 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम' शिवाय या देशाला अन्य मार्गच नाही याबाबत तुमची खात्री पटेल.

: ५ :

# लोकशाही नाही ! समाजवाद नाही !!

भारतात स्वातंत्र्यानंतर ३७ वर्षांनीही अफाट जनसमुदाय भयानक दारिद्र्यात खितपत आहे नॅशनल सॅम्पल सर्व्हे आणि सहाव्या योजनेसाठी नेमलेला 'टास्क फोर्स' यांच्या पहाणीचे निष्कर्ष पाहिले तर दगडालाही पाझर फुटेल

(१) १९८१–८२ साली २५ कोटी २० लाख लोकांना दोन वेळचे किमान आवश्यक जेवणही मिळत नव्हते वस्त्र-निवारा आदि जीवनावश्यक गरजांचा प्रश्नच नव्हता ज्या २५ कोटी २० लाख लोकांना दोन वेळचे पुरेसे जेवणही घेता येत नाही (पृष्ठ १०१–टुवर्डस सोशल रेव्होल्युशन-लेखक केंद्रीय मंत्री ना वसंतराव साठे) त्यांचा दरमहा खर्च ० पासून ४३ रुपयांपर्यंतचा आहे १९४७ सालच्या रुपयाची किंमत आज फक्त १२ पैसे आहे आणि या हिशेबाने ४३ रुपयांची किंमत ५ रुपये १६ पैसे होते म्हणजे २५ कोटी २० लाख लोकांचा रोजचा खर्च १९४७ सालच्या किंमतीच्या पातळीनुसार जास्तीत जास्त १७ पैसे म्हणजे तीन आणे किंवा त्याहून कमी आहे !

(२) किमान अत्यावश्यक गरजांसाठी जितके उत्पन्न लागते त्या उत्पन्नाला दारिद्र्य रेषा म्हणतात १९८१ साली भारताची लोकसंख्या ६९ कोटी होती त्यापैकी ६० कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली होते

(३) भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताची एकूण लोकसंख्या ३४ कोटी होती भारतीय स्वातंत्र्याचा ३४ वा वर्धापन दिन साजरा झाला

तेव्हा लोकसंख्येत ३५ कोटी लोकांची भर पडली होती आणि ६९ कोटी लोकसंख्येपैकी ६० कोटी लोक दारिद्र्यात जीव तगवित होते

(४) बेकाराची संख्या सतत वाढत गेली आज सहा कोटी युवक रोजगाराच्या शोधात आहेत

दारिद्र्याच्या दशावताराचे हे दर्शन नुसते दुर्दैवी नाही त्यात क्रूरपणा आणि हिंस्रपणाही आहे कारण एका बाजूला साठ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली असतानाच दुसऱ्या बाजूला साठ हजार कोटी रु काळा पैसा खेळत आहे। एका बाजूला २५ कोटी लोकांना उपासमार सहन करावी लागत असतानाच, दुसऱ्या बाजूला फक्त ११ औद्योगिक घराण्यांनी २५,००० कोटी रुपये विदेशी बँकात स्वतःच्या नावे नेऊन ठेवले।

## जीव मुठीत धरून जगावे लागते

भारतातील दारिद्र्य भयावह आणि क्रूर आहेच, पण ६० कोटी गरीब लोक कमालीचे असहाय झाले आहेत उपासमार आहेच, शिवाय सर्वत्र स्मगलरांच्या, लुटारूंच्या किंवा गुंडांच्या टोळ्यांचा सुळसुळाट झाल्यामुळे दरिद्री लोकांना जीव मुठीत धरून लाचारीने वावरावे लागत आहे सकाळी कामावर गेलेला माणूस सध्याकाळी धड हातापायांनी परत आला तर आनंद मानावा अशी आज काही ठिकाणी दुस्थिती ओढवत आहे सत्ताधारी – नोकरशहा – पोलीस यांच्या खिशात गुंडांच्या याद्या आहेत, कारण हप्ते गोळा करायचे असतात तेव्हा प्रत्येकाचा पत्ता हवाच। परिणामी या टोळ्यांविरुद्ध तक्रार करण्यास कुणीही धजावत नाही आणि त्यांचे राजरोस बेकायदा धंदे लोकांना मुकाट्याने पहावे लागतात दहशतवादाचा हा जिथे तिथे मिळणारा पुरावा आहे

लोकशाहीतून भांडवलशाही, भांडवलशाहीतून भ्रष्टाचार, भ्रष्टाचारातून भांडवलदार-नोकरशाही-सत्ताधारी यांची धनिक हुकूमशाही, या हुकूमशाहीतून लुटारू टोळ्यांचा हैदोस अशी ही वाटचाल अटळपणे झाली आहे सत्ताधाऱ्यांना निवडणूक लढवायची असते आणि निवडणूक लढविण्यासाठी त्यांच्या हातात तीन एक्के असतात धनिकांचा पैसा, जात-धर्म आणि स्मगलर गुंडांच्या टोळ्या! यामुळे धनिक-जात्यंध-समाजकंटक यांना अभय मिळालेले आहे आणि त्यांच्या टोळ्यांच्या दहशतवादात गरीब सामान्य माणसे केवळ उपाशीच नव्हे तर भयभीत लाचार अवस्थेत जगत असतात

जास्तीत जास्त एक टक्का लोकांची आज जी लयलूट चालली आहे ती कशातून निर्माण झाली?

१९५१ साली भारतात पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली तेव्हापासून १९७९ सालापर्यंत पाच पंचवार्षिक योजना तसेच १९६६–६९ या

काळातील तीन वार्षिक योजना पार पडल्या भारत सरकार आणि राज्य सरकारे यानी १९५१ ते १९७९ या काळात जनतेच्या उद्धाराकरिता किती खर्च केला ते पहा--

| योजना | काळ | खर्च कोटी रु |
|---|---|---|
| पहिली | ५१–५६ | १,९६० |
| दुसरी | ५६–६१ | ४,६७२ |
| तिसरी | ६१–६६ | ८,५७७ |
| तीन वार्षिक योजना | ६६ ते ६९ | ६,६२५ |
| चौथी | ६९ ते ७४ | १५,७७९ |
| पाचवी | ७४ ते ७९ | ३९,४२६ |
| | | एकूण ७७,०३९ |

सरकारच्या या अफाट खर्चाचा गरिबाना जरी फायदा झाला नाही तरी त्याच वेळी त्याना विकास योजनाचा तापच सहन करावा लागला विकास योजनामुळे महागाई निर्माण झाली आणि या महागाईने गरीब वर्ग भाजून निघाला महागाई किती वाढली ? तर १९६० साली एक रुपयात जितक्या वस्तू विकत घेता येत होत्या तितक्या वस्तू विकत घेण्यासाठी आज सहा रुपये लागतात ! म्हणजे रुपयाची खरेदीशक्ती सतत घटत गेली आणि चरकातून ऊस पिळून निघावा तसा गरीब वर्ग महागाईतून पिळून निघाला त्याचे कोष्टक पहा

| **वर्ष** | **एक रुपयाची खरेदीची शक्ती** |
|---|---|
| १९६० | १०० पैसे |
| १९६५ | ७३ पैसे |
| १९७० | ५४ पैसे |
| १९७५ | ३१ पैसे |
| १९८१ | ३० पैसे |
| १९८३ (नोव्हेंबर) | १८ पैसे |
| १९८४ | १७ पैसे |

जर या कोष्टकाची सुरुवात १९४७ पासून केली तर तेव्हाच्या रुपयाची किमत आज बारा पैसे आहे असे राज्यसभेत २३ जानेवारी १९८५ रोजी सरकारतर्फे मान्य करण्यात आले.

या कोष्टकात मूलभूत अर्थशास्त्र लपले आहे कोणत्याही देशाच्या औद्योगिकरणासाठी भांडवलाची उभारणी करावी लागते भारतात हे भांडवल कुठून आले? भांडवलदाराकडून नव्हे, कारण वाढत्या किंमतींचा आणि योजनांवरील खर्चाचा प्रचंड लाभ भांडवलदारानाच झाला सार्वजनिक अर्थपुरवठा संस्थाच्या पैशावरच त्यांनी उद्योगधंद्याची उभारणी केली त्याच्या-वरील प्रत्यक्ष कर त्यांनी वाढत्या किंमतीच्या स्वरुपात गरीब–मध्यमवर्गीय याच्याकडूनच वसूल केले मग भांडवलाची उभारणी कुठून झाली? तर वाढत्या किंमतींद्वारे गरिबांना–शेतमजुराना – कष्टकऱ्याना – मध्यमवर्गीयांना महागाईच्या चरकातून पिळून काढून भारतातील भांडवलाची उभारणी मुख्यत झाली

कार्ल मार्क्स म्हणतो की, औद्योगिकरणासाठी जे भांडवल उभे केले जाते त्या भांडवलाच्या मस्तकापासून पायापर्यंत प्रत्येक छिद्रातून रक्त वहात असते! भारतातही भांडवलाची उभारणी अशीच झाली आहे साठ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली आजतागायत असून या देशातील भांडवलाची उभारणी त्यांच्या रक्ताने मस्तकापासून पायापर्यंत माखलेली आहे!

लोकशाही समाजवादाने ही दारुण अवस्था निर्माण केली आहे खरीखुरी लोकशाहीही नाही आणि समाजवादही नाही! लोकशाहीने या देशात संचार स्वातंत्र्य दिले, पण कुणाला? ज्याचा खिसा गरम आहे तो या देशातच नव्हे तर परदेशातही फिरून येऊ शकतो पण दलितांना गावकुसातून गावात येण्याचे संचार स्वातंत्र्य मिळायचे आहे! या देशात उद्योगधंदा सुरू करण्याचे स्वातंत्र्य आहे, पण कुणाला? तर जो लाखो रुपये खर्च करून जागा, परवाने मिळवू शकतो त्याला! इतराना कामासाठी वणवण हिंडावे लागत आहे! या देशात निवडणुकीला उभे रहाण्याचे स्वातंत्र्य आहे, पण कुणाला? तर ज्याच्याजवळ लाखो रुपये निवडणूक लढविण्यासाठी आहेत त्यालाच हे स्वातंत्र्य आहे इतरानी मतदानाचा पवित्र हक्क बजावायचा आहे! या देशात विचार स्वातंत्र्य आहे, पण कुणाला? जो उपाशी आहे, ज्याला आपल्या डोक्यावरील छप्पर कधी कोसळते याची काळजी आहे त्याला हे स्वातंत्र्य नाही त्याला विचाराचे नव्हे तर रोजची विवंचना करण्याचे स्वातंत्र्य आहे

एक विदारक गोष्ट आहे एका चित्रकाराच्या घरी भिंतीवर टांगलेल्या फ्रेममध्ये कोरा कागद लावलेला होता त्याबद्दल विचारले की, चित्रकार म्हणायचा —

"हे चित्र गाय आणि गवत यांचे आहे,"

"गवत कुठे आहे?"

"गाईने खाल्ले!"

"पण गाय कुठे आहे?"

"गवत खाल्ल्यावर गाय निघून गेली!"

म्हणजे गाय आणि गवत यांच्या चित्रात गायही नव्हती आणि गवतही नव्हते लोकशाही समाजवादाच्या चित्रात नेमके हेच घडले आहे। लोकशाहीची गायही नाही आणि समाजवादाचे गवतही नाही पण त्या चित्रकाराप्रमाणे राजकीय नेते मात्र सांगत आहेत की, लोकशाही समाजवादाचे चित्र भारताच्या भूमीवर आम्ही रंगविले आहे।

परिस्थिती अशी भयानक असली तरी निराशाजनक नाही निश्चितपणे ती पालटता येईल बदलता येईल कारण एका बाजूला एक टक्का वर्ग आहे तर दुसऱ्या बाजूला नव्याण्णव टक्के लोक आहेत।

: ६ :

# प्रथम समाजवाद ! त्यासमवेत लोकशाही !

प्रॅक्टीकल सोशॅलिझम म्हणजे भारताच्या वैशिष्ठ्यपूर्ण भूमीत आणि परिस्थितीत रुजेल आणि उगवेल असा समाजवाद! उत्तुग भारतीय नेत्याकडून प्रेरणा घेत माडलेला हा अस्सल भारतीय विचार आहे हा समाजवाद व्यवहारात उतरविता येऊन ९९ टक्के लोकाचे हित साधील आणि फक्त १ टक्का लोकाच्या स्वार्थी हितसबधांचे निर्मूलन करील

भारतातील लोकशाही समाजवादाच्या वाटचालीत नेमके उलटे घडले आहे फक्त १ टक्का लोकाचे जास्तीत जास्त हित साधले असून त्यांची हुकूमशाही प्रस्थापित झाली आहे ९९ टक्के लोकाना वाढत्या किंमतींच्या चरकातून पिळून काढून हा एक टक्का वर्ग सपत्तीच्या आणि सत्तेच्या डोगरावर उभा आहे

असे का झाले? कारण लोकशाही समाजवाद हा डोक्यावर उभे रहाण्याचा प्रकार आहे लोकशाहीतून मदगतीने इचा इचाने समाजवाद येत नाही तर लोकशाहीतून भांडवलशाही, भांडवलशाहीतून काळ्या पैशाचा भ्रष्टाचार, भ्रष्टाचारातून भाडवलदार–नोकरशाही–सत्ताधारी–धर्मांध–गुड स्मगलर यांची घातक युती, या युतीतून लुटारू टोळ्यांचा हैदोस आणि त्यातून एक टक्का वर्गाची हुकूमशाही निर्माण होते लोकशाहीही उरत नाही आणि समाजवादही दिसत नाही भारतात तसेच घडले आहे आणि त्याची शास्त्रशुद्ध साधार मांडणी आजवरच्या लेखात केली आहे

डोक्यावर उभ्या असलेल्या लोकशाही समाजवादाला प्रॅक्टिकल सोशॅलिझम उलटे फिरवून पायावर उभे करीत आहे प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत

संसदीय लोकशाही हेच प्रॅक्टीकल सोशॉलिझमचे मूलभूत उद्दिष्ट आहे समाजवाद घटनेद्वारेच अपरिवर्तनीय स्वरुपात अमलात आणून त्यासमवेत ससदीय लोकशाही राबविली पाहिजे, कारण तसे घडविले नाही तर लोकशाही ही एक टक्का वर्गाची हुकूमशाही बनते

लोकशाही ही त्रिमूर्ती आहे १) राजकीय समानता २) आर्थिक समानता आणि ३) सामाजिक समता या तीन मूर्तींची घडविलेली ही त्रिमूर्ती आहे तीनही प्रकारची समानता असेल तरच लोकशाही ही लोकानी, लोकां-साठी, लोकांतर्फे चालविलेली राजवट होऊ शकते म्हणूनच लोकशाहीची त्रिमूर्ती अभग आहे असे प्रतिपादन केले जाते यापैकी कोणतीही एक मूर्ती नसेल तर त्रिमूर्तीच भग पावते

याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे स्वातंत्र्यानंतरच्या ३७ वर्षांतील भार-ताचा इतिहास। समाजवादासह लोकशाही स्वीकारण्याऐवजी लोकशाहीतून समाजवादाकडे इचाड्याने जाण्याचा अर्थात डोक्यावर उभे रहाण्याचा प्रयोग भारताने केला त्यातून लोकशाही म्हणजे धनिकानी, धनिकांसाठी, धनिकांतर्फे चालविलेली हुकूमशाही असेच स्वरुप लोकशाहीला आले आहे हा प्रत्यक्ष विदारक अनुभव आहे

## प्रत्यक्ष अनुभवाची कसोटी

विख्यात क्रांतिकारक विचारवंत लेनिन काय म्हणत असे ते पहा It is the essence of Leninism that theory is wedded to praxis That theory alone is true which is tested in the crucibles of practice याचा अर्थ असा की, सिद्धान्ताची परिक्षा प्रत्यक्ष अनुभवात आहे जो सिद्धान्त प्रत्यक्ष अनुभवाच्या कसोटीला उतरला तोच फक्त खराखुरा आहे भारतातील ३७ वर्षांच्या अनुभवाच्या कसोटीवर हाच सिद्धान्त टिकतो की, समाजवादविरहित लोकशाही म्हणजे ९९ टक्के लोकांच्या दृष्टीने नुसते मृगजळ आहे त्या मृगजळामुळे आशा सुटत नाही आणि तहान भागत नाही।

२६ जानेवारी १९५० या दिवशी भारतीय घटना घोषित होऊन भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र झाले भारताने ससदीय लोकशाही आणि प्रत्येक प्रौढाला मताधिकार यांचा घटनेद्वारे स्वीकार केला प्रत्येक प्रौढ नागरिकाला एकच मत – मग तो नागरिक म्हणजे पडित जवाहरलाल नेहरू असोत, जे आर डी टाटा असोत किंवा एखादा आदिवासी असो

राजकीय समता म्हणजे १) प्रत्येक प्रौढ मतदाराला मतदानाचा समान अधिकार आणि २) निवडणूक लढविण्याचा समान हक्क भारतीय घटनेने निःसदिग्धपणे ही राजकीय समता १९५० साली भारतीय जनतेला प्रदान केली

आणि बड्या भांडवलशाहीतून निर्माण झालेल्या प्रचंड आर्थिक विषमतेनें आणि भ्रष्टाचाराने ही राजकीय समानता खाऊन टाकली त्याचा ठसठशीत अनुभव सार्वत्रिक निवडणुकीत सर्वांनी घेतला आहे

डिसेंबर १९८४ मध्ये भारतात लोकसभेची आठवी सार्वत्रिक निवडणूक झाली आसाम आणि पंजाबमध्ये अशांतता असल्याने ही दोन राज्ये वगळून लोकसभेच्या पाचशेचार मतदारसंघांत निवडणूक झाली बरासरीने पहाणी केली असता प्रत्येक मतदारसंघात तीन प्रमुख उमेदवार होते शिवाय तितक्याच हिरिरीने लढणारे किमान दोन उमेदवार प्रत्येक मतदार संघात होते याखेरीज अनेक अपक्ष उमेदवार होते

## हमाम मे सब नंगे है

भारतात या निवडणुकीची जी पहाणी करण्यात आली त्या पहाणीवरून स्पष्ट झाले की, मातब्बर उमेदवारांनी सरासरी प्रत्येकी खर्च पन्नास लाख रुपये केला प्रत्येक मतदारसंघात विविध उमेदवारांचा एकूण खर्च किमान अडीच कोटी रुपये झाला या हिशेबाने लोकसभेच्या पाचशेचार मतदार संघांत १२६० कोटी रुपये खर्च उमेदवारातर्फे करण्यात आला हा सर्वच्या सर्व काळा पैसा होता, कारण एका उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा दीड लाख रुपये आहे

हिंदी भाषेत म्हणतात की, "हमाम में सब नगे है स्नानगृहात सगळेच नगे असतात" जो उमेदवार लोकसभेची निवडणूक लढवितो तो काळा पैसा वापरतोच वापरतो! एवढा काळा पैसा तो कुठून आणतो? एक तर तो स्वतःच भ्रष्टाचारी असला पाहिजे किंवा बड्या भांडवलदारांकडून लाखो रुपयांची काळ्या पैशाची मदत मिळण्याइतका तो 'उपयुक्त' माणूस असला पाहिजे निवडणूक हा एक प्रकारचा जुगारच असतो आणि अशा जुगारावर बेहिशोबी पन्नास लाख रुपये लावणारा उमेदवार लोकसभेत कुणाचे प्रतिनिधीत्व करणार?

घनश्यामजी बिर्ला पूर्वी एकदा म्हणाले होते की, साठ खासदार माझ्या खिशात आहेत टाटा-बिर्ला आदि सर्वांत बड्या एक्याऐंशी भांडवलदारांच्या खिशात जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी टाकण्याचे काम प्रचंड काळ्या पैशाने केले आहे!

प्रत्येक प्रौढ नागरिकाला उमेदवार म्हणून उभे रहाण्याचा भारतीय घटनेने हक्क दिला आहे, पण हा हक्क फक्त कागदावरच राहिला आहे किमान पंचवीस लाख रुपये लोकसभा निवडणुकीत फेकायला असतील तरच हा हक्क प्रत्यक्षात आहे ना?

या दुःस्थितीवर उपाय सांगणारी विचारधारा म्हणजे प्रॅक्टीकल सोशॅलिझम! ९९ टक्के लोकानी फक्त १ टक्का लोकाची हुकूमशाही आणि हैदोस बद पाडून आणि डोक्यावर उभा राहिलेला लोकशाही समाजवाद उलटा फिरवून समाजवादी लोकशाहीची प्रस्थापना करण्याची ही विचारधारा आहे हा अस्सल भारतीय विचार आहे जगातील विचारवताचा डोळस अभ्यास करून आणि कुणाचेही पोथीप्रामाण्य नाकारून भारतीय विचारवतांना वाट पुसत अनुभवातून उमललेला हा निश्चित विचार आहे

## भारतीय विचारवंत

आपण भारतीय विचारवताच्या विचाराचा धावता आढावा घेऊ या समाजवादी विचारवत अशोक मेहता यांनी लोकशाहीची सकल्पना फार मर्मज्ञपणे मांडली होती त्यांनी लिहीले "विभिन्न विचारांची व्यासपीठे आणि त्याच्या पर्यायी कार्यक्रमातून निवड करण्याचा लोकांचा हक्क म्हणजे लोकशाही! जर हा हक्क अर्थपूर्ण व्हायचा असेल तर आर्थिक समता अवश्य पाहिजे म्हणून लोकशाही आणि समाजवाद या दोन्हीचे अस्तित्व एकदमच हवे आमचे तेच उद्दिष्ट असले पाहिजे" (पान ३१–डेमोक्रॅटीक सोशॅलिझम)

पडित जवाहरलाल नेहरू यांनी लॉर्ड लोथियन यांना १७ जाने १९३६ या दिनांकाचे जे पत्र पाठविले त्यात म्हटले आहे "समाजवाद कसा येईल? उत्पादनाची आणि वाटपाची जी साधने आहेत त्याचे राष्ट्रीकरण करणे अटळ आहे आपल्याला निवड ही करावीच लागते आणि ज्याचे उद्दिष्ट समाजवादाचे आहे त्याने राष्ट्रीकरणाचाच मार्ग स्वीकारला पाहिजे" (ए बच ऑफ ओल्ड लेटर्स)

## नेताजी असते तर–

नेताजी सुभाषचद्र बोस! ज्याचे नाव उच्चारताच भारतीय मन पुलकित होते असे आझाद हिंद सेनेचे निर्माते! नेताजी कट्टर समाजवादी होते आणि पडित जवाहरलाल नेहरूना त्यानी समाजवादी उभारणीसाठी एका व्यासपीठावर येण्याचे वारवार आवाहन केले होते पण पडित नेहरू महात्मा गाधीचेच 'जवाहर' राहिले

नेताजी आय सी एस होते, पण देशासाठी सर्व सुखाचा त्याग करून त्यानी सर्वात मोठा धोका पत्करला ब्रिटीशाच्या हातावर तुरी देऊन नेताजी १६ जानेवारी १९४१ रोजी कलकत्याहून निसटले आणि त्याच महिन्यात अफगाणिस्तानची राजधानी काबूल येथे पोचले काबूलमधील एक देशभक्त व्यापारी लाला उत्तमचद मिलोत्तरा याच्याकडे नेताजी ४३ दिवस लपून

राहिले होते झियाउद्दीन पठाण या नांवाने नेताजी काबूलला राहिले अखेर जपानला जाऊन त्यांनी आझाद हिंद फौजेची निर्मिती केली १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींचे विमान फॉर्मोसा बेटावर तैहोकू येथे कोसळून महान क्रांतिकारकाचे देहावसान झाले.

काबूलमधील नेताजीची हकीगत उत्तमचद यानी एका पुस्तकात सादर केली आहे या पुस्तकाचे मराठी भाषातर समाजवादी नेते साथी एस एम जोशी यानी "नेताजींचे सीमोल्लघन" या नावाने सादर केले आहे नेताजी आणि उत्तमचद याचा काबुलच्या मुक्कामातील एक सवाद असा आहे–(हाच सवाद आचार्य अत्रे यानी 'सुभाष कथा' या ग्रथात अधिक आकर्षक आणि नाट्यपूर्ण दिला आहे–पान ९३–९४)

**उत्तमचंद** – आयर्लंडमध्ये झाली तशी क्रांती हिंदुस्थानात होणार नाही असे तुम्हाला वाटते काय ?

**नेताजी** – ब्रिटीशांनी हिंदुस्थानात अशी परिस्थिती निर्माण केली आहे की, त्यामुळे तशी क्रांती होणे अशक्य आहे ब्रिटीशांचे उच्चाटन करण्यासाठी परराष्ट्राच्या मदतीशिवाय क्रांती घडवून आणणे शक्य नाही

**उत्तमचद** – म्हणजे हिंदुस्थानला बधमुक्त करण्यासाठी रशियाचे सहाय्य मिळविण्याकरता तुम्ही रशियास जाऊ इच्छिता असाच याचा अर्थ घ्यावा काय?

**नेताजी** – होय, माझा खरा हेतू तोच आहे मी रशियाची मदत मागणार आहे त्यासाठी मी चिकाटीचा प्रयत्न करीन इतर कोणतेही राष्ट्र आम्हाला मदत करणार नाही म्हणूनच रशियाखेरीज इतर कोठेही जाऊ नये अशी माझी इच्छा आहे

**उत्तमचद** – हिंदुस्थानात धार्मिक सघर्ष आहेत विषमता आहे मतभेद आहेत

**नेताजी** – जोपर्यंत हिंदुस्थानात ब्रिटिशांची सत्ता आहे तोपर्यंत हे मतभेद नष्ट होणार नाहीत ते सारखे वाढतच रहातील एखाद्या खंबीर हुकूमशहाने वीस वर्षे हिंदुस्थानवर हुकमत गाजविली तर या धर्मभेदाचे कठोरपणे निर्मूलन होईल ब्रिटीश राजवट सपुष्टात आल्यानतर काही वर्षे तरी हिंदुस्तानात पुरोगामी विचारांची केमाल पाशासारखी हुकूमशाही राजवट राहिली पाहिजे दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या राजवटीने हिंदुस्थानचा उत्कर्ष होणार नाही हिंदुस्थानच्या कल्याणाच्या दृष्टीनेसुद्धा प्रारभी हुकूमशहाची हुकमत असणे आवश्यक आहे कारण हिंदवासियाच्या आपसातील भेदाचे निर्मूलन हुकूमशहालाच करता येईल. हिंदी राष्ट्रपुरुषाच्या शरिराला पोखरून काढणारा

धर्म-विद्वेष हा एकच रोग नव्हे इतरही अनेक व्याधींनी या राष्ट्रपुरुषाचा देह जर्जर झाला आहे भारताला आज केमाल पाशासारख्या व्यक्तीची आवश्यकता आहे

याचा आणखी पुरावा हवा असेल तर हरिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून १९३८ साली भाषण करताना त्यानी स्वतंत्र भारताचा जो कार्यक्रम पुकारला तो पहा ते म्हणाले, "माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही की, दारिद्र्य, अज्ञान, रोगराई आदि आमच्या प्रमुख समस्यांचे निराकरण फक्त समाजवादी मार्गांनीच होऊ शकेल!" यानंतर दोनच वर्षांनी त्यांनी परदेशी प्रयाण केले

माधवराव पेशव्यांचा अकाली मृत्यु हा पानिपतातील मराठ्यांच्या पराभवापेक्षाही अधिक घातकी होता असे इतिहासकार ग्रँट डफ म्हणतो नेताजी बोस यांचा अपघाती मृत्यु हा भारताच्या फाळणीइतकाच भारतीय प्रगतीवरील घातकी प्रहार होता ते हयात असते आणि त्यांचे राज्य आले असते तर त्यानी त्यांच्या मार्गाने समाजवाद निर्माण केला असता आणि नंतर लोकशाही दिली असती

## डॉ. आंबेडकर–नेहरू पत्रव्यवहार

ज्यानी प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत संसदीय लोकशाही ही कल्पना अगदी निश्चित स्वरूपात मांडली ते उत्तुंग विचारवंत डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले "लोकशाही जगातील विद्यमान घटनांपेक्षा माझी घटना आगळी आहे ज्याना समाजवाद हवा आणि संसदीय लोकशाहीसह आणि हुकूमशाहीशिवाय समाजवाद हवा त्यानी माझ्या संकल्पनेचे स्वागत केले पाहिजे जगातील कुठल्याही लोकशाही घटनेने समाजाच्या राजकीय रचनेबरोबरच आर्थिक रचना करण्याचे पाऊल उचललेले नाही घटनेच्या कायद्याने समाजाची राजकीय रचना करताना घटनेद्वाराच समाजवादी आर्थिक रचना निश्चित करण्यासाठी धाडसी पाऊल टाकण्याची वेळ आता आली आहे घटनानिर्मितीच्या क्षेत्रात जे देश उशिरा आले आहेत त्यानी अन्य विविध देशांच्या घटनातील दोषांचे अनुकरण करता कामा नये त्यांच्या अनुभवाचा फायदा घेऊन त्यांच्या चुका टाळल्या पाहिजेत .जर घटनेद्वाराच समाजवादी आर्थिक घडण निश्चित केली नाही तर राजकीय लोकशाहीतून भांडवलदारांची हुकूमशाही निर्माण होईल" (स्टेट अँण्ड मायनॉरिटी–नोटस्)

पंडित नेहरूंच्या पत्रांचा व लेखांचा नवीन खंड नेहरू स्मारक निधीतर्फे ऑक्टोबर १९८४ मध्ये प्रसिद्ध झाला त्यात पंडितजींनी डॉ आंबेडकराना

लिहिलेले २२ मे १९४७ चे एक अत्यंत खळबळजनक पत्र आहे डॉ बाबासाहेब आबेडकरानी पंडित नेहरूना लिहिलेल्या पत्राचे ते उत्तर आहे मी ४ जानेवारी १९८४ रोजी डॉ बाबासाहेब आबेडकर व्याख्यानमालेत बाबासाहेबांचा जो विचार प्रकाशात आणला त्यावर या पत्राने शिक्कामोर्तबच केले

डॉ आबेडकरानी आपल्या पत्रात अशी तक्रार केली होती की, माझ्या समाजवादी लोकशाहीच्या सकल्पनेची चर्चा करण्यासही सल्लागार समितीत तसेच मूलभूत हक्काच्या उपसमितीत मुभा दिली जात नाही पंडित नेहरूनी घटनेद्वारा समाजवादी आर्थिक रचना मुक्रर करण्याच्या आपल्या कल्पनेला पाठिबा द्यावा असेही डॉ आबेडकरानी सूचित केले होते त्यावर पंडित नेहरूनी आपल्या उत्तरात प्रतिपादन केले की, "तुमच्या सर्वसाधारण दृष्टी-कोनाशी मी सहमत आहे, पण देशात आज सर्व प्रकारच्या विघातक प्रवृत्ती व शक्ती असून पहिले काम स्थिर व समर्थ शासन प्रस्थापित करण्याचे आहे त्याचवेळी पुरोगामी शक्तींना पुढे नेले पाहिजे भविष्यकाळात प्रतिगामी शक्ती अधिकाधिक प्रभावी होऊन पुरोगामी शक्तीवर मात करतील अशी तुमची भीती आहे, पण मला तसे वाटत नाही तसेच आपण जी सकल्पना मांडत आहात ती आज शक्य आहे असे मला वाटत नाही तसा प्रयत्न केला तर प्रतिगामी शक्ती देशात गोंधळ माजवितील आणि कोणत्या तरी प्रकारची हुकूमशाही आणतील"

१९४७ साली समाजवादी आर्थिक घडण घटनेद्वाराच प्रस्थापित कर-ण्याची शक्यता होती किंवा नाही या वादात शिरण्याचे या ठिकाणी कारण नाही समाजवादी आर्थिक रचनेचा आणि त्यासमवेत ससदीय लोकशाहीचा दृष्टीकोन पंडित नेहरूना मान्य होता याची नोंद घेणेच आज महत्त्वाचे आहे म्हणजेच हा अस्सल भारतीय विचार असून उत्तुग भारतीय व्यक्तीनी पुरस्कारलेला आहे

## पंडितजी ते राजीवजी

ही विशेष नवलकथा पहा पंडित नेहरूनी प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत लोकशाहीची सकल्पना बाजूला सारताना असे सांगितले की, "भारतात प्रथम सुस्थिर व मजबूत सरकार स्थापन केले पाहिजे!" त्यांच्या कन्या इंदिराजी हेच सांगत होत्या की, "राष्ट्राची एकता राखण्याचे काम प्रथम करू या" डिसेंबर १९८४ मध्ये पंडित नेहरूंचे नातू राजीव गांधी यानी भारताच्या आठव्या निवडणुकीत देशवासियाना तेच आवाहन केले की, "देशाच्या एकतेला धोका आहे म्हणून आज देशाला स्थिर व मजबूत सरकार हवे आहे ते प्रथम देऊ या!"

पंडित जवाहरलाल नेहरूपासून नातवापर्यंत भारताला स्थिर सरकार देण्याचेच काम चालू आहे। जर गाडे असेच चालले तर राजीवच्याही नातवापर्यंत तेच काम करावे लागेल। अतिमत प्रॅक्टीकल सोशॅलिझममधूनच देशाची ९९ टक्के जनता स्थिर व मजबूत होऊन, सरकार खरेखुरे बलिष्ठ होईल नाहीतर भारतीय राजकारण आजच्या दुष्ट वर्तुळातच फिरत राहील,

: ७ :

# ९९ टक्के लोकांच्या लढ्याचा कार्यक्रम

कार्ल मार्क्स आणि फरेडरीक एंजल्स यांच्यात एकदा चर्चा सुरू होती भांडवलशाही उलथण्याचे मार्ग शोधण्यात ज्यांची हयात सपली असे हे दोन महान विचारवंत आणि मित्र ! एकाएकी एंजल्स म्हणाला, "व्हाय नॉट बाय ऑफ दि व्होल गँग ?" (ही लुटारूंची सारी टोळी विकतच का घेऊ नये ?) नतर अर्थातच दोघांनाही हसू आले असणार, कारण मार्क्सच्या रहात्या जागेचे भाडेही जिथे भरता येत नव्हते तिथे ते भांडवलदाराची गँग कुठून विकत घेणार ?

तथापि भारतात ही गोष्ट खरोखरीच शक्य आहे !

ज्या ८१ औद्योगिक घराण्याच्या ताब्यात कोटयावधी रुपयांची मालमत्ता आहे त्याची स्वत ची गुतवणूक जास्तीत जास्त पाच टक्के आहे मे १९८३ मध्ये सरकारनेच लोकसभेत जी माहिती दिली ती पहा—"अकरा बडया औद्योगिक कुटुबाच्या ताब्यातील कपन्याची जी मालमत्ता आहे तिच्या एक टक्क्याइतकीही इक्विटी शेअर्सची गुतवणूक या कुटुबाची नाही टाटा घराण्याचे इक्विटी शेअर्स अर्ध्या टक्क्याहून कमी म्हणजे ० ३३, बिर्लांचे पाव टक्क्याहून कमी ० १८, मफतलाल जवळजवळ एक टक्का ० ९९, सिंघानिया सुमारे तीनपचमाश म्हणजे ० ६५, थापर पाव टक्क्याहून कमी ० १६, के पी गोएंका पाव टक्का आणि श्रीराम पाव टक्क्यांहून कमी म्हणजे ० १४ टक्के आहेत !"

अशी जी विदारक वस्तुस्थिती आहे ती वादविवादाच्या भरात २४ ऑगस्ट १९८३ रोजी तेव्हाचे अर्थमत्री बा प्रणव मुकर्जी यानीही सागून

टाकली त्यांच्यावर विरोधी पक्षीयांनी असा आरोप केला की, परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय उद्योगपतीच्या सहाय्याने सरकार भारतातील उद्योगधंदे ताब्यात घेत आहे त्यावर प्रणव मुकर्जींनी फटकारले की, "कोणतीही कंपनी ताब्यात घेण्यासाठी सरकारला कुणाशीही हातमिळवणी करण्याची गरजच काय आहे? सरकार कोणतीही कंपनी सरळ ताब्यात घेऊ शकते. कारण सरकारचे शेअर्स ५१ टक्क्यांहून अधिक आहेत"

असोशिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीज या उद्योगपतीच्या संघटनेचे (असोचेम) अध्यक्ष श्री जाहर सेनगुप्ता यांनी जाहीरपणे मान्य केले की, कुणाही संस्थेला भारतातील २०० सर्वोच्च कंपन्या ५०० कोटी रुपये गुंतवून ताब्यात घेता येतील!

## अमाप फायदा

मक्तेदार ८१ भांडवलदार घराण्याच्या ताब्यातील मालमत्ता ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला तर त्यासाठी सरकारला कसलीही नवीन गुंतवणूक करण्याची जरुरीच नाही

मग हे उद्योगधंदे ताब्यात का घेत नाहीत? कारण बडे उद्योगपती म्हणजे बडे शोषक असून त्यांची नोकरशाही–सत्ताधारी यांच्याशी हातमिळवणी झाली आहे सरकारच्या सर्व खास सोयी सवलती ते काळ्या पैशातून मिळवितात आणि मक्तेदारीच्या बाजारपेठेत हव्या त्या किंमती ठेऊन महागाईद्वारे ग्राहकांना लुटून धंदा चालवितात नानी पालखीवालांसारखे तज्ञ कायदेपंडित त्यांचे रखवालदार आहेत ही सर्व वस्तुस्थिती लपवून त्यांची बाजू रंगसफेती करून मांडण्यासाठी पगारदार बुद्धिमंत आणि लेखक-संपादक कार्यमग्न आहेत तथापि, जर या घातकी युतीतील बड्या भांडवलशाहीवर आघात केला तर चित्रच बदलेल

(१) काळ्या पैशाचा कणाच मोडला जाईल, कारण नोकरशाहीतील बडे अधिकारी आणि मंत्री यांना खरेदी करण्याइतका लाखो रुपयांचा काळा पैसा हा मक्तेदार औद्योगिक कुटुंबांनाच निर्माण करता येतो जोपर्यंत या कुटुंबाकडे प्रचंड काळा पैसा आहे तोपर्यंत उच्च स्थानावर असलेल्या कुणालाही जबर आमिषामुळे स्वच्छ रहाता येणार नाही—मग राजघाटावर कितीही शपथा होवोत! रंभा, मेनका, उर्वशी यांना सभोवती नृत्य करण्यास मुभा देऊन तपश्चर्या होऊ शकत नाही! साठ हजार कोटी रुपयांचा काळा पैसा ज्या अर्थव्यवस्थेत आहे त्या अर्थव्यवस्थेत राजकीय रचना ही भ्रष्टच होणार एवढा अफाट पैसा कुणालाही खरेदी करू शकतो आणि फार क्वचितच अपवाद दिसून येतो ८१ औद्योगिक घराण्याचे साम्राज्य ताब्यात घेतल्याने काळ्या पैशाच्या निर्मितीवर खराखुरा प्रहार होईल.

(२) अकरा औद्योगिक घराण्यांनी भारतात वापरावयाचा काळा पैसा खोडून २५ हजार कोटी रुपये परदेशी बँकांत नेले आहेत पन्नासाव्या क्रमांकाचा कमानी २००० कोटी रुपये घेऊन कॅनडात फरारी झाला ज्यांचा क्रमांक पहिल्या बडया शभर भांडवलदारांतही लागत नाही त्या एस एल एम माणेकलाल इंडस्ट्रीजनी नेमलेला कूमर नारायण पंतप्रधानाच्या खास उच्चपदस्थ अधिकाऱ्याना विकत घेत होता! यावरून असे दिसते की, या ८१ औद्योगिक घराण्यानी किमान शभर हजार कोटी रु चा काळा पैसा निर्माण करून तऱ्ह-तऱ्हानी वापरला तसेच लपविला आहे भारतातील ७७ हजार कोटीच्या पहिल्या पांचही योजना या पैशातून पार पाडता आल्या असत्या म्हणजे पंचवार्षिक योजनावरील खर्चासाठी जो अवाढव्य पैसा हवा आहे तो आज उपलब्ध आहे गरिबाना पिळून काढून भांडवलाची उभारणी झाली आहेच आणि आता हे भांडवल समाजासाठी जमा करावयाचे आहे! हा पैसा हाती आल्यावर नवनवीन अप्रत्यक्ष कर बसवून सामान्य माणसांकडूनच महागाईच्या रुपात कर वसूल करण्याची आवश्यकता नाही

(३) उद्योगधंदा म्हणजे गाय आहे आणि जोपर्यंत गाय आपल्या हाती आहे तोपर्यंत जास्तीत जास्त दूध स्वतःसाठी मिळवायचे यातच उद्योगपतीचे डोके खर्च होत असते यामुळे उद्योगधंदे आजारी झाले असले तरी उद्योगपतीची प्रकृती मात्र उत्तम झाली आहे असे दृश्य वारंवार दिसत आहे भारतीय भांडवलशाहीचे कार्य केव्हाच संपले असून आता त्यांना हाकलून देण्याचीच वेळ आली आहे तसा निर्णय लोकशाही मार्गाने झाला नाही तर लोकशाहीच धोक्यात येईल

## मूलभूत धारणा

१) समाजवादाची घटनेद्वारा अपरिवर्तनीय प्रस्थापना आणि त्यासमवेत संसदीय लोकशाही हा प्रॅक्टीकल सोशॅलिझम विचारधारणेचा पाया आहे त्याशिवाय राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समानता निर्माण होऊच शकत नाही लोकशाही समाजवाद म्हणजे डोक्यावर उभे रहाणे! म्हणून त्याला उलटे फिरवून पायावर उभे केले पाहिजे म्हणजेच समाजवादाची प्रस्थापना व त्यासमवेत संसदीय लोकशाही हाच मार्ग आहे

२) अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-कामधंदा-औषधोपचार यांची हमी जन्मतःच देणारा विचार म्हणजे प्रॅक्टीकल सोशॅलिझम अशी हमी ज्या समाजात नाही त्या समाजात व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीचे मूलभूत हक्क बहुसंख्य जनतेच्या दृष्टीने कागदावरच रहातात आणि सत्ता-संपत्ती असलेला एक टक्का वर्ग इतरांच्या शोषणासाठी मूलभूत हक्कांचा वापर करतो.

३) प्रॅक्टीकल सोशॅलिझम निखळ राष्ट्रवादी आहे राष्ट्राची अभंगता अखंडता याविरोधी फुटीर शक्तींना कठोरपणे नेस्तनाबूत केले पाहिजे असे मानणारा आहे

## किमान कार्यक्रम

१) मक्तेदार औद्योगिक घराण्याचे उद्योगधंद्यातील साम्राज्य तत्काळ ताब्यात घेतले जाईल

२) कुणाही व्यक्तीला एकापेक्षा अधिक औद्योगिक कंपन्यांचे संचालक होण्यास बंदी केली जाईल यामुळे मक्तेदारी निर्मितीच्या मुळावरच घाव पडेल

३) सर्व शहरी जमिनीचे राष्ट्रीकरण केले जाईल मोकळ्या जमिनीवर गरिब व मध्यमवर्गीय यांच्यासाठी गाळे बांधले जातील

४) स्वत आणि स्वतचे कुटुंबीय यांच्यामार्फत जे कोणताही कामधंदा करतात त्यांना शासन जास्तीत जास्त सोयी सवलती देईल यामुळे खाजगी प्रेरणेचा देशाला लाभ होईल आणि कुणाचेच शोषण होणार नाही

५) धर्म हा घरापुरता आणि प्रार्थनास्थळांपुरताच मर्यादित केला जाईल

६) समान नागरी कायदा अमलात आणला जाईल

७) शेतीविषयक सिलींग कायद्यातील पळवाटा बुजवून कायद्याची कठोर अमलबजावणी केली जाईल आणि अतिरिक्त जमीन भूमीहीन शेतमजुरांना देण्यात येईल

८) जीवनावश्यक अशा दहा वस्तु एकाच भावाने जनतेला पाच वर्षे पुरविल्या जातील त्यासाठी त्या वस्तुंचे वाटप सरकार ताब्यात घेईल

९) गुन्हेगाराला शासन झालेच पाहिजे या तत्त्वावर कायद्याची फेररचना केली जाईल

१०) एक लाख रुपयांहून अधिक करविषयक थकबाकीची वसुली स्थगित करण्याचे तसेच बेकायदा कामे रितसर करण्याचे मंत्र्यांना व लोकप्रतिनिधींना असलेले डिस्क्रीशनरी म्हणजे स्वतच्या 'विवेकबुद्धी'ने अंतिम निर्णय घेण्याचे खास अधिकार (म्हणजे पैसे खाण्याचे अधिकार) रद्द केले जातील

११) राष्ट्राची अखंडता अभंगता यांच्याविरोधी फुटीर शक्तींना नेस्तनाबूत केले जाईल

१२) सर्वप्रथम दहावीपर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे केले जाईल

हा किमान सुस्पष्ट कार्यक्रम अमलात आणल्यास समाजवादाची मुहूर्तमेढ होईल किमान कार्यक्रमासाठीच आणि त्यावरच जनतेची एकजूट बांधल्यामुळे

१) नांवापुरता समाजवाद सांगणारे बाजूला सरतील, २) सैद्धांतिक वाद माजवून फाटाफूट करता येणार नाही आणि ३) किमान कार्यक्रम हाच हिरो बनून, सबगोलकारी व्यक्तिनिष्ठ राजकारणाला सुस्पष्ट पर्याय लोकासमोर येईल

हा कार्यक्रम सर्वंकष नव्हे. अधिक तपशीलवार कार्यक्रम प्रॅक्टीकल सोशॅलिझम या ग्रथात यापूर्वीच दिला आहे पण भारतात क्रांतिकारक बदल घडवून आणील आणि ९९ टक्क्याचे राजकारण सुरू करील, असा हा कार्यक्रम आहे त्यासाठी एवढाच कार्यक्रम मांडणारी आणि त्याचाच प्रचार करणारी एकच एक आघाडी स्थापन करावी अशा आघाडीला प्रचड पाठींबा मिळेल गोलमाल पाच-दहा पक्षांच्या आघाडीला काहीच अर्थ नसून निश्चितपणे नेमके काय करणार ते सागणारी आघाडी हाच आजचा ताबडतोबीचा तोडगा आहे त्यातून प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत ससदीय लोकशाही हे उद्दिष्ट साकार होऊ लागेल

## गोलमाल आघाडीचा फोलपणा

नव्याण्णव टक्के लोकाच्या राजकारणाची सुरुवात करणारा अशा स्वरुपाचा कार्यक्रम न माडता आणि त्यावर एकमत न साधता ज्या आघाड्या साधल्या जातात त्यांच्यामुळे राजकारणात काहीच फरक पडत नाही अशा आघाड्याचा उद्देश पुढाऱ्याना सत्तेत वाटा मिळावा इतकाच असतो

तथापि, क्रांतिकारक कार्यक्रमावर एकजूट साधली तर त्यात नेत्याची व पक्षाची आपोआपच परीक्षा होऊन जाते प्रचार हा कार्यक्रमाचाच होतो आणि निवडणुकीत कमी अधिक पराभव झाला तरी कार्यक्रमाचा प्रचार होत असल्यामुळे परिश्रम व पैसा फुकट जात नाही याउलट विरोधी पक्षानी वर्षानुवर्षे मुख्यत 'इंदिरा हटाव'चा प्रचार केला आणि इंदिराजींच्या हत्येमुळे हा प्रचार केवळ फुकटच गेला नाही तर बुमरँगसारखा उलटला राजीव गाधी अननुभवी हा प्रचारही असाच अगावर उलटला पण क्रांतिकारक कार्यक्रम समोर ठेवला म्हणजे सत्ताधारी व्यक्ती कोण आहे याला महत्वच उरत नाही आणि नकारात्मक पवित्रा घ्यावा लागत नाही

"कुणीही सत्तेवर आले तरी सामान्यजनाच्या जीवनात कुठे फरक पडणार आहे ?" असे लोक हताशपणे म्हणतात क्रांतिकारक कार्यक्रम लोकांसमोर ठेवला तर हा हताशपणा नाहीसा होऊन राजकारणात पुनश्च उत्साह येईल

निव्वळ सैद्धांतिक आणि वास्तवतेशी कसलाच सबध नसलेले विषय उकरून काढून आणि हवेतील माडणे चालवून वितुष्ट माजविणारे पुराणे पुढारी यामुळे कसे बाद होतील त्याचा उहापोह यानतर करू या.

: ८ :

# कार्यक्रम हाच 'हिरो' असला पाहिजे

'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'वर काही महिन्यापूर्वी एक परिसवाद झाला त्यावेळी पूर्वीचे एक प्रजासमाजवादी नेते कडाडून म्हणाले की, "या देशात रशियन सैन्य शिरले तर त्याला आमच्या मुद्द्यांवरून वाटचाल करावी लागेल !"

रशियन सैन्य आज अफगाणिस्तानात आहे अफगाणिस्तान आणि भारत यांच्या दरम्यान अमेरिकेचा सपूर्ण पाठिंबा असलेले पाकिस्तान आहे मग रशियन सैन्य भारतात येण्याचा प्रश्न कुठे येतो ? भारत व रशिया यांची मैत्रीही आहे पण कुठे तरी हवेत दाडपट्टा चालवित सुटायचा आणि अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-कामधंदा-औषध उपचार याबाबतच्या कार्यक्रमाचा उग्र प्रश्न डावलायचा ही पुराण्या पुढाऱ्याची रितच आहे

सदर नेत्याच्या भाषणानतर आम्ही गप्पागोष्टी करताना त्याना म्हणालो की, "रशियन सैन्य आले तर आमच्या मुद्द्यांवरून यावे लागेल असे आपण म्हणालात, पण १९६२ साली चीनचे सैन्य भारतात घुसले तेव्हा आपण कुठे होता ? अजूनही चीनने भारताचा मुलूख बळकावलेला आहे तिथे का जात नाही ?"

अत्यत कृत्रिम आणि वास्तवतेशी काहीही सबध नसलेले वादविवाद करून पक्ष फोडण्यात आले आहेत म्हणून प्रॅक्टीकल सोशॅलिझमची भूमिका अशी आहे की, लोकाच्या समस्या कशा सोडवायच्या याचाच विचार करून किमान पण क्रांतिकारक मूलभूत कार्यक्रम आखला पाहिजे त्यावरच लोकात

जागृती केली पाहिजे असा कार्यक्रम ज्यांना मान्य होईल त्यांच्यात फाटा-फुटीचा सवालच येत नाही कारण सत्ता हाती आल्यानंतरही किमान कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवायला पांच वर्षे लागतील सत्ता हाती येण्यासाठी काही वर्षे लागतील म्हणजे किमान क्रांतिकारक कार्यक्रम अमलात आणण्यासाठी अगदी कमीत कमी दहा-पधरा वर्षे लागणार असताना, "मार्क्स कालबाह्य झाला की नाही ?" असल्या पडिती वादविवादातून फाटाफूट कशासाठी ? त्यावर बौद्धिक चर्चा जरूर करावी, पुस्तके लिहावीत, पण मतभेद असले तरी भाड-णाचे आणि फाटाफुटीचे काहीही कारण नाही कशास काही पत्ता नसताना, भारतीय जनतेच्या आजच्या प्रश्नाना क्रांतिकारक किमान कार्यक्रमाने न भिडता, असले पडिती वाद आणि भांडणे करीत राहणे हेच अत्यत कालबाह्य, स्थलबाह्य आणि वास्तवताबाह्य नाही का ? अशा वादांची भाषाही इतकी क्लिष्ट व कृत्रिम असते की, ज्याला मूळ इग्रजी शब्द माहीत आहेत त्यालाच ती समजते ! यामुळे या वादानी लोकशिक्षणसुद्धा झाले नाही !

किमान क्रांतिकारक कार्यक्रम अमलात आणण्यावरच यासाठी लक्ष केंद्रित केले पाहिजे की, हा कार्यक्रम यशस्वी केला तरच भारत एक समर्थ राष्ट्र होईल हा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी वचनबद्ध असलेले नेते सत्तेवर येऊन कार्यक्रम साकार करण्यास कमीत कमी एक पिढीचा काळ जाईल तेव्हा या कार्यक्रमाव्यतिरिक्त सैद्धातिक वाद खेळून पक्ष फोडणे आणि हवेत दांडपट्टा फिरविणे निरर्थक आहे फक्त कार्यक्रमावरच नव्याण्णव टक्के लोकांची एकजूट घडविली पाहिजे अशा कार्यक्रमाशी जे वचनबद्ध होणार नाहीत त्यांच्याशी सहकार्याचा सवालच रहाणार नाही पण असा कोणताही निश्चित सुस्पष्ट कार्यक्रम आणि केवळ त्याच्याशीच वचनबद्धता नसल्याने, इदिराजी पुरोगामी आहेत की नाहीत यावरच अनेक पक्षात पूर्वी वाद चालत त्यापूर्वी पडित नेहरू समाजवादी आहेत की नाहीत यावर वाद खेळले जात जर फक्त किमान कार्यक्रम ठरविला तर एखाद्या व्यक्तीभोवती राजकारण फिरणार नाही, हवेत दांडपट्टा फिरवित पक्ष फोडता येणार नाहीत आणि कार्यक्रमालाच म्हणजे जनतेच्या निकडीच्या प्रश्नाना सपूर्ण महत्त्व येईल

कामगार क्रांती झाल्यानतर येणाऱ्या समाजवादी राजवटीतील तपशील कार्ल मार्क्सनेही कधी मांडला नाही तसे करण्यास मार्क्सने नकारच दिला अशा प्रकारची माडणी युटोपियन म्हणजे स्वप्नाळू होईल असे तो म्हणत असे याचाच अर्थ असा की, कार्यक्रमाची एक स्टेज पूर्ण करण्यास अनेक वर्षे लागणार असताना, दुसऱ्या स्टेजबाबत सैद्धातिक भांडत बसणे व फुटणे युटोपियन आहे पुढच्या अनेक पिढ्याचा कार्यक्रम ठरविण्याचा प्रयत्न करून, आजच्या पिढीने कृत्रिम वादापायी फाटाफूट करणे ही घोडचूक आहे

## भोंगळपणाचा नमुना

निश्चित कार्यक्रम नसला आणि त्याच्याशी वचनबद्धता नसली म्हणजे भोंगळपणा अमाप माजतो महाराष्ट्रातील एकेकाळचे बहुतेक प्रजासमाजवादी नेते हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण आहेत या भोंगळपणाचा साथी एस एम जोशी यांनी आत्मचरित्रात सादर केलेला हा नमुना पहा—

"सत्ताधारी काँग्रेस पक्षाबरोबर प्र स पक्षाचे सत्तेच्या वांटपाच्या दृष्टीने सहकार्य होऊ शकणार नाही असे अलाहाबाद अधिवेशनात ठरले यानतर काही महिन्यातच १९५४ च्या सुरुवातीला केरळ विधानसभेची निवडणूक उद्‌भवली या राज्याची ती पहिलीच निवडणूक होती काँग्रेस-विरोधी मते विभागली जाऊ नयेत म्हणून प्र स पक्षाने यावेळी कम्युनिस्टांशी निवडणूक समझोता केला या समझोत्यास जयप्रकाश आणि लोहिया या दोघांचीही मान्यता होती ११८ सदस्यांच्या विधानसभेत प्र स पक्षाचे १९ आमदार निवडून आले आणि काँग्रेस अथवा कम्युनिस्ट या दोन्ही पक्षांना निर्णायक बहुमत मिळाले नाही तेव्हा मग काय करावयाचे? कम्युनिस्टां-बरोबर मत्रिमडळ बनविणे पक्षाच्या धोरणाविरुद्ध होते आणि काँग्रेसशी आघाडी करून सयुक्त मत्रिमडळ बनवायचे नाही हे अलाहाबादला ठरलेच होते या पेचप्रसगातून बाहेर पडण्याचा मार्ग मग सुचविण्यात आला अल्पमतवाल्या प्र स पक्षाने काँग्रेस मत्रिमडळास पाठिबा द्यावा असा तो पर्याय होता! । ससदीय लोकशाहीत असे प्रयोग होतात काँग्रेसने नाइलाजाने का होईना, या तोडग्यास समती दिली व तो अभूतपूर्व प्रयोग सुरू झाला वास्तविक देशातील सत्ताधारी काँग्रेस पक्षाबरोबर हे सहकार्यच होते अलाहाबादच्या धोरणाशी ते विसगत होते शिवाय ज्या कम्युनिस्टांच्या बरोबर जागाचे वाटप केले त्यांना डावलून आपल्या १९ सदस्यांनी काँग्रेसच्या छुप्या पाठिंब्या-वर मत्रिमडळ बनवावे ही गोष्ट मुळीच नैतिकतेची नव्हती प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यक्रमातील काही कलमे प्र स मत्रिमडळाने ताबडतोब अमलात आणली, पण अधिक मूलग्राही कार्यक्रम हाती घेणे या मत्रिमडळास अशक्य होते कारण काँग्रेसच्या पाठिंब्यावरच त्याचे जगणे-मरणे अवलबून होते कुळकायद्याचे विधेयक पुरोगामी स्वरूपात ते आणू शकले नाहीत"

या विदारक उदाहरणावरून भोंगळपणा आणि सत्तेचा लोभ याचे नातेही स्पष्ट होते जर कार्यक्रम हाच हिरो असता तर कार्यक्रम अमलात आणण्यासाठी जे वचनबद्ध होतील फक्त त्याच्याशी एकजूट होऊ शकली असती पण समाजवाद्यानी कार्यक्रमापेक्षा व्यक्तीच हिरो केल्यामुळे सत्तेचा लोभ हाच निर्णायक ठरला। अखेर हा पक्षही नाहीसा करण्याची महान कामगिरी या समाजवाद्यांच्या

हातून पार पडली। एकेकाळी पंतप्रधान पंडित नेहरूंची मंत्रिमंडळात येण्याची ऑफर नाकारणारे नेते अखेर मोरारजींशी हातमिळवणीने निवडणुका लढवित राहिले पक्ष बुडविला, कार्यक्रम मोंगळ बनविला आणि निवडणूक लढविणारे 'हिरो' शिल्लक उरले। 'मोरारजी बदलले' असा भोंगळपणाचा कळस गाठणारा युक्तिवाद करतानाही कुणी कचरले नाही कार्यक्रमालाच प्रॅक्टीकल सोशॅलिझम 'हिरो' मानतो व्यक्तिनिष्ठ तसेच व्यक्तिद्वेषाच्या राजकारणाचा कोणता परिणाम होतो तो तपासण्यासाठी कैलासवासी प्रजासमाजवादी पक्षाचा आणि समाजवादी पक्षाचा इतिहास पहावा हा इतिहास म्हणजे प्रत्यक्ष अनुभव आहे आणि सिद्धांताची परीक्षा प्रत्यक्ष अनुभवानेच होते म्हणून किमान क्रांतिकारक कार्यक्रमाशी वचनबद्धता हाच मार्ग आहे।

हाच मार्ग ९९ टक्के लोकाचे राजकारण सुरू करून लोकांना आकर्षित करील भारतात सत्तापालट लाटानी होतो आणि साठ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली असलेल्या देशात भोंगळपणा सोडून सुस्पष्ट कार्यक्रमनिष्ठ मार्गानेच गेले असता एकजूट अभंग राहून त्याचीही लाट येईल। एरवी प्रस्थापित सरकार आणि भोंगळ विरोधी पक्ष यात लोकाना त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने फरकच दिसत नसल्याने त्याचा कौल प्रस्थापितालाच पडत राहील।।

कुणीही निवडून आले तरी आपल्या भाग्यात बदल काहीच होणार नाही असे आज मतदार म्हणतात, पण त्याच्यासमोर त्याच्या भाग्यात निश्चित बदल घडविणारा पर्यायी कार्यक्रम मांडला तर तो विजयी झाल्याशिवाय रहाणार नाही

: ९ :

# टीकाकारांच्या शंकांचे निरसन

प्रॅक्टीकल सोशॅलिझमच्या विचारसरणीवर १९८४ सालात जी टीका झाली त्या टीकेची दखल घेऊन विविध शकांचे निरसन प्रश्नोत्तराच्या रुपात केले आहे सदर प्रश्न वृत्तपत्रांतून तसेच नियतकालिकातून विचारण्यात आले होते. व्यक्तिगत चर्चेतही उपस्थित झाले होते.

**प्रश्न**—प्रॅक्टीकल सोशॅलिझम अर्थात व्यवहारी समाजवाद हा शद्बप्रयोग तुम्हाला कसा सुचला ?

**नीलकठ खाडिलकर**—'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' हा शद्बप्रयोग अचानक सुचला आणि फार आनद झाला समाजवाद–साम्यवाद अशा विचारधाराचे वाचन-मनन अनेक वर्षे केले होते त्याबाबत जे कोडे होते ते उलगडल्यानतर, जे उमजले होते ते 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' या शब्दांनी अचूक टिपले याचा हा आनद होता

वास्तविक हे दोनही शद्ब इग्रजी आहेत, पण त्याचे भाषांतर केल्यास भारतातील विभिन्न भाषात वेगवेगळे होईल त्याऐवजी 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' असा शद्बप्रयोग वापरला तर भारतात सर्वत्र समान नांव राहील आणि समजेल, कारण दोनही शद्ब वेगवेगळ्या भाषिकांना परिचितच आहेत जे सागायचे आहे ते या शद्बांनी पकडले आहे शिवाय नावापासूनच कर्मठपणाला नकार आणि प्रॅक्टीकल दृष्टीकोनाचा स्वीकार सुरु झाला, नाही का ?

## स्वप्नाळूपणापासून फारकत

**प्रश्न**—तुम्हाला जे कोडे होते ते उलगडले असे म्हणालात पण कोडे कोणते होते ?

**नीलकंठ खाडिलकर**—त्याचे विवेचन 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' या पुस्तकात विस्ताराने केले असून थोडक्यातही सागता येईल

महान समाजवादी विचारवतानी आपल्या विचाराची मांडणी फार तर्कशुद्ध केली आहे कुठे फट कशी ती सापडणार नाही त्यांच्या युक्तिवादाची बांधणी इतकी चिरेबद असते की, अशा दोन विचारवतांचे परस्परविरोधी मते माडणारे ग्रथ जर सामान्य माणसाने वाचले तर त्याला दोघाचेही पटते ! पण त्याच्या बिनतोड गणिताप्रमाणे प्रत्यक्षात मात्र घडत नाही

त्याचे कारण असे की, या तत्त्ववेत्त्यांनी गणिती सिद्धान्त मानवी जीवनाविषयी माडले आहेत, पण मानव एखाद्या जड वस्तुप्रमाणे गणितात बसत नाही पाण्याचे तपमान १०० अंश सेंटिग्रेडवर नेले तर त्याला उकळी फुटणारच आणि तपमान शून्याखाली ४ अशावर नेले तर पाण्याचा बर्फ होणारच मानवी मनाची प्रतिक्रिया इतकी नियमबद्ध होऊ शकत नाही समाजवादी विचारवतानी काम-क्रोध-लोभ-मद-मत्सर-मोह हे सहा विकार-षड्रिपु हिशेबात न घेता माडणी केली आहे गौतम बुद्ध जिला तृष्णा म्हणतात त्या तृष्णेची दखल न घेता समाजवादी तत्त्वज्ञान्यांनी मानवाचे गणित सोडविले आहे तृष्णेचा मानवी बुद्धीवर आणि त्यामुळे आचरणावर प्रभाव पडतो माणसाला कळले तरी वळत नाही ते तृष्णेमुळेच मार्क ट्वेनचा एक विनोद फारच विदारक आहे तो म्हणाला, "तुम्ही जर रस्त्यावरील उपेक्षित कुत्रा घरी आणलात आणि त्याचे पालनपोषण केलेत तर तो तुम्हाला चावणार नाही ! अशी हमी माणसाबाबत देता येणार नाही हा मुख्य फरक आहे !" विकाराचा माणसाच्या बुद्धीवरील प्रभाव या विनोदात मार्मिकपणे सुचविला आहे

मानवी षड्रिपुची दखल न घेतल्यामुळेच समाजवादी विचारवतांच्या विचारानी स्वप्नाळू आदर्शवादी वळणे घेतली प्रॅक्टीकल सोशॅलिझमचा विचार मानवाचे षड्विकार आणि मानवाचा अपुरेपणा यांचे पूर्ण भान ठेवतो यामुळे हवेत तरगत न जाता त्याचे पाय जमिनीवरच भक्कम रहातात मानवी विकारांचे नियत्रण करून त्याना विधायक वळण देणारी आणि मानवी अपुरेपणाची दखल घेणारी ही विचारसरणी आहे या विचारप्रणालीत लोकांना मथमीत करणारा अतिरेकीपणा नाही आणि दिशाभूल करणारा भोगळपणाही नाही. भारतीय भूमीत निश्चितपणे रुजेल व उगवेल असा हा अस्सल भारतीय, निखळ राष्ट्रवादी आणि स्वप्नाळूपणाला थारा न देणारा सुस्पष्ट समाजवादी विचार आहे !

## नवहिंदुत्वाचा आरोप मतलबी

**प्रश्न**—प्रॅक्टीकल सोशॅलिझम म्हणजे नवहिंदुत्ववाद आहे या आरोपाबद्दल तुमचे काय म्हणणे आहे ?

**नीलकंठ खाडिलकर**—प्रथम उपेक्षा, नंतर बदनामी आणि अखेर प्रत्यक्ष हल्ले हे तंत्रच असते प्रॅक्टीकल सोशॅलिझमच्या उपेक्षेचा प्रयत्न फसलाच नाही तर अंगलटही आला पूर्वी 'ब्रम्हवृंद' ज्याप्रमाणे वाळीत टाकत असत त्याप्रमाणे शेठजींनी ठेवलेल्या विशिष्ट संपादकांनी आपल्या वृत्तपत्रांत 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' चे नावही येता कामा नये अशा सूचना दिल्या मतलबी पुढाऱ्यांनीही कटाक्षाने उल्लेख टाळला पण यामुळे 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'च्या अस्सलपणाची लोकांना आणखी खात्री पटली आणि प्रसार अधिकच जोरात झाला याच वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा 'प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत संसदीय लोकशाही' हा ज्वलंत विचार डॉ आंबेडकर व्याख्यानमालेतील एक पुष्प गुंफताना मी लोकांसमोर आणला हा विचार गेल्या चाळीस वर्षांत पद्धतशीर उपेक्षेने कसा मारला गेला तेही स्पष्ट केले आणि हाच विचार प्रॅक्टीकल सोशॅलिझमचा अग्रदूत कसा ते साधार मांडले त्यामागोमाग पँथर नेते भाई संगारे यांनी रविंद्र वागडे यांच्यासह 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फरंट'ची स्थापना केली यानंतरच नवहिंदुत्ववादाचा आरोप सुरू झाला।

या आरोपाचा आधार कोणता ? तर 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'च्या पुस्तकात ही विचारसरणी स्वीकारण्याचे हिंदूंना खास आवाहन केले आहे या देशात हिंदू बहुसंख्य आहेत आणि हिंदूंना खास आवाहन केलेच पाहिजे विशेषत लोकशाहीत कोणताही विचार बहुसंख्याकांना पटविल्याशिवाय अमलात कसा आणणार ? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पंडित नेहरूंना व कॉंग्रेसला सतत आवाहन केले, पण म्हणून त्यांना कुणी नेहरूवादी किंवा कॉंग्रेसवादी ठरविले नाही त्यांनी प्रकृतीकडे दुर्लक्ष करून हिंदू कोड विधेयक तयार केले आणि पुराणग्रंथाचा अभ्यास करून सनातनी हिंदूंना सुधारणेचे आवाहन केले पण त्यांना कुणी नवहिंदुत्ववादी म्हटले नाही जर प्रॅक्टीकल सोशॅलिझमचा अमल पाकिस्तानात करावयाचा असेल तर खास आवाहन करून मुस्लीमांना पटवून द्यावे लागेल की, सनातनी धर्मांध नेते सामान्य जनतेला दारिद्र्यात आणि अज्ञानात डांबण्यासाठी धर्माचा मतलबी अर्थ सांगत आहेत आणि फसवणूक करीत आहेत

शिवाय 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' पुस्तकात फक्त हिंदूंना आवाहन आहे असे भासविणे साफ खोटेपणाचे आहे त्यात स्पष्ट म्हटले आहे की, ''समाज-

वाद दलिताचे प्रश्न सोडविलच, पण दलितांनीच नेतृत्व केले तर भारताचे नेतृत्व करण्याची अशक्य वाटणारी संधी त्यांना मिळू शकेल" दुसऱ्या ठिकाणी म्हटले आहे की, "आजचे नेते भारतात जातीयता आणि धार्मिक वितुष्ट निवडणुकी जिंकण्यासाठी पोसत आहेत पण समाजवादी नेत्यांना सर्वांत प्रखर विरोध जातीयतेलाच करावा लागेल" आणखी एक प्रतिपादन पहा—"समाजवाद हा मुस्लीम जनतेच्या, मुस्लीम स्त्रियांच्या, ख्रिश्चनांच्या विरोधासाठी नसून, त्यांची पुराणमतवादी धर्म मार्तंडांच्या कचाट्यातून मुक्तता करण्यासाठी आणि त्यांचीदेखील अफाट प्रगती करण्यासाठी आहे"

## धर्म घरात व प्रार्थनास्थळात मर्यादित करा

"धर्म घरात आणि प्रार्थनास्थळात मर्यादित करा" ही प्रॅक्टीकल सोशॅलिझमची घोषणा आहे प्रॅक्टीकल सोशॅलिझमच्या कार्यक्रमातील ते महत्त्वाचे कलम आहे राजकारणाने धर्मात हस्तक्षेप करता कामा नये आणि विकासाच्या राजकारणाच्या आड येणारे धर्मवेड खपवून घेता कामा नये अशी स्वच्छ व स्पष्ट भूमिका आहे त्यानुसार 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' च्या पुस्तकात कार्यक्रमाच्या सहाव्या कलमात नि:संदिग्धपणे म्हटले आहे—"हिंदू समाजातील पुजारी आणि मुस्लिमांतील मुल्ला-मौलवी किंवा अन्य धर्मप्रमुख यांनी स्वत:चे प्रस्थ माजविण्यासाठी धर्माच्या नावाखाली समतेला हरताळ फासणारे जे अन्यायकारक नियम केले आहेत त्यांचा मुलाहिजा ठेवला जाणार नाही—समतेविरुद्ध किंवा राष्ट्रीय धोरणाविरुद्ध कोणताही धार्मिक नियम सांगणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल—मात्र घरापुरता व प्रार्थनास्थळापुरता धर्म प्रत्येकाला पाळता येईल हे ठासून सांगितले पाहिजे"

या बाबतीत प्रॅक्टीकल सोशॅलिझमची विचारसरणी रोखठोक आहे आणि त्यामुळेच मुंबई महापालिकेचे वॉर्ड ऑफिसर जी ए खैरनार यांनी फूटपाथवरील बेकायदा धर्मस्थळे तोडताच फक्त प्रॅक्टीकल सोशॅलिझम मानणाऱ्यांनी फेब्रुवारी १९८५ मध्ये ताबडतोब दणदणीत जाहीर सत्कार करून पाठिंबा दिला तोडलेल्या धर्मस्थळात एक दर्गा, तीन क्रॉस आणि हिंदूंची अनेक देवालये होती सत्कार समारंभात स्पष्टपणे सांगण्यात आले की, "कोणत्या धर्माची बेकायदा धर्मस्थळे तोडली याच्याशी आम्हाला कर्तव्य नाही रस्त्यावरील बेकायदा धर्मस्थळे तोडली म्हणून आम्ही सत्कार करीत आहोत"

## डिपॉझिट जप्तचे एकजातीय राजकारण

**प्रश्न**—राजकारणाचा पाया व्यापकच असला पाहिजे असे तुम्ही आग्रहाने का सांगत असता?

**नीलकंठ खाडिलकर**--आज भारतात क्रांतिकारक बदल हवा आहे एकाच जातीचे आणि त्यातही गटबाज राजकारण करून असा बदल घडविता येणार नाही एकजातीय राजकारणामुळे निवडणुकीत डिपॉझिट जप्त होते याचा यथेच्छ अनुभव आला आहे एका धर्माचे राजकारणसुद्धा चालत नाही, तिथे निव्वळ जातीचे काय होणार? अशा राजकारणाने तमाम जनतेची अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-रोजगार-औषध उपचार याची किमान गरज पूर्ण करता येत नाही जनतेचे मूलभूत प्रश्न सुटण्याऐवजी समाजात जाती-धर्मांचे विषारी वितुष्ट माजते आणि गरीब जनता भरडली जाऊन फक्त पुढाऱ्यांचे प्रश्न सुटतात स्वतःचे प्रश्न सोडवून घेतलेले आणि घेत असलेले डझनावारी एकजातीय गटबाज पुढारी आहेत, पण ते काडीमात्र बदल घडवू शकत नाहीत कारण डबक्यात राहून समुद्राचा स्वामी होता येत नाही आणि अर्थातच राजकीय–आर्थिक–सामाजिक रचना बदलता येत नाही प्रॅक्टीकल सोशॅलिझम अशी जाणीव करून देत आहे की, एक टक्का वर्गाची आज चगळ सुरू असून, ९९ टक्के लोकांना लुटून ही लयलूट चालली आहे म्हणून क्रांतिकारक समाजवादी कार्यक्रमावर ९९ टक्के लोकाची एकजूट बांधणे हाच मूलभूत बदल घडविण्याचा एकमेव मार्ग आहे डॉ बाबासाहेब आंबेडकरांना 'महारांचे नेते' ठरविणे जितके चुकीचे आणि मतलबी तितकेच प्रॅक्टीकल सोशॅलिझमच्या अशा क्रांतिकारक व्यापक विचारावर नवहिंदुत्ववादाचा शिक्का मारणे चुकीचे आणि मतलबी आहे

धर्मांधता आणि जातीयता यांच्यावर प्रॅक्टीकल सोशॅलिझम हा प्रहारच आहे पाणी आणि अग्नी ज्याप्रमाणे एकत्र नांदू शकत नाहीत त्याचप्रमाणे प्रॅक्टीकल सोशॅलिझम आणि जातीयता एकत्र राहू शकत नाहीत हा कार्यक्रम जातीयता मुळापासून तोडू पहातो

सध्याच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेत जातीयता जोपासली जाते लोकसभेपासून ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपर्यंत जात पाहून उमेदवार उभे केले जातात आणि जातीय प्रचार करीतच मते मागितली जातात एरवीसुद्धा पुढारीपणासाठी जातीचाच वापर केला जातो आणि लोकांचे भले न करताही निवडून येण्यासाठी जातीयताच भडकविली जाते

घरात डास फार झाले तर घरांतील डास मारून डास संपत नाहीत घराभोवतीची गटारे किंवा दलदल स्वच्छ केली तरच डासांची निर्मिती थांबून घरातील डास नाहीसे होतात म्हणून प्रॅक्टीकल सोशॅलिझम जातीयता जोपासणाऱ्या विषमतेच्या आणि एक टक्का वर्गाच्या हुकूमशाही व्यवस्थेवर हल्ला करीत आहे ही अन्याय करणारी व्यवस्था म्हणजे दलदल व दुर्गंधी असून

ती दूर केल्यानेच जातीयता ढासळत जाईल निव्वळ शोभेच्या भाषणानी आणि ठरावानी जातीयतेला ओरखडासुद्धा जात नाही समोवताली दुर्गंधी असताना व्यासपीठावर अत्तरे शिंपडून काय उपयोग ?

## सामान्यांचे जीवन कसे संपते ?

**प्रश्न**--तुम्ही सोविएत रशियाची स्तुती करता याबद्दल काहीजणांचा आक्षेप आहे

**नीलकंठ खाडिलकर**--या आक्षेपाला माझे उत्तर असे की, एकदा नव्हे, तर दहादा स्तुती करीन स्तुती का करतो ते नीट समजावून घ्या

भारतात साठ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत त्यांचे जीवन कसे जाते ? कोणत्या धडपडीत सपते ?

आईबाप गरीब असतात, पण आपल्यासारखे दुःख आपल्या मुलाला भोगावे लागू नये म्हणून दिवसरात्र काबाडकष्ट करतात स्वत उपाशी रहातात आणि मुलाला सकस अन्न देतात

मुलगा तीन वर्षांचा होताच ते एका नामांकित किंडरगार्टनमध्ये मुलाचे नांव घालायला धावतात त्याला छानशी पँटशर्ट आणि लहानसे बूट-मोजे घालून नेतात पण किंडर गार्टनमध्ये कळते की, मुलाचे नाव मूल जन्मल्या-बरोबरच नोंदवावे लागते! शिवाय डोनेशनची कुवत हवी तर प्रवेश मिळतो मग आईबाप तो नाद सोडून मुलाला एका बालवाडीत घालतात बालवाडी सपल्यावर शाळेत पाठवितात पुस्तके-वह्या-सहली सारा खर्च करीत रहातात अधिकाधिक राबत रहातात

दहाजणात एकादे कुटुंब त्यातल्या त्यात सुदैवी असते मुलगा नीट अभ्यास करतो आईबाप घरी त्याला शिकवू शकत नसले तरी मुलगा शाळेत मागे पडत नाही किती तरी मुलाना शाळेत काय शिकवितात ते समजत नाही, घरीही कुणी शिकवू शकत नाही आणि मुले बिघडायला कधी वेळच लागत नाही पण हे कुटुंब त्यातल्या त्यात भाग्यवान आहे! हा मुलगा शिकतो शेवटी एस एस. सी उत्तीर्ण होतो

मुलगा एस एस सी ची गुणपत्रिका आणायला धावतो आणि बाप कॉलेजसमोरच्या प्रवेशाच्या रांगेत जाऊन नबर धरतो मुलाला एकदाचा प्रवेश मिळतो मग तो बारावीच्या परीक्षेत भरपूर गुण मिळवून डॉक्टर किंवा इंजिनियर व्हायचे ठरवितो अभ्यासात काहीही कसूर करीत नाही वर्गातील बड्याची मुले टिंगलटवाळी नि मौजमजा करीत असतात, पण तो कधी त्यात नसतो या बड्याच्या मुलाना परीक्षेचे पेपरच मिळतात आणि कमी अभ्यास करूनही ही मुले त्याला मागे टाकतात ज्यांना कमी गुण

मिळतात ते कॅपिटेशन फी देऊन प्रवेश मिळवितात त्याचे स्वप्न विरते मग धीर धरून तो पदवी मिळवितो आणि नोकरीच्या शोधात फिरत रहातो शेवटी दोन वर्षांनी नोकरी मिळते

मग पैसा साठवित रहातो व एक दिवस ब्लॉक घ्यायचे ठरवितो आईबापाना उपनगरात ब्लॉकमध्ये न्यायचे अशी त्याची इच्छा असते पण आईबाप अतिश्रमाने फार आजारी होतात ब्लॉकसाठी साठविलेले पैसे त्यांच्या आजारपणातच तो खर्च करतो, पण दोघेही सोडून जातात धीर धरून तो पुन्हा बचत करतो पचेचाळीसाव्या वर्षी वाढत्या किमतीत ब्लॉक घेतो लग्न होऊन त्याला चार मुले झालेली असतात आणि त्याच्यासाठी तो व त्याची बायको राबत असतात

ब्लॉक घेऊन तो रोज लोकलच्या अफाट गर्दीतून लोंबकळत नोकरी-साठी येजा करीत असतो या धकाधकीच्या आजवरच्या धावपळीचा नकळत परिणाम झालेलाच असतो एक दिवस स्टेशनवरच त्याला घेरी येते व गभीर आजारपण चालू होते हॉस्पिटलात प्रवेश मिळतो, पण औषधे विकत आणा-यला त्यालाच सांगितले जाते त्यासाठी शेकडो रुपये लागतात अखेर ब्लॉक विकून तो उपचार करून घेतो आणि मुलाचे शिक्षण पुरे करतो पण मुलानी ब्लॉक घेतलेला पहाण्यापूर्वीच तो व त्याची बायको मरण पावतात ! त्याच्यामागे असतात त्यांची मुले व त्या मुलाचे आयुष्य आता आईबापाच्याच वाटेने चाललेले असते ! कारण सामान्यजनाचे जीवन असेच चालते आणि सपते ! त्यात बदल काही होत नाही

**प्रश्न**—वा ! ही तर कादबरीसाठी किंवा कलात्मक चित्रपटासाठी अप्रतिम कथा झाली !

**नीलकंठ खाडिलकर**—जे कुणी साहित्यिक असतील त्यानी दारिद्र्याच्या वर्तुळात सापडलेले आणि त्यातून सहसा बाहेर पडू न शकणारे हे जीवन जरूर रगवावे ! भारतात कोट्यावधी सामान्य माणसाचे हेच आयुष्य आहे अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-नोकरी-औषध उपचार यासाठी रात्रदिन काबाडकष्ट करीत रहायचे आणि तरीही केवळ किमान गरजांशीही लपडाव खेळायचा !

**भारतात अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-नोकरी-औषध उपचार या किमान गरजांसाठी जन्मभर धडपड चालते, पण रशियात मुलाला जन्माला येताच जन्मसिद्ध हक्क म्हणून या गरजा प्राप्त होतात म्हणजे तुमचे जिथे जीवन सपते तिथून रशियातील जीवन सुरू होते !**

सोविएत रशियाची स्तुति यासाठी केलीच पाहिजे मूल कोणाच्या पोटी जन्माला आले त्यावर मुलाचे भवितव्य बिलकूल अवलबून नाही अशी

ही समाजव्यवस्था आहे समान आणि मोफत शिक्षण, पदवी मिळण्यापूर्वीच एक वर्ष अगोदर तुमच्या पसतीच्या नोकरीवर नेमणूक आणि रुजू होईतो निम्मा पगार, उत्पन्नाच्या सहा टक्के भाड्यात रहाण्यासाठी स्वतत्र ब्लॉक, मोफत व उत्तम औषध उपचार हे सारे हक्काने मिळते यापैकी कोणतीही गोष्ट आईबापावर अवलबून नाही

म्हणून मी सोविएत रशियाची मनापासून स्तुती करतो एकदा नव्हे तर दहादा करतो

## पर्यायाची लाट निर्माण होईल

प्रश्न – भारतात आज नेमके काय केले पाहिजे ?

**नीलकठ खाडिलकर** .— (१) सर्वप्रथम एक टक्का वर्ग विरुद्ध ९९ टक्के जनता असे सघर्षाचे स्वरुप स्पष्टपणे समाजापुढे ठेवले पाहिजे

(२) अत्यत सुस्पष्ट असा ९९ टक्के लोकाच्या फायद्याचा किमान क्रांतिकारक कार्यक्रम लोकांसमोर माडला पाहिजे त्या कार्यक्रमावर एकजूट बाधली पाहिजे आणि कार्यक्रम अमलात आणण्यासाठीच सत्ता हवी असे उद्दिष्ट स्पष्टपणे ठेवले पाहिजे

(३) यामुळे सत्ताधारी पक्षाला खणखणीत असा पर्याय निर्माण होईल आज लोकाना केवळ सत्ताधाऱ्यात बदल नको असून स्वत च्या भाग्यात बदल हवा आहे. क्रांतिकारक कार्यक्रमाचा पर्याय लोकाना हवा आहे भारतातील निवडणुकीत कोणत्या तरी एकाच बाजूने लाट येत असते याचा अर्थ बदल घडविण्यास लोक आतुर आहेत आणि जो बदल घडविल असे वाटते त्याला सत्तेचे दान लोक उदारहस्ते करतात बँकांच्या राष्ट्रीकरणानतर याच अपेक्षेने इदिराजीची लाट आली आणि खलिस्तान्याच्या खुनी राजकारणानतरही अशाच अपेक्षेने राजीव गाधींची लाट निर्माण झाली १९७७ सालची जनता पक्षाची लाटही बदल घडविण्यासाठीच आली होती अशीच लाट प्रॅक्टिकल सोशॅलिझ-मच्या क्रांतिकारक बदलाची हमी देणाऱ्या पर्यायाची निश्चितपणे येईल

(४) आजचे वृद्ध विरोधी पक्षनेते म्हणजे पक्चर झालेले टायर आहेत सत्ताधारी प्रमुखांचा द्वेष आणि त्याच्याविरुद्ध विचारशून्य व बदलशून्य अशी भोंगळ आणि भोंदू निवडणूक आघाडी हा प्रयोग जनतेला अमान्य झाला आहे आणि "आपल्या नशिबात काय फरक होणार ?" असे पुटपुटतच मतदार मतदान करतात हीच वेळ आहे निश्चित विचारसरणीचा आणि क्रांतिकारक कार्यक्रमाचा आवाज उठविण्याची आणि त्यालाच हिरो बनविण्याची !

(५) प्रॅक्टीकल सोशॅलिझमच्या कार्यक्रमात लोकांना भयभीत करणारा अतिरेक नाही, एकाच वर्गाला क्रांतीचा दूत मानण्याची पोथीनिष्ठा नाही आणि

कसल्याही बदलाची आशाच नाहीशी करणारा भिन्न विचारांच्या मंडळींनी केवळ मतांच्या बेरजेसाठी केलेल्या आघाडीचा भोंगळपणा नाही

६) ही लढाई एक टक्का विरुद्ध ९९ टक्के अशी असल्याने लोकशाही मार्गाने विजयी होणारच आणि तसा विश्वास सर्वांना वाटणारच

(७) बावनकशी राष्ट्रनिष्ठा, प्रत्येकाला जन्मतःच अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-नोकरी-औषध उपचार यांची हमी देणारा क्रांतिकारक सुस्पष्ट कार्यक्रम, समाजवादाची प्रस्थापना करून त्यासमवेत लोकशाही ही प्रॅक्टीकल सोशॅलिझमची त्रिसूत्री आहे स्वतः व स्वतःचे कुटुंबिय यांच्यामार्फत चालविण्यात येणारा छोटा उद्योगधंदा किंवा शेती किंवा दुकानदारी यांना अभय राहीलच, पण सरकारी अधिकारी त्यांच्यापर्यंत जाऊन त्यांना जास्तीत जास्त सहकार्य देतील फक्त मक्तेदारी मांडवलशाही संपविली जाईल तसेच एका व्यक्तीला एकाच कंपनीचे संचालक होण्याची मुभा राहील सध्या एकच बडा मांडवलदार अनेक कंपन्यांचा संचालक बनतो प्रत्येक कंपनी ही दुभती गाय असून जास्तीत जास्त पिळून तिचे दूध पळवायचे या एकमेव धोरणाने तो कारभार करतो कोणतीही कंपनी बंद पडली तरी त्याचे काहीच कधी बिघडत नाही जर एकच कंपनी त्याच्या-कडे असेल तर मक्तेदार साम्राज्याला तडा जाईलच, पण त्या कंपनीत त्याला लक्ष घालावे लागेल व लक्ष देताही येईल तसेच मक्तेदार मांडवलशाहीच्या साखळीतून वृत्तपत्रसृष्टीची मुक्तता होईल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

# भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नेमके काय हवे होते ?

स्टेट अ‍ॅण्ड मायनॉरिटीच्या
भाषांतरासह आणि विवेचनासह

: १० :

# ब्राह्मणांची 'रोजगार हमी'

प्राचीन काळातील ज्ञानाचा खजिना संस्कृत भाषेत होता आणि संस्कृत भाषा कडीकुलपात होती बहुजनसमाजाला संस्कृत भाषा शिकण्यास धर्माच्या नांवाखाली बंदी होती ज्ञान हे मंदिर आहे, पण या मंदिराच्या दरवाजात संस्कृत भाषेचा रखवालदार बसला होता हा रखवालदार स्त्रियांना, शूद्रांना आणि अन्य बहुजनांना ज्ञानाच्या मंदिरात सोडतच नव्हता संस्कृत भाषा शिकण्यास जशी बंदी होती तशीच लोकांना समजणाऱ्या भाषेत संस्कृतातील ज्ञान आणण्यास बंदी होती तो काळ असा होता की,

**जे जे आपणासी ठावे। ते ते संस्कृतात लपवावे**
**अडाणी करोनि सोडावे बहुजन**

ज्ञानेश्वर महाराजांनी तेराव्या शतकात संस्कृतातील गीता——श्रीकृष्णाने रणांगणावर अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त करण्यासाठी सांगितलेली गीता——मधुर मराठीत बहुजनसमाजाला बहाल केली शालिवाहन शके १२१२ मध्ये (इसवी सन १२९०) सोळा वर्षांच्या ज्ञानेश्वराने ज्ञानेश्वरीची रचना पूर्ण केली ज्ञानाच्या मक्तेदारीविरुद्ध पुकारलेले हे पहिले बंड ! मात्र या बंडाचे महत्त्व लाक्षणिकच होते, कारण त्यानंतर आणखी जवळजवळ साडेपाचशे वर्षे मक्तेदारी अभंग टिकली !

एकोणिसाव्या शतकात ब्रिटीशांची राजवट भारतात पक्की झाली. १८१८ साली पेशवाई बुडाली ब्रिटीशांबरोबरच भारतात इंग्रजी भाषा आली जगातील आधुनिक ज्ञान इंग्रजी भाषेत होते यामुळे इंग्रजी भाषेबरोबरच जगातील ज्ञानाचे वारे भारतात वाहू लागले या नवविचारामुळे माणसाने

निर्माण केलेल्या आणि ईश्वराच्या नांवाने हजारो वर्षे खपविलेल्या विलक्षण विषमतेला हादरे बसू लागले ज्ञानमंदिराच्या बंद खिडक्या क्वचित उघडझांप करू लागल्या

इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यानंतरही मक्तेदारीला भगदाड पडण्यासाठी जवळजवळ एक शतक लागले एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकातही ज्ञानाची मक्तेदारी कडेकोट होती उदाहरणार्थ, २ ऑगस्ट १८५३ चा 'ज्ञानोदय'चा अंक पहा त्यात म्हटले आहे––"१८२० साली ब्रिटीशांनी पुण्यातील ब्राम्हणांकरिता संस्कृत पाठशाळा सुरू केली तीस वर्षांनंतर त्या पाठशाळेत ब्राम्हणेतर हिंदू मुलांना प्रवेश द्यावा असे इंग्रजांनी ठरविले पण पाठशाळेतील बहुतेक ब्राम्हण शिक्षकांनी कडाडून विरोध केला जवळजवळ सर्व अध्यापकांनी राजीनामे दिले" यावरून ज्ञानाची मक्तेदारी कायमच होती आणि मक्तेदारीविरुद्ध फक्त हालचाल सुरू झालेली होती असे स्पष्ट होते

## महात्मा फुले व डॉ. आंबेडकर

इंग्रजी भाषेतील नवविचारामुळे जोती फुले यांचे महात्मा जोतिराव फुले झाले ! भीम रामजी आंबेडकरांचे प्रकांड पंडित घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, एम ए पीएच् डी, डी एस सी, बार-ॲट-लॉ झाले ! जोतिराव फुले (जन्म १८२७–मृत्यू २८ नोव्हेंबर १८९०) यांनी फ्रेंच राज्यक्रांतीने पुकारलेले समतेचे स्वातंत्र्याचे आणि बंधुत्वाचे विचार वाचले आणि त्यांच्या नजरेसमोर प्रचंड प्रकाश फाकला माणसा–माणसातील विषमता ही ईश्वराची करणी नव्हे तर माणसाचीच करणी आहे हा प्रकाश पडताच, भारतात शेकडो जातींची उतरंड रचणाऱ्या धर्मकल्पनावर त्यांनी पायामापून घाव घातले शिक्षणाचे महत्त्व सर्वांना बजावून सांगितले 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाच्या प्रारंभीच ते म्हणतात की, "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके सर्व अनर्थ एका अविद्येने केले" मिस कुक नावाच्या युरोपियन स्त्रीने इ स १८२१ साली कलकत्त्यात मुलींची शाळा सुरू केली ती भारतातील पहिली मुलींची शाळा होय १८२४ साली अमेरिकन मिशनरींनी मुंबईतील पहिली मुलींची शाळा स्थानिक लोकांसाठी सुरू केली मिस कुक यांनी डॉ विल्सनशी विवाह केल्यानंतर, १८२९-३० मध्ये मुलींसाठी सहा शाळा सुरू केल्या व त्यात २०० मुली कडव्या विरोधाला तोंड देत जात असत (पान १५–हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स, हुजुरपागा, पुणे याचा सुवर्णमहोत्सव स्मारक ग्रंथ) या सर्व मिशनरी प्रयत्नांचा मूळ उद्देश धर्मप्रसार होता तथापि, ज्या भारतीयाने अस्पृश्यांची शाळा व मुलींची

शाळा सर्वप्रथम काढली आणि शेकडो वर्षांच्या लादलेल्या अज्ञानाच्या दरीतून त्याना बाहेर खेचण्याचे उद्दिष्ट ठेवले ते म्हणजे महात्मा जोतिबा फुले ! महात्मा फुले यानी पुण्यात १८४८ साली अस्पृश्यांसाठी पहिली शाळा स्थापन केली आणि १८५१ साली मुलीसाठी पहिली शाळा सुरू केली शिक्षक मिळेनात म्हणून खुद्द आपल्या पत्नीला सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका बनविले ! एकोणिसाव्या शतकातील पुण्यातील आणि सपूर्ण देशातील ही महान क्रांति-कारक घटना होती ! पण अस्पृश्यांसाठी बुधवार पेठेत भिड्यांच्या वाड्यात एक शाळा आणि रास्ता पेठेत चिपळूणकराच्या वाड्यात मुलीसाठी शाळा इतकीच वाटचाल १८५१ पर्यंत पुण्यात झाली होती त्यालाही विरोध होता

यावरून असे दिसते की, इग्रजी भाषा शिकलेल्या व इग्रजी ग्रथ वाचणाऱ्या काहीजणानी हजारो वर्षांच्या अधारकोठडीत पहिला सूर्यकिरण एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत आणला होता, पण मक्तेदारी कोलमडली नव्हती त्यानतर शभर वर्षांनी जिकडेतिकडे प्रकाश फाकला इतका की, पूर्वी अधारकोठडी होती हेही आज सांगावे लागते ! त्यासाठी कितीकानी हयातभर कष्ट उपसले बडोद्याचे सयाजीराव महाराज, कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज या साधनसपन्न सस्थानिकानी मन पूर्वक सहकार्य दिले त्यातूनच डॉ बाबासाहेब आबेडकरांचे (-जन्म १४ एप्रिल १८९१, मृत्यू ६ डिसेंबर १९५६) अफाट व्यक्तिमत्व आणि प्रकांड पांडित्य उदयाला येऊन आजन्म त्याग-कष्टाने त्यानी या नव्या विचारचक्राला सर्वांत मोठी गती दिली !

## दगड आणि पुतळे

समाजसुधारक ज्या सुधारणेसाठी झगडतात ती सुधारणा त्यांच्या हयातीनतरच फोफावते फळाफुलानी बहरते पण त्याच्या हयातीत फक्त बीज पेरले जाते त्याना दगडच खावे लागतात समाजसुधारकाला जन्मभर लोक दगड मारतात आणि मृत्यूनतर त्याच्या कार्याचे मोल उमजल्यावर काय करतात ? ज्या दगडानी समाजसुधारकाला जखमी केले तेच दगड गोळा करून लोक त्याचे पुतळे उभारतात ! महात्मा फुले यांना 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक छापण्यास पैशांची विवचना पडली होती तसेच त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' १८८३ साली पूर्ण केले, पण पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध होण्यासाठी १९६७ साल उजाडले ! ही उदाहरणे सर्व काही सागून जातात

देशाच्या स्वातत्र्यासाठी झगडणाऱ्या राजकीय नेत्याचे तसे नसते तेही प्राण तळहातावर घेऊनच लढतात, पण लोकाचा जयजयकार ऐकत मृत्युमुखी जातात किंवा जर भाग्य असेल तर हयातीतच स्वातत्र्य मिळून सत्ताधारीही होतात समाजसुधारक आणि स्वातत्र्ययोद्धे या दोघाचाही मार्ग खडतरच,

पण खडतर मार्गावर समाजसुधारकाला 'मुर्दाबाद'च्या घोषणा आणि स्वातंत्र्य-सेनानीला "झिंदाबाद"च्या घोषणा ऐकू येतात

## रोजगार हमी-पूर्वीची व आताची

संस्कृत भाषेच्या मक्तेदारीमुळे काय झाले होते? बहुजनसमाजाला संस्कृत शिकण्यास बंदी असल्यामुळे ब्राम्हण सांगतील तो धर्म अशी स्थिती शेकडो वर्षे ओढवली होती त्यातूनच कर्मकांड निर्माण झाले इतकी कर्मकांडे निर्माण करण्यात आली की, गांवात भोजन-दक्षिणेसह क्रियाकर्मांतर करण्याचे निमंत्रण भटजीला रोज मिळू लागले! माणूस मेला तरी भोजन व दक्षिणा, माणूस जन्माला आला तरी भोजन व दक्षिणा आणि माणूस जिवंत असला तरी पूर्वजाचे श्राद्ध-पक्ष करण्यासाठी भोजन-दक्षिणा! हिंदू धर्मातील पितराचे श्राद्ध-पक्ष आणि विविध धार्मिक कर्मकांड म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, आजच्या भाषेत सांगायचे तर ती "भिक्षुकाची रोजगार हमी" होती! शेकडो वर्षे चालली होती!

इंग्रजी भाषेतून नवविचारांचे वारे भारतात वाहू लागले आणि सामाजिक क्रांती सुरू झाली ब्राम्हणांची रोजगार हमी बुडत चालली पण ज्या इंग्रजी भाषेने संस्कृत भाषेची आणि संस्कृत भाषेतील ज्ञानाची मक्तेदारी तोडली ती इंग्रजी भाषाच अखेर नव्या मक्तेदारीला कारण झाली हा केवढा अजब प्रकार आहे! औद्योगिकरणाने देशाची संपत्ती वाढविली, पण त्यातून अत्यल्प व्यक्तींची मक्तेदारी माडंवलशाहीही निर्माण झाली तसाच हा प्रकार नव्हे का? इंग्रजी भाषा आजही फक्त पाच टक्के सुशिक्षितांना येते त्यापैकी दोन ते तीन टक्के लोकांना उत्तम इंग्रजी ग्रंथ वाचून चांगले समजू शकतात इतरांना चारचौघात इंग्रजी बोलून किंवा अर्धे इंग्रजी आणि अर्धे मराठी अशा थाटात बोलून आपले वेगळेपण प्रस्थापित करण्याइतकेच इंग्रजी येते त्याचा परिणाम असा झाला की, इंग्रजी येणाऱ्यांची नवी उच्च जात निर्माण झाली आहे! इंग्रजी भाषेमुळे त्यांना इतरांवर वरचष्मा ठेवता आला आणि त्यांचा हितसंबंध तयार झाला कारण इंग्रजी भाषेच्या ज्ञानातून त्यांच्यासाठी 'उत्तम रोजगाराची हमी' निर्माण झाली! कायदेकानू आणि कारभार, लेखन आणि वाचन, प्रचार आणि प्रसार इंग्रजीतूनच सुरू झाल्याने हा रोजगार तयार झाला या नव्या जातीने व त्यांच्या 'रोजगार हमी'ने घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार उपेक्षेने बाजुला सारले किंवा दिशाभूल करीत मांडले त्याची चर्चा यानंतर करू या

: ११ :

# पोकळ विचारवंतांची जन्मकथा

इंग्रजांना त्याचे भारतातील राज्य चालविण्यासाठी इंग्रजी जाणणारा सरकारी नोकराचा एक वर्ग हवा होता इंग्रजी भाषेतील शिक्षणामुळे इंग्रजांना असा वर्ग मिळाला किंबहुना तो इंग्रजांचा आधारस्तंभ झाला इंग्रजी शिकलेला हा जेमतेम दोन ते पाच टक्केच वर्ग तयार होत गेला ब्रिटीशांचे भारतातील राज्य ब्रिटीशांनी चालविले नाही तर इंग्रजी शिकलेल्या या नव्या वर्गाच्या नोकरशाहीने चालविले। इंग्रजी राज्यात भारतात भांडवलशाही उदयास आली आणि इंग्रजीत व्यवहार असल्याने या वर्गाला भांडवलशाहीचाही उदार आश्रय मिळाला। अशा प्रकारे या वर्गाचे सत्तेत व भांडवलशाहीत आर्थिक हितसंबधच निर्माण झाले इंग्रजी भाषेच्या जोरावरच सदर वर्गाने प्रचंड जनसमुहाला सत्तेच्या आणि अधिकाराच्या जागापासून आजतागायत दूर ठेवले उच्च शिक्षणापासून दूर ठेवले म्हणजे संस्कृत भाषेने जसा ज्ञानाचा मक्तेदार वर्ग निर्माण केला तसाच इंग्रजी भाषेनेही पुन्हा एकदा ठेकेदार वर्गच उदयास आला।। ज्ञानाचा खजिना पुनश्च बंदिस्तच राहिला म्हणजे असे म्हणता येईल की, संस्कृत भाषेचे कुलूप फोडण्यात आले, पण इंग्रजी भाषेचे नवीन 'लॉक' लावण्यात आले।!

अर्थात संस्कृत शिकण्यास जशी बंदी होती तशी इंग्रजी शिकण्यास केव्हाही बंदी नव्हती कुणीही इंग्रजी शिकावे पण प्रत्यक्षात मात्र मुख्यत पूर्वीचाच उच्चवर्णीय वर्ग इंग्रजी शिक्षण घेऊन 'यूवर मोस्ट ओबिडिअन्ट सर्व्हंट' (तुमचा अत्यंत आज्ञाधारक सेवक) म्हणवित सही करू लागला भारतात

इंग्रजी भाषा येऊन आता दीडशे वर्षे झाली, पण आजतागायत दोनपासून पाच टक्केपर्यंत लोकांचीच ती ठेकेदारी झाली इंग्रजी ग्रंथ वाचून नीटपणे समजू शकणारा वर्ग यापेक्षा अधिक कधी नव्हता आणि अधिक आता होणार नाही इंग्रजांना ठराविक नोकरवर्ग हवा होता आणि तेवढा मिळताच तळा-गाळात इंग्रजी भाषेचे शिक्षण पचविण्यासाठी त्यांनी खास प्रयत्न केले नाहीत स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची संधी प्रत्येकाला मिळावी यासाठी जरुर प्रयत्न झाले पण प्रत्येकाला समान शिक्षणाची संधी मिळावी असे धोरण आखले नाही व शिक्षणाचे राष्ट्रीकरण करण्यात आले नाही[1] कॉन्व्हेंट शाळा व पब्लिक स्कूल यातील शिक्षण वेगळे, पार्ले टिळक विद्यालयासारख्या शाळातील उच्च मध्यमवर्गीयांच्या मुलांचे शिक्षण वेगळे, गरीब मुलांचे म्युनिसिपल शाळातील शिक्षण वेगळे आणि गावातील शिक्षण वेगळे असे स्तर निर्माण झाले त्यातच उच्चवर्गीय व उच्चवर्णीय तज्ञांनी अमेरिकेवर नजर खिळवून अभ्यास-क्रमाचा एवढा बोजा लादला की, ज्यांचे आईबाप सुशिक्षित आहेत किंवा ट्यूशन लावण्याइतके धनिक आहेत किंवा प्रश्नपत्रिका मिळविण्याइतके आणि परिक्षकांपर्यंत पोचण्याइतके मातब्बर आहेत त्यांच्याच मुलांचा वरचष्मा राहिला पहिल्या पिढीत शिकणाऱ्यांची त्रेधा उडाली या कारणांमुळे इंग्रजी ग्रंथ वाचण्याइतके इंग्रजीचे ज्ञान किंवा दिखाऊ छाप पाडण्याइतके इंग्रजी संभाषणाचे चातुर्य केवळ उच्चवर्गीय व उच्चवर्णीय मुलांकडेच राहिले याच बळावर ते उच्च पदावर आरुढ झाले

## वाघिणीचे दूध आणि शेळ्या

इंग्रजी भाषा ही जागतिक ज्ञानाची गुरुकिल्ली आहे यात शंका नाही अद्यावत ज्ञानाची ती गुरुकिल्ली असून तिचे वर्णन 'विंडो टू दि वर्ल्ड' (नवविचाराचा वारा येणारी खिडकी) असे केले जाते तेही खरे आहे इंग्रजी भाषा म्हणजे वाघिणीचे दूध आहे इंग्रजी भाषेतील नवविचार वाचूनच भारतात क्रांतिकारी समाजसुधारक निर्माण झाले भारतातील समाजसुधारणाचा पिता असे ज्यांचे वर्णन केले जाते ते बंगालचे राजा राममोहन रॉय (१८२८ मध्ये त्यांनी ब्राम्हो समाज स्थापन केला) यांच्यापासून घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत क्रांतिकारक विचारवंतांचा एक तारका-पुंजच भारतीय जनतेला लाभला तथापि, अशा क्रांतिकारक विचारवंतांची आणि स्वातंत्र्य लढवय्यांची संख्या अत्यंत अल्प होती एकोणिसाव्या शतकात जन्म पावलेल्या अशा तळमळीच्या नेत्यांची मोजदाद शेकड्यामध्येच करता येईल

त्याउलट मिंधा आणि सुखसाधनाकरिता हपापलेल्या सुशिक्षितांचा खास ठेकेदार वर्ग जो इंग्रजी भाषेतील शिक्षणाने निर्माण झाला तो लक्षा-

वर्षींचा होता। इंग्रजीच्या वाघिणीच्या दुधाने हा शेळ्यांचा वर्ग निर्माण केला त्याच वेळी कोट्यवधींचा समाज इंग्रजीतील ज्ञानाचा खजिन्यापासून कितीतरी दूर राहिला ज्ञानाच्या ठेकेदाराचा हा नवीन वर्ग आणि अफाट जनसमूह यांच्यात पूर्ववत विषमताच राहिली

## बुद्धिमंतांची नवी जात

विविध जातीतील लोकानी इंग्रजी शिक्षण घेतले खरे, पण बहुसंख्य लोक पूर्वीच्याच उच्च वर्णातील होते शिवाय आणखी असा अजब प्रकार घडला की, इंग्रजी बोलणारे, वाचणारे आणि क्वचित लिहिणारे यांचीच एक नवीन हितसंबंधी जात निर्माण झाली—मग ते कोणत्याही जातीतून आलेले असोत।

या नवीन जातीचा निर्विवाद पुरावा म्हणजे डॉ बाबासाहेब यानी २७ जानेवारी १९१९ रोजी साऊथ बरो कमिटीसमोर दिलेली साक्ष पहा डॉ बाबासाहेब म्हणाले "जर शिक्षणाची वाढ ही एकाच वर्गापुरती मर्यादित राहिली तर त्यातून मानवाच्या मुक्तीऐवजी वर्गीय हितसंबंधांचे समर्थन आणि रक्षण हेच निष्पन्न होईल गरीब समाजाला मुक्त करणारे तळमळीचे विचारवंत निर्माण होण्याऐवजी, भूतकाळाचे पुरस्कर्ते आणि परिस्थिती 'जैसे थे' म्हणजे जशी आहे तशीच टिकवावी, असे म्हणणारेच उदयास येतील असेच जर सुरू राहिले तर भविष्यकाळात यापेक्षा वेगळे वळण लागेल असे मानता येणार नाही आजचा बुद्धिमंत वर्ग आणि उच्चवर्णीय हे एकच आहेत काही ब्राम्हण तर्कनिष्ठ असून समाजाला घातक अशा गोष्टींवर प्रहार करतात अशा उदात्त विचारवंतांबद्दल आदर आहे, पण बहुसंख्य बुद्धिमंत वर्ग हा 'जैसे थे' वादी आहे ' (पान २६८—डॉ आंबेडकरांचे लिखाण व भाषणे—खंड १) या वर्गाने स्वतःच स्वतःसाठी "बुद्धिमंत वर्ग" असे नाव धारण केले त्यांच्या उच्च शिक्षणाचा उद्देश चांगली नोकरी मिळावी आणि सुस्थिती प्राप्त व्हावी हाच प्रथमपासून होता आणि आजतागायत तोच उद्देश आहे

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात (१९३९ ते १९४५) पहिली दोन वर्षे जर्मनीचा नाझी हुकूमशाहा हिटलर याच्या आक्रमणाला तुफानी यश मिळत गेले हिटलरने आठ दिवसात पोलंडचा पाडाव केला आणि एका महिन्यात फरान्स पादाक्रांत केला त्यावेळी हिटलरचे राज्य येणार असे समजून जर्मन भाषा शिकणाऱ्यांची संख्या भारतात एकदम वाढली होती। एकंदर वृत्ती ही अशी होती। त्यागासाठी हा वर्ग कधीच तयार नव्हता आणि सामाजिक-आर्थिक-राजकीय उलथापालथ करणाऱ्या क्रांतिकारक विचाराला बिचकणारा होता सत्ताधारी किंवा लक्ष्मीधर यांच्याच आश्रयाने तो वावरला त्यांच्यात वैचारिक पीळ आणि त्यासाठी झीज सोसण्याची तयारी नव्हती समाजाचा

जाचक विरोध पत्करून सुधारणा घडविणे किंवा राजकारणात सरकारशी संघर्ष पत्करून प्रदीर्घ तुरुंगवास सोसणे ही टोके टाळून हा वर्ग सुखासीन चर्चा करीत राहिला अपवाद जरुर होते, पण अपवाद ते अपवाद ! या देशातील परिस्थितीचे चिंतन मनन करण्याऐवजी, ब्रिटन-अमेरिकेतील पुस्तकांतून किंवा नियतकालिकातून उधार उसनवारी हेच त्याचे चिंतन मनन झाले ! स्वतःच्या चिंतनाने आणि त्यागी निर्धाराने जो पीळ निर्माण होतो तो त्यांच्यात नव्हता निव्वळ इंग्रजी पोपटपंची करणारा आणि स्वतःमध्येच रमणारा हा वर्ग होता

## पोकळ आणि भोंगळ विचारवंत

त्यातून पोकळ आणि भोंगळ विचारवंत या देशात निर्माण झाले आणि कृत्रिम वाद खेळवित प्रसिद्धीच्या प्रकाशात झळकत राहिले विचारवंत म्हणून मान्यता पावलेले मान्यवर प्रभाकर पाध्ये यांचे एक व्यक्तिचित्र प्रा अनंत काणेकरांनी 'अनंतिका'मध्ये सादर केले होते त्यातील हा भाग पहा—
"हिटलरने जून १९४१ मध्ये रशियावर हल्ला केला हिटलरच्या फॅसिस्ट झुंडी रशियात घुसल्या आम्ही काही नवेजुने लेखक एका महाविद्यालयाच्या एका हॉलमध्ये जमलो कम्युनिस्ट रशियाच्या राजकारणाविषयी कुणाचे कितीही मतभेद असले तरी रशियाला आम्हा सर्वांचा पाठिंबा देणारा आणि फॅसिस्ट आक्रमकांचा निषेध करणारा एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्याचे ठरविले पुष्कळ चर्चा, वाद, विचार होऊन एक सर्वसंमत असा मसुदा तयार होत आला स्टालीनची झोटिंगशाही, विचार स्वातंत्र्याची मुस्कटदाबी वगैरे रशियातल्या काही गोष्टींना पुष्कळांचा विरोध होता, पण काही असले तरी सोविएत रशियातील क्रांतीने पेटविलेली समाजवादाची ज्योत अधिकाधिक प्रज्वलित झाली पाहिजे, फॅसिस्ट रानवटांना तिच्यावर झडप घालू देता कामा नये म्हणून त्या जाहीरनाम्यावर सह्या करावयाला आम्ही सर्व तयार झालो होतो अप्रत्यक्षपणे का होईना, पण असल्या पाठिंब्याने स्टालीनचे हात बळकट होतात म्हणून पाध्ये कुरकुरत होते पाध्यांचे मन वळविण्याचा आम्ही काही मित्र प्रयत्न करीत होतो इतक्यात प्रा वा गाडगीळ ओरडले, 'तो प्रभाकर नाहीच सही करणार !' तेव्हा 'नाही नाही, मी करणारच !' म्हणून प्रभाकर पाध्यांनी सही केली !"

हिटलरच्या सैन्याने २२ जून १९४१ रोजी रशियात जबरदस्त मुसंडी मारली तीन दिशांनी लेनिनग्राड, मॉस्को आणि स्टालीनग्राडपर्यंत हिटलरचे सैन्य विजयी आगेकूच करीत होते अशा वेळी आपल्या पत्रकाने स्टालीनचे हात बळकट होतील अशी कल्पना करू शकणारे आणि शेवटी निव्वळ

पां वा गाडगीळांचे म्हणणे खोटे पाडण्यासाठी स्टालीनचे हात बळकट करण्यास तयार झालेले असे हे लेखक विचारवत! हिटलरच्या त्या विलक्षण वेगाच्या आक्रमणाने सर्वनाशाचे सकट ओढवलेले असताही, स्टालीनला ही हकीगत कुणी सागितली असती तर त्या घोर चितेतही त्याला खदखदून हसू आले असते!

## लोकशाही समाजवाद

अशा या पोकळ आणि मोंगळ विचारवताचा 'लोकशाहीतून समाजवादा'ला फार मोठा पाठिंबा मिळाला स्वतःची नोकरी-व्यवसाय करून, सायकाळी बुद्धिमतांच्या एखाद्या तजेलदार पार्टीत बसून समाजवादाची चर्चा करावयाची या कल्पनेवर ते खूष झाले! आपला उद्योगधदा आणि अमाप पैसा वाढत राहून समाजवाद येणार ही कल्पना बड्या मांडवलदारांनाही आवडली! सत्ता अबाधित राखून आणि सत्तेचे सर्व फायदे घेत समाजवाद आणावयाचा हे सत्ताधाऱ्याना एकदम पटले त्याचे एकमत झाले आणि या एक टक्का वर्गाचे एकमत म्हणजे बहुमत! आजतागायत हे बहुमत कायम आहे!

आणि याच हितसबधी बहुमताने घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर याचा "प्रथम समाजवाद आणि नतर लोकशाही" हा मूलभूत बदल घडविणारा विचार घटना समितीत बाजूला सारला आणि त्यानतर सतत उपेक्षेने विस्मृतीत गाडला! घटना समितीत डॉ बाबासाहेब आंबेडकराचे क्रांतिकारक विचार निव्वळ बहुमताच्या जोरावर हाणून पाडले भारतीय घटनेचे कलम ३१ हे खाजगी सपत्तीचे अधिकार बहाल करणारे होते त्याबाबत १९ मार्च १९५५ साली चौथ्या घटनादुरुस्तीवर राज्यसभेत भाषण करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर सतापून म्हणाले, "घटनेचा मसुदा करणाऱ्या माझ्या समितीने ३१ वे कलम घेतले नव्हते मला विचाराल तर भारतीय राज्यघटनेत हे ३१ वे कलम कॉंग्रेसजनांनी घटना समितीद्वारे घुसडलेले असून अत्यत गलिच्छ आहे मला त्याकडे पहावेसेही वाटत नाही" (डी एन बानर्जीलिखित मूलभूत हक्कांवरील ग्रथ–पान ३१४-३१५)

: १२ :

# दंडवते बुद्धिमंत आणि गंडवते बुद्धिमंत

घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला घटना दिली, पण त्यांना जशी घटना देशाला द्यावयाची होती तशी घटना देता आली नाही याची कारणे कोणती ?

(१) या देशात जो 'बुद्धिमंत वर्ग' इंग्रजी भाषेच्या सहाय्याने निर्माण झाला तो इंग्रज सरकारचा आधार बनला इंग्रजी भाषेमुळे राजकीय क्रांतिकारक आणि सामाजिक क्रांतिकारक निश्चितच निर्माण झाले, पण त्यांची संख्या फार कमी होती जवळजवळ समस्त 'बुद्धिमंत वर्ग' सत्ताधाऱ्यांच्या तसेच धनिकांच्या म्हणजेच स्वदेशी भांडवलदारांच्या आसऱ्याने आर्थिक दृष्ट्या सुस्थितीत राहीला यामुळे भांडवलदारवर्गच नाहीसा करणे ही कल्पनासुद्धा करायला हा वर्ग तयार नव्हता

(२) हा 'बुद्धिमंत वर्ग' इंग्रजी पुस्तकांतून उधार उसनवारी करणारा होता भारतीय परिस्थितीचे स्वतंत्र मनन-चिंतन करण्याची त्यांना जरुरी राहिली नाही ब्रिटिशांची नवनवीन इंग्रजी पुस्तके वाचावीत, त्यातील वाक्ये स्टाईलमध्ये फेकावीत नि विचारवंत म्हणून मिरवावे असा हा उधार उसनवार वर्ग तयार झाला मराठी बोलण्याची पाळी आलीच तर इंग्रजी शद्बांचे इतके बोजड मराठी भाषांतर करून सांगू लागला की, कुणाला काही कळेना ! आपले म्हणणे लोकांच्या डोक्यावरून गेले की, त्यांना विद्वत्तेची पावती मिळाल्याचा आनंद होत असे लोकांना समजेल अशा सोपेपणाने गहन विषय सांगण्याचा प्रयत्न क्वचित कुणी केला आणि सोपेपणा म्हणजे उथळपणा अशी व्याख्याच रूढ करण्यात आली.

## फेबियन सोशॅलिझम

(३) ब्रिटनमधील 'फेबियन सोशॅलिझम' त्याला आकर्षक वाटला 'फेबियन सोशॅलिझम' म्हणजे काय? रक्तपात तर सोडाच पण अश्रूही ढाळायला न लावता इचाइचाने लोकशाहीतून समाजवादाकडे वाटचाल करायची म्हणजे फेबियन सोशॅलिझम त्याची चर्चा यापूर्वी केलीच आहे पॅट्रीशिया पगलिखित "हड्रेड इयर्स ऑफ फेबियन सोशॅलिझम" या ताज्या पुस्तकात मनोवेधक रीतीने इतिहास सादर केला आहे फेबियन सोशॅलिझमची 'विलबित लय' भारतातील बुद्धिमंतवर्गाला फारच पसत पडली, कारण त्याच्या स्थैर्याचे त्यात आश्वासन होते "समाजवाद नाकारायचा नाही आणि समाजवाद आणायचाही नाही" हे सूत्र धरून, या बुद्धिमत वर्गाने घटनेद्वारेच समाजवादी आर्थिक रचना करण्याचा डॉ बाबासाहेब आबेडकर यांचा विचार फेटाळला आणि बाजुला सारला

(४) पडित जवाहरलाल नेहरू हे भारताचे अत्यत तळमळीचे आणि प्रतिभाशाली नेते होते तथापि, वैचारिक दृष्ट्या ते 'हॅम्लेट' होते जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपियर याच्या 'हॅम्लेट' नाटकातील डेन्मार्कचा राजपुत्र हॅम्लेट याला कधीही निश्चित निर्णय घेता आला नाही "जगावे की मरावे?" हे त्याचे प्रश्नचिन्ह होते अतिविचारामुळे त्याची ही द्विधा मन स्थिती होत असे सभ्रमात राहण्याच्या एकमेव दोषामुळे, या बुद्धिमान आणि सत्प्रवृत्त राजपुत्राची शोकातिका झाली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक लोकशाहीला, म्हणजेच आर्थिक समतेला पडित नेहरूचा मनोमन पाठिबा होता नतरच्या काळात डॉ बाबासाहेबानी 'हिंदू कोड बिल' तयार केले त्यालाही त्याचा दणदणीत पाठिबा होता पण धनिकधार्जिण्या तसेच सनातनी बुद्धिमताचा विरोध होताच पडित नेहरू तडजोडीचा मार्ग स्वीकारीत आणि 'विलबित लय' मान्य करीत परिणामी हिंदू कोड बिलाची मोडतोड करूनच ते समत झाले! डॉ बाबासाहेबाचा 'समान नागरी कायद्या'ला जोरदार पाठिबा होता पण घटना समितीत अल्प बहुमताने ही सूचना नामजूर झाली यानतर पडित नेहरू एकदा उद्गारले की, "समान नागरी कायद्याच्या दृष्टीने हिंदू कोड बिल हे पहिले पाऊल पडले आहे!"

तथापि, गेल्या चौतीस वर्षांत दुसरे पाऊल पडले नाही आणि पडणार नाही हे स्पष्ट झालेले नाही का? "समान नागरी कायद्यासाठी राज्य सरकारांनी जारीने प्रयत्न करावेत" असा घटनेच्या ४४ व्या कलमाचा आदेश असून या प्रश्नावर मौनच पाळले गेले आहे!" पडितजीपुढे कायम प्रश्नचिन्ह होते– समाजवादी आर्थिक बदल एकदम करावयाचा की विलबित लयीने करावयाचा?

पडितजीनी क्रांतिकारक बदलाला अनुकूलता स्पष्ट केली, पण वास्तवात त्यांनी पाय मागे घेऊन विलबित लय मान्य केली

घटनेच्या उपोदघातात (प्रिॲम्बल) समाजवादी स्वप्न रगविण्यास धनिकधार्जिण्यानी हरकत घेतली नाही, कारण या उपोदघाताचे कायदेशीर बधन काहीही नाही ! मात्र मूलभूत हक्काच्या भागात सपत्तीचा हक्क भक्कम करून घेतला आणि मूलभूत हक्काचे कायदेशीर बधन शभर टक्के असते डॉ बाबासाहेब आबेडकर यांनी सतापाने १९ मार्च १९५५ रोजी राज्यसभेत बजावले की, "खाजगी सपत्तीचा मूलभूत हक्क देणारे ३१ वे कलम गलिच्छ आहे माझा त्याच्याशी काही सबध नाही मला ते बघवतसुद्धा नाही !"

## पंडित नेहरूंची संभ्रमावस्था

याच भाषणात डॉ बाबासाहेबांनी जो आणखी गौप्यस्फोट केला त्यावरून पडित नेहरूची स्थिती स्पष्ट होते डॉ बाबासाहेब म्हणाले, "मी आणि माझी मसुदा तयार करणारी समिती घटनेच्या ३१ व्या कलमाची कोणतीही जबाबदारी स्वीकारीत नाही ३१ वे कलम तयार होत असताना, घटना समितीतील कॉग्रेस सदस्यांत परस्परविरोधी दृष्टिकोन होते काय करावे, ते त्याना समजत नव्हते एका गटाचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेल करीत होते सपत्तीच्या बदल्यात सपूर्ण भरपाई दिलीच पाहिजे अशी त्याची भूमिका होती सपूर्ण भरपाई म्हणजे बाजारभावाप्रमाणे किंमत अधिक १५ टक्के भरपाई !! दुसरा गट जवाहरलाल नेहरूचा होता या भूमिकेला त्यांचा सपूर्ण विरोध होता तिसरा गट पडित गोविंद वल्लभ पताचा होता कांग्रेस सदस्याच्या दुहीमुळे ३१ वे कलम त्यांच्याच मर्जीवर सोपविण्यात आले" अखेर त्यातूनच धनिकधार्जिणे ३१ वे कलम तयार झाले

डॉ बाबासाहेब आबेडकर यांच्या मृत्यूनतर या देशातील बुद्धिमत वर्ग आणि हितसबधी वर्ग एवढेच सांगत राहिला की, "डॉ बाबासाहेब यानी देशाला घटना दिली लोकशाही दिली तीच आणि तशीच आपण चालविली पाहिजे" डॉ बाबासाहेबाना या देशात क्रांतिकारक बदल हवा होता या देशाला घटना देतानाही त्यानी अत्यत कडक इषारा दिला होता पण तो मुद्दाम बाजूला सारण्यात आला आहे मिनू मसानी हे धनिकधार्जिण्या बुद्धिमत वर्गातील अत्यत परखडपणे बोलणारे विचारवत होते राजकीय रचनेबरोबरच आर्थिक समता घटनेद्वारे प्रस्थापित करण्याच्या डॉ बाबासाहेब आबेडकर यांच्या विचाराला उद्देशून त्यांनी सरळ सवाल विचारला, "भारतीय घटना समितीला कोणतीही सैद्धांतिक अर्थव्यवस्था स्वीकारण्याची परवानगी मतदारानी दिलेली नाही घटनेच्या उद्देशपत्रिकेतील सामाजिक आर्थिक न्याय

हा शब्दप्रयोग सध्याची भारतीय आर्थिक समाजव्यवस्था नाकारणारा असून त्यामुळे भारतीय समाजाची मूळ स्थिती (जैसे थे स्थिती) बिघडण्याचा धोका आहे।" (कॉन्स्टिटयुअट असेंब्ली डिबेट–खंड पहिला, पान ९० व ९१) मिनू मसानी जे ठणठणीतपणे सांगत होते तेच बुद्धिमंत वर्गाचे म्हणणे होते कमी-जास्त गुळमुळीतपणे हीच मांडणी ते करीत होते या वर्गाला बदल नको होता इंग्रजी भाषेमुळे लाभलेली रोजगार हमी अशीच चालू रहावी आणि कसलीही उलथापालथ घडवू नये असे त्यांना वाटत होते

## प्रार्थनेने बदल होत नाही

घटनेच्या उपोद्घाताला कायद्याच्या कोर्टात कोणतीही किंमत नाही ज्ञानेश्वरमहाराजांनी पसायदानात प्रार्थना केली––

**दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।**
**जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात।**

घटनेचा उपोद्घात म्हणजे अशी प्रार्थना आहे! अशी भव्य प्रार्थना शेकडो वर्षे म्हणत राहूनही काही बदल होत नसतो बदल घडवावा लागतो केवळ प्रार्थना म्हणजे जे काल होते तेच आज पुढे चालवायचे! बुद्धिमंतांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादाच्या आणि आर्थिक समतेच्या आग्र-हाची दखल घेतली नाही जर डॉ बाबासाहेबांच्या जयंतीच्या समारंभात भाषण केलेच तर त्यात काय असते? डॉ बाबासाहेबांच्या स्मृतीला दंडवत घालतात त्यांचा जयजयकार करतात पण त्यांनी या देशाला घटना देताना कोणता इशारा दिला, त्यांना नेमके काय हवे होते त्याची आठवण न देता आणि या इशाऱ्याच्या संदर्भात काय घडले ते न तपासता, फक्त एवढेच सांगतात की, डॉ बाबासाहेबांनी देशाला घटना दिली लोकशाही दिली म्हणजे केवळ जयजयकार करणारे दंडवते बुद्धिमंत आणि डॉ बाबासाहेबांचा समाजवादासह लोकशाहीचा आग्रह उपेक्षेने बाजूला सारणारे गडवते बुद्धिमंत यांनी डॉ बाबासाहेबांच्या क्रांतिकारक विचाराबाबत दिशाभूल चालविली 'जैसे थे'मध्येच त्यांचे हितसंबंध गुंतल्यामुळे ते असेच करीत रहातील डॉ बाबासाहेबांना नेमकी घटना कशी हवी होती? ते या बुद्धिमंतांनी लोका-समोर मांडलेच नाही घटना घडविताना जी चर्चा आणि जे वादविवाद झाले त्या संबंधीची जवळजवळ सर्वच पुस्तके इंग्रजीत असल्याने अशी दिशाभूल करीत रहाणे सोपेही झाले!

: १३ :

# विसंगतींच्या जीवनाविरुद्ध डरकाळी

डा बाबासाहेब आंबेडकर यानी भारताला घटना दिली त्यांना जशी घटना हवी होती तशी घटना प्रस्थापित हितसबधाच्या विरोधामुळे त्याना देता आली नाही, पण आपल्याला काय हवे याबाबत डॉ बाबासाहेबांनी यत्किंचितही शकेला जागा ठेवली नाही घटनेचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यानी राज्यसभेत समारोपाचे अप्रतिम भाषण केले २५ नव्हेंबर १९४९ रोजी एकाद्या सिंहासारख्या त्यानी राज्यसभेत गर्जना केल्या 'जैसे थे' वादी बुद्धिमताचा थरकाप व्हावा अशाच त्या डरकाळ्या होत्या (कॉन्स्टीटयुअन्ट असेंब्ली डिबेटस–२५ नव्हेंबर १९४९–पाने ९७५ ते ९८१)

डॉ बाबासाहेबानी इषारा दिला — "या देशात लोकशाही यशस्वी होण्याच्या अटी कोणत्या? या घटनेने राजकीय लोकशाही दिली पण केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये या देशाला सामाजिक समतेची लोकशाही आणि आर्थिक समतेची लोकशाहीसुद्धा दिलीच पाहिजे सामाजिक आणि आर्थिक समतेचा पाया ज्या राजकीय लोकशाहीला लाभलेला नाही ती राजकीय लोकशाही या देशात टिकणार नाही

"सामाजिक समतेची लोकशाही म्हणजे काय? सामाजिक लोकशाही म्हणजे अशी जीवन पद्धती की जी समता, स्वातत्र्य आणि बधुता या तत्त्वांचा स्वीकार करते ही तीन तत्त्वे म्हणजे एक अभग अशी त्रिमूर्ती आहे ही तीन तत्त्वे एकमेकापासून अलग करता येणार नाहीत, कारण जर त्यापैकी एक तत्त्व नसेल तर दुसरी तत्त्वेही नसतील! यापैकी कोणतेही एकच तत्त्व अलगपणे अमलात आणणे म्हणजे लोकशाहीचा हेतूच विफल करणे!

"भारतीय समाजात आज या अभग त्रिमूर्तीतील दोन तत्त्वांचा सपूर्ण अभाव आहे हे मान्य करून विचाराला प्रारभ करणे आपल्याला भाग आहे या देशात समता नादत नाही सामाजिक पातळीवर भारतात जातींची उतरड आहे यामुळे काहीजण जन्मत च श्रेष्ठ आणि इतरेजन जन्मत च कनिष्ठ आहेत आर्थिक पातळीवर आपला समाज असा आहे की काहीजणांजवळ गडगज सपत्ती आहे आणि इतर जनता कमालीच्या दारिद्र्यात खितपत आहे

"२६ जानेवारी १९५० रोजी जेव्हा भारतात या घटनेचा अमल जारी होईल तेव्हा आपण विसगतींनी भरलेल्या एका जीवनात पदार्पण करणार आहोत! आपल्या राजकीय जीवनात समानता असेल आणि सामाजिक तसेच आर्थिक जीवनात विषमता राहील! प्रत्येक माणसाला एक मत आणि प्रत्येकाच्या मताला समान मूल्य आपल्याला राजकारणात लाभणार आहे पण आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र आपण प्रत्येक माणसाचे सारखेच मूल्य यापुढेही मान्य करणार नाही! आपली जी सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था आहे तिच्या विषमतेमुळे सामाजिक-आर्थिक जीवनात सर्व माणसे समान नसतील अशा विसगतींनी भरलेले जीवन आपण आणखी किती काळ घालविणार आहोत? आमच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आम्ही आणखी किती काळ समानता नाकारणार आहोत? जर आम्ही सामाजिक आणि आर्थिक जीवनात अशीच विषमता दीर्घकाळ चालविली, तर लक्षात ठेवा, आपली राजकीय लोकशाही धोक्यात येईल आमच्या जीवनातील विसगती आम्ही शक्य तितक्या लवकर नाहीशा केल्या पाहिजेत नाहीतर विषमतेमुळे जे रजले गाजले आहेत ते राजकीय लोकशाहीची ही रचना उध्वस्त करतील!"

## जनता म्हणजे ओझ्याची जनावरे

समारोपाच्या या ज्वलत तळमळीच्या भाषणाच्या अखेरीस डॉ बाबासाहेबानी खणखणीतपणे बजावले की, "आपल्यासमोर भावी काळात जी कामगिरी आहे त्या विषयीचे विचार मी माडले काहीजणाना हे विचार सुखद वाटणार नाहीत पण या देशातील राजकीय सत्ता ही काही थोड्या व्यक्तींची मक्तेदारी फार दीर्घकाळ झाली आहे बहुसख्य लोक म्हणजे ओझी वहाणारी जनावरे आहेत या मक्तेदारीने जीवन सुधारण्याची सधी बहुसख्य लोकाना नाकारली आहेच, पण त्यांच्या जीवनातील रसच नाहीसा केला आहे या पददलित समाजाला त्याच्यावरील राजवटीचा आता कटाळा आला आहे ते स्वत च सत्ता घेण्यासाठी आतुर झाले आहेत त्याच्या या उत्कट आकाक्षेतून वर्ग–सघर्ष किंवा वर्गयुद्ध निर्माण होऊ दिले तर लोकशाहीसाठी घातक होईल. म्हणून त्याची आकाक्षा लवकरात लवकर फलद्रूप करा आणि त्याचा मार्ग

म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत समता आणि बधुभाव आणा म्हणूनच मी या तत्त्वांवर भर देत आहे"

## भले करणारे सरकार हवे

डॉ बाबासाहेबांनी असाही इषारा दिला की, "आपण स्वतंत्र झालो आहोत जे काही वाईट घडते त्याबद्दल यापुढे ब्रिटीशाना दोष देऊन मोकळे होता येणार नाही। विपरित घडण्याचा मोठा धोका आहे काळ झपाटयाने बदलणारा आहे, नवीन विचार प्रणालींचा प्रभाव जगात आणि आपल्या लोकांवरही पडत रहाणार आहे केवळ लोकांनी निवडून दिलेल्या सरकारचा लोकांना कटाळा येत आहे लोकासाठी सरकार म्हणजे लोकांचे भले करणारे सरकार आता लोकाना हवेसे होत आहे मग ते सरकार लोकानी निवडून दिलेले आहे किंवा नाही याबाबत लोक बेफिकीर होत आहेत

"ससदीय लोकशाही हा राजकीय लोकशाहीचा एकमेव आदर्श आहे असे मी म्हणणार नाही भरपाईशिवाय मालमत्ता ताब्यात घेऊ नये हे तत्त्व पवित्र आहे आणि ते सोडून देता येणार नाही असेही मी मानत नाही। मी फक्त एवढेच म्हणेन की, आजच्या या घटनेत जी तत्त्वे समाविष्ट केली आहेत ती आजच्या पिढीच्या दृष्टीकोनानुसार आहेत हेसुद्धा अतिशयोक्त विधान झाले असे तुम्ही म्हणाल तर मी इतकेच म्हणेन की, आजच्या घटनेतील तत्त्वे म्हणजे घटना समितीच्या सदस्यांचा तो दृष्टीकोन आहे।। ही तत्त्वे घटनेत समाविष्ट केल्याबद्दल आमच्या मसुदा तयार करणाऱ्या समितीला का दोष देता ?

## जफरसन यांचे अचूक दिग्दर्शन

"महान मुत्सद्दी जेफरसन यांनी जो दृष्टीकोन मांडला तो घटना तयार करणाऱ्यांना विसरता येणार नाही जेफरसन म्हणाले की, प्रत्येक पिढी म्हणजे एक वेगळेच राष्ट्र आहे। प्रत्येक पिढीला बहुमताने स्वतःच्या पिढीसाठी बंधनकारक घटना देता येईल, पण नंतरच्या पिढ्यानाही त्याच घटनेने बांधून ठेवता येणार नाही कारण प्रत्येक पिढी म्हणजे वेगळे राष्ट्र असून आपल्या घटनेने दुसऱ्या राष्ट्राला बांधता येत नसते ज्या सस्था स्थापन केल्या जातात त्या अंतिम उद्दिष्टासाठी बदलता येत नाहीत किंवा त्यांना हातही लावता येत नाही हे म्हणणे अत्यत मूर्खपणाचे आहे जर बदल करता येत नसेल तर ही पृथ्वी मुडद्याची आहे, जिवंत माणसांची नव्हे !

"जेफरसन यांनी याप्रमाणे जे सांगितले ते केवळ खरे नसून, निर्विवाद आणि सपूर्ण सत्य आहे घटना दुरुस्त करण्याचा हक्क म्हणूनच या भारतीय घटनेत दिला असून, दोन-तृतीयांश बहुमत मिळवून घटना बदलता येईल."

या सर्व भाषणावरून असे स्पष्ट दिसते की, आर्थिक समता आणि सामाजिक समता आणि बधुभाव प्रस्थापित करण्यासाठी ही घटना बदलली जाईल आणि बदलली जावी असाच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन होता लोकांना फक्त पाच वर्षांनी एकदा मतदानाचा हक्क देणे लोकांच्या कल्याणासाठी पुरेसे नाही लोकांनी निवडून दिलेले लोकनियुक्त सरकार सत्तारुढ होते एवढेच पुरेसे नाही खरीखुरी आर्थिक–सामाजिक–राजकीय समता देणारे म्हणजेच जनसमुदायाचे कल्याण करणारे सरकार लोकांना हवे असते असाही त्यांचा स्पष्ट इषारा आहे

घटना समितीच्या सदस्यांनी डॉ आंबेडकरांना घटनेमधून आर्थिक समता आणू दिली नाहीच, पण घटनेच्या ३८ व्या कलमातील पुढील वाक्यालाही विरोध केला– "सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळेल अशी समाजाची घडण करण्यासाठी आणि त्याद्वारे लोकांच्या कल्याणासाठी राजसत्ता जास्तीत जास्त झगडेल" सदर वाक्यातील 'झगडेल' या शब्दाला धनिकधार्जिण्या आणि बदल नको असलेल्या बुद्धिमतांनी जोरदार विरोध केला 'झगडेल' याचा अर्थ राजसत्तेने तसे सक्रीय प्रयत्न केले पाहिजेत ! पण एवढे बधनही त्यांना नको होते ! डॉ बाबासाहेबाना कोणत्या विरोधाच्या वातावरणात घटना तयार करावी लागली आणि त्याना कोणती घटना हवी होती त्याबद्दल या पुराव्यांनी सशयाला जागाच उरलेली नाही.

## इषारा धाब्यावर बसविला

डॉ बाबासाहेबांचा इषारा राज्यकर्त्यांनी आणि राजकीय नेत्यानी रोजच्या रोज नजरेसमोर ठेवला पाहिजे पण हा इषारा सोयीस्करपणे विस्मृतीत लोटून राज्यकर्ते आणि राजकीय नेते लोकशाही चालवित आहेत ! २६ जानेवारी १९५० नतरच्या ३४ वर्षांत विषमता नाहीशी होण्याऐवजी अति प्रचड वाढली आहे एका बाजूला मक्तेदार धनिकांच्या पैशाचे ढिगारेच्या ढिगारे उभे राहीले आहेत तर दुसऱ्या बाजूला पडक्या चाळीच्या ढिगाऱ्यांत माणसे मरत आहेत ! सर्व कायदे धाब्यावर बसवून गगनचुबी इमारती पैशाच्या मस्तीत उभ्या रहात आहेत तर त्याच वैभवाच्या परिसरामध्ये गलिच्छ वस्तीतील झोपडपट्टी एका पावसानेही पुराच्या पाण्यात बुडत आहे ! मुबई–फ्रॅंकफुर्ट–बर्लीन–पॅरीस–रोम असा युरोपचा प्रवास एकीकडे गगनातून आरामशीर सुरू आहे तर दुसरीकडे गांवकुसातून गावात येतानाही ठेचकाळत असलेला जनसमुदाय आहे ! एकादा सिनेनटही राजकारणात येतो तोच मुख्यमत्री व देशनेता बनत आहे, तर ज्याने देशाला घटना दिली आणि देशाने लवकरात लवकर काय केले पाहिजे त्याचा तळमळीने मार्ग दाखविला त्या विव्दान

स्वयसिद्ध देशनेत्याला 'महारांचा पुढारी' ठरविले आहे। धनिकांनी व राज्य-कर्त्यांनी तसेच त्यानी पाळलेल्या पोसलेल्या पोकळ व मोंगळ बुद्धिमतांनी वर्षानुवर्षे काय केले? या देशनेत्याची क्रांतिकारक विचारधारा लोकासमोर माडत राहण्याऐवजी पद्धतशीर दुर्लक्ष केले जिवत तळमळीच्या नि कळकळीच्या देशनेत्याचा "प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत लोकशाही ' हा विचार उपेक्षेत गाडला हा नवा विचार भारताला मार्गदर्शक आहेच, पण जगालाही मार्ग-दर्शक आहे' 'स्टेटस् ॲण्ड मायनॉरिटीज' मध्ये हा विचार सुदर स्पष्टतेने त्यानी मांडला आहे

हा क्रांतिकारक विचार समजावून घेण्यासाठी डॉ बाबासाहेबांच्या घटनेचा तपशील पहायला हवा. त्यापूर्वी विख्यात राज्यशास्त्र विचारवत हॅरॉल्ड लास्कीचे वचन देण्याचा मोह आवरत नाही कारण 'स्टेटस् ॲण्ड मायनॉरिटीज'मधील क्रातिकारक तोडग्याचा तो मला पायाच वाटतो प्रोफेसर हॅरॉल्ड लास्की यांनी 'ग्रामर ऑफ पॉलिटीक्स' मध्ये म्हटले आहे की "खऱ्याखुऱ्या आर्थिक समानतेशिवाय राजकीय समानता कधीच खरीखुरी असू शकत नाही आर्थिक विषमता असेल तर राजकीय सत्ता ही आर्थिक सत्तेची बटीक होणारच!" (पान १२२) डॉ बाबासाहेबाचे हेच ठाम मत होते आणि म्हणूनच त्यांनी 'स्टेटस् ॲण्ड मायनॉरिटीज' चा अभिनव मार्ग सागितला.

: १४ :

# स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटीज

## —डॉ. बाबासाहेबांच्या मनातील घटना

घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांना नेमके काय हवे होते ? त्याना जे नेमके हवे होते ते ' स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटीज ' मध्ये आहे ! अखिल भारतीय शेड्युल कास्टस् फेडरेशनतर्फे घटना समितीला सादर करण्यासाठी डॉ बाबासाहेबानी १९४६ साली घटनेच्या स्वरुपातील निवेदन तयार केले त्याचबरोबर शेड्युल कास्टस फेडरेशनच्या कार्यकारिणीसाठी त्यानी या घटनेतील कलमाचे स्पष्टीकरण करणाऱ्या नोटस् (टीपा) तयार केल्या या टीपांना आकडेवारीचाही आधार दिला ज्यांनी ही घटना वाचली ते इतके प्रभावित झाले की, सदर घटना छापण्याचा त्यांनी आग्रह धरला

या आग्रहानुसार छापण्यात आलेल्या पुस्तिकेला डॉ बाबासाहेबानी जी प्रस्तावना लिहिली (१५ मार्च १९४७) त्या प्रस्तावनेत डॉ बाबासाहेब म्हणतात—"सदर निवेदन घटना समितीला सादर करण्यासाठी तयार केले होते निवेदन छापून लोकाच्या हाती देण्याचा कसलाही इरादा नव्हता पण माझ्या ज्या सवर्ण हिंदू मित्रांना हे टंकलिखित निवेदन वाचण्याची संधी मिळाली त्यांनी लोकाच्या हाती सदर निवेदन देण्याचा आग्रह मला केला त्यांची इच्छा मान्य करण्याचे मी कबुल केले माझ्या मनात ज्या संकल्पना आहेत त्या सर्वसाधारणपणे मांडण्याऐवजी मी घटनेच्या कलमांच्या स्वरुपात त्या संकल्पना सादर केल्या आहेत मला खात्री आहे की मला जे हवे आहे ते अचूकपणे आणि ठाशीवपणे सादर करण्यासाठी ही पद्धत अधिक फायदेशीर

आहे" (डॉ बाबासाहेब आंबेडकर–राईटींग्ज अँण्ड स्पीचीस– खंड पहिला–महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन –पान ३८३, ३८४, ३८५)

"स्टेटस् अँण्ड मायनॉरिटीज ' च्या आर्टीकल २ चा क्लॉज ४ म्हणजे घटनेद्वारे आर्थिक रचनासुद्धा निश्चित करण्याची साऱ्या लोकशाही जगातील पहिली सकल्पना आहे या क्लॉजला 'आर्थिक शोषणापासून सरक्षण' असे फार अर्थवाही नाव दिले आहे यापूर्वी लोकशाही घटनांमध्ये अशी क्रांतिकारक कल्पना कोणीही साकार केलेली नाही अशा अभिनव सकल्पनेचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ 'महाराचे पुढारी' ठरविणे म्हणजे अथांग आकाशाला 'छप्पर' म्हणण्यासारखे आणि तेजस्वी सूर्याला 'बल्ब' सबोधण्यासारखे आहे। पण समाजवादी सकल्पनेचा हा सूर्यप्रकाश ज्याना पहाताच येत नव्हता त्या दिवाभितांना दिशाभूल करण्यासाठी हाच मार्ग होता।

स्टेटस अँण्ड मायनॉरिटीजमधील आर्टीकल २, सेक्शन २, क्लॉज ४ (पाने ३९६ व ३९७) याचे आता भाषातर करू या ठळक टाईपात कसात जे स्पष्टीकरण आहे ते माझे आहे

## मराठी भाषांतर

भारतीय घटनेच्या कायद्याचाच एक भाग म्हणून पुढीलप्रमाणे घोषित केले जाईल

(१) जे उद्योगधदे राष्ट्रीय दृष्ट्या अत्यावश्यक महत्त्वाचे आहेत (की इडस्ट्रीज) किंवा जे अत्यावश्यक महत्त्वाचे उद्योगधदे म्हणून जाहीर केले जातील ते सरकारच्या मालकीचे रहातील आणि सरकारतर्फे चालविले जातील

(२) जे उद्योगधदे अत्यावश्यक महत्त्वाचे (की इडस्ट्रीज) नव्हेत, पण जे मूलभूत (बेसिक) उद्योगधदे आहेत ते सरकारच्या मालकीचे रहातील आणि ते सरकार चालविल किंवा सरकारने स्थापन केलेली महामडळे चालवितील

**(या दोन कलमांनी अत्यंत स्पष्ट केले की डॉ बाबासाहेबांना महत्त्वाच्या व मूलभूत उद्योगधद्याचे राष्ट्रीयीकरण हवे होते आणि फक्त अगदी छोटे पूरक उद्योगधदे खाजगी मालकीवर सोपविण्याची सवलत होती.)**

(३) विमाव्यवसाय (इन्शुरन्स) हा सरकारची एक मक्तेदारी राहील आणि सरकार प्रत्येक प्रौढ नागरिकाला त्याच्या वेतनाच्या प्रमाणात आयुर्विमा पॉलिसी घेण्याची सक्ती करील आणि त्यासाठीची कार्यपद्धती कायदेमडळ मुक्रर करील

**(या कलमाचे दुहेरी उद्दीष्ट आहे– (अ) सरकारला विकासाकरिता भांडवलाची उभारणी करता यावी आणि (ब) प्रत्येक कुटूबाला विम्यामुळे आर्थिक आधार लाभावा.)**

(४) शेती हा सरकारचा उद्योग राहील

**(या कलमात शेत जमिनीचे राष्ट्रीकरण सांगितले आहे)**

(५) मालक, कूळ किंवा गहाणवट घेणारा धनको या नात्याने खाजगी व्यक्तीच्या ताब्यात असलेले उद्योगधंदे, विमा आणि शेतीची जमीन यातील त्यांचे वहिवाटीचे हक्क सरकार आपल्याकडे घेईल या खाजगी व्यक्तीना जमिनीतील त्याच्या किंवा तिच्या हक्काच्या मूल्याइतकी भरपाई डिबेन्चरच्या म्हणजे सरकारी कर्जरोख्याच्या स्वरुपात दिली जाईल त्याचवेळी अशी तरतुद करण्यात येते की, सक्तीने ताब्यात घेण्यासाठी जमीन, कारखाना किंवा सिक्युरिटी याचे मूल्य निश्चित करताना आणिबाणीमुळे त्यात झालेली कोणतीही वाढ, भावी काळातील संभाव्य किंवा अनार्जित मूल्य किंवा सक्तीने ताब्यात घेण्यासाठीचे कोणतेही मूल्य यांची दखल घेतली जाणार नाही

(६) डिबेन्चर म्हणजेच कर्जरोखा धारण करणाऱ्याला रोख रक्कम मिळण्याचा हक्क कोणत्या प्रकारे आणि केव्हा असेल ते सरकार ठरविल

(७) सदर रोख्यांचे हस्तातर म्हणजेच विनिमय करता येईल आणि रोख्यावर वारसा हक्क राहील मात्र मूळ रोखा-धारक किंवा मूळ रोखा-धारकाकडून ज्याला रोखा मिळाला ती व्यक्ती किंवा मूळ रोखाधारकाचा वारस यांना सरकारने ताब्यात घेतलेली जमीन किंवा सरकारने ताब्यात घेतलेल्या कोणत्याही औद्योगिक कपनीतील हितसबध परत मिळण्याची मागणी करता येणार नाही किंवा त्या मालमत्तेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे व्यवहार करता येणार नाही

(८) रोखा-धारकाला कायद्याने मंजूर करण्यात येईल त्या दराने रोख्यावर व्याज मिळण्याचा हक्क राहील आणि सदर व्याज रोख किंवा वस्तुरुपाने, जसे सरकारला योग्य वाटेल त्याप्रमाणे, सरकार देईल

**(जवळ जवळ सर्वच उद्योगधंद्यांचे आणि शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करताना भरपाईची भरमसाट तसेच रोख रक्कम देण्याचा अडथळा डॉ बाबासाहेबांनी पाच ते आठ या कलमांनी नेस्तनाबूत केला आहे)**

(९) शेतकी उद्योग पुढील पायावर संघटित केला जाईल

(I) ताब्यात घेतलेल्या जमिनीची प्रमाणबद्ध आकाराच्या शेतामध्ये सरकार विभागणी करील सरकार गावातील खेडुतांना कुळे (कुटुंबाच्या गटाचे मिळून कुळ होईल) या नात्याने पुढील अटीवर ही शेते लागवडीसाठी देईल

(ए) शेताची लागवड एक सामुदायिक शेत (कलक्टाव्ह फार्म) म्हणून केली जाईल

(बी) सरकारने जारी केलेल्या नियमांनुसार आणि आदेशांनुसार शेताची लागवड केली जाईल.

(सी) शेतावर जे आकार (चार्जेस) योग्य रित्या लावले जातील ते दिल्यानतर उरलेले शेतीचे उत्पन्न कुळे आपापसात सरकारने मुक्रर केलेल्या पद्धतीने वाटून घेतील

(ii) जात किंवा पथ याचा भेदभाव न करता गावातील – खेड्यातील रहिवाशांना जमीन भाडेपट्टयाने अशा प्रकारे दिली जाईल की, कुणी जमीनदार नसेल, कुणी जमीनदाराचे कूळ नसेल आणि कुणी भूमीहीन मजूर नसेल

(iii) शेतीसाठी पाणी, जनावरे, अवजारे, खत, बियाणे आदीचा पुरवठा करून सामुदायिक शेताची लागवड करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे सरकारवर बंधनकारक राहील

iv) सरकारचा पुढील बाबतीत हक्क राहील —

(ए) शेतीच्या उत्पन्नावर पुढीलप्रमाणे आकार लावता येईल.

(i) जमीन महसुलासाठी एक भाग

(ii) कर्जरोखेधारकाना परतफेड करण्यासाठी एक भाग आणि

(iii) पुरवठा केलेल्या भांडवली वस्तुच्या वापराकरिता एक भाग

(बी) जी कूळे कूळकायद्याच्या नियमाचा भग करतील किंवा सरकारने दिलेल्या लागवडीच्या साधनाचा सर्वोत्तम उपयोग करण्याची हेळसांड हेतुपुरस्सर करतील किंवा सामुदायिक शेतीच्या योजनेला बाधा येईल अशा प्रकारची कृती करतील त्याच्यासाठी सरकारला शिक्षा मुक्रर करता येतील

(१०) सदर योजना जास्तीत जास्त लवकर कार्यवाहीत आणली जाईल मात्र कोणत्याही परिस्थितीत या राज्यघटनेचा अमल सुरू झाल्याच्या दिनाकापासून दहा वर्षापेक्षा अधिक नाही अशा मुदतीत सदर योजना कार्यवाहीत आणली जाईल.

डॉ बाबासाहेबाची ही अशी समाजवादी सकल्पना होती आणि त्यांना ती घटनेद्वारेच अपरिवर्तनीय स्वरूपात प्रत्यक्षात आणावयाची होती

ही समाजवादी सकल्पना अत्यत स्पष्ट माडलेली आहेच, पण त्यावर डॉ बाबासाहेबानी ज्या स्पष्टीकरणार्थ टीपा लिहून ठेवल्या त्यामुळे भारतावर फार उपकार झाले आहेत कारण डॉ बाबासाहेबांच्या मनात नेमके काय होते याबद्दल बुद्धिभेद करण्यास त्यानी टीपा लिहून मुगीएवढीही जागा धनिकधार्जिण्या बुद्धिमताना आणि स्वार्थी राजकारण्याना ठेवलेली नाही तसेच या अभूतपूर्व समाजवादी सकल्पनेवर धनिकधार्जिणे जी टीका करतील त्या टीकेलाही आपल्या टीपामध्ये अत्यत मर्मभेदी उत्तरे त्यांनी अगोदरच देऊन टाकली आहेत। पण टीपाच्या विवरणापूर्वी, डॉ आंबेडकरांनी आपली सकल्पना साकार करण्यासाठी किती शर्थीने प्रयत्न केले त्याची सविस्तर माहिती सादर केली पाहिजे.

: १५ :

# प्रयत्नांची पराकाष्ठा : पंडित नेहरूंचे महत्त्वाचे पत्र

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटीज' ही त्यांच्या मनातील घटना लिहिली आणि नंतर वाऱ्यावर सोडून दिली असे नसून, या घटनेतील समाजवादी अर्थरचनेचा समावेश भारतीय घटनेतच व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली सर्व प्रयत्न विफल ठरले मात्र पंडित जवाहरलाल नेहरूंची इतकी अनुकूलता होती की, डॉ आंबेडकरांनी 'स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटी' विषयीच लिहिलेल्या पत्राचे त्वरित उत्तर देताना पंडितजींनी 'जे तुम्हाला व मला हवे आहे' असा शब्दप्रयोग केला ! 'स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटीज' या घटनेविषयी डॉ बाबासाहेबांना किती गांभीर्यपूर्वक तळमळ होती त्याबद्दल काडीमात्र शंका राहू नये आणि घटनेद्वाराच अपरिवर्तनीय स्वरुपात समाजवादी अर्थरचना प्रस्थापित करण्याची त्यांची क्रांतिकारक संकल्पना प्रत्यक्षात का आली नाही ते नीट समजावे यासाठी डॉ बाबासाहेबांच्या प्रयत्नांचा धावता आढावा घेऊ या

पंडित गोविंद वल्लभ पंत यांनी घटना समितीमध्ये २४ जानेवारी १९४७ रोजी एक ठराव मांडून सल्लागार समितीची स्थापना करावी असे सुचविले त्यानंतर सल्लागार समितीच्या पाच उपसमित्या नेमण्यात आल्या एका उपसमितीचे अध्यक्ष आचार्य कृपलानी होते आणि ही उपसमिती मूलभूत हक्कासंबंधी होती या उपसमितीचे मिनू मसानी, प्रा के टी शहा, कन्हैयालाल मुनशी, सरदार हरनामसिंग, मौलाना अबुल कलम आझाद, जयरामदास

दौलतराम, राजकुमारी अमृत कौर, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर हे सदस्य होते मागाहून राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले के एम पण्णीकर व हंसा मेहता सदस्य झाले बाराजणांच्या या उपसमितीची पहिली बैठक २७ फेब्रुवारी १९४७ रोजी झाली त्यानंतर २४ मार्चपर्यंतच्या काळात अल्लादी कृष्णस्वामी, कन्हैय्यालाल मुनशी, प्रा के टी शहा, हरनामसिंग यांनी आपापली टिपणे उपसमितीच्या विचारासाठी सादर केली २७ फेब्रुवारी-च्याच बैठकीत डॉ आंबेडकरांनी सांगून टाकले होते की, "याबाबत सखोल विचार करून मी एक पुस्तिकाच तयार केली असून, ही पुस्तिका हेच माझे टिपण असे मानून विचारार्थ घ्यावी" ही पुस्तिका म्हणजेच स्टेटस् अॅण्ड मायनॉरिटीज !

## उपसमितीतही चर्चेस नकार

१५ एप्रिल १९४७ रोजी मूलभूत हक्काच्या उपसमितीची बैठक झाली तेव्हा डॉ आंबेडकरांनी ठराव मांडला की, मी सादर केलेल्या पुस्तिकेतील आर्टीकल २, सेक्शन २, क्लॉज ४ मध्ये ज्या तरतुदी आहेत त्या घटनेच्या मूलभूत हक्काच्या प्रकरणात 'भाग तीन' म्हणून समाविष्ट कराव्यात या तरतुदी म्हणजेच अपरिवर्तनीय स्वरुपात घटनेद्वाराच समाजवादाची प्रस्थापना करण्याची निश्चिती आणि त्यासह संसदीय लोकशाही ! तथापि डॉ आंबेडकर यांची क्रांतिकारक सूचना उपसमितीचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यांनी अध्यक्षीय अधिकारातच फेटाळली! त्यांनी निर्णय दिला की, डॉ आंबेडकर ज्या तरतुदी सुचवीत आहेत त्या मूलभूत हक्कांच्या कक्षेत येत नाहीत ! देशाचे आर्थिक नियोजन मूलभूत हक्कात बसत नाही परिणामी, उपसमितीत चर्चाही होऊ शकली नाही

डॉ आंबेडकरांचे स्पष्ट मत होते की, त्यांनी सुचविलेल्या तरतुदी मूलभूत हक्काच्या कक्षेत येतातच, पण जर त्या फेटाळल्या तर मूलभूत हक्क हे गरिब व मागस बहुजनसमाजाच्या दृष्टीने निरर्थक आहेत त्यांनी तसा युक्तिवाद केला, पण उपयोग झाला नाही

तथापि, डॉ आंबेडकरांची कळकळ इतकी होती की, ज्या सल्लागार समितीची ही उपसमिती होती त्या सल्लागार समितीचे अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे त्यांनी दाद मागितली डॉ बाबासाहेबांनी सरदार पटेल यांना कळविले की, आचार्य कृपलानींचा निर्णय मला मान्य नाही जर मूलभूत हक्क समितीत माझ्या सूचनेची चर्चा होऊ शकत नसेल तर माझी संकल्पना मला अन्यत्र कुठे मांडता येईल? सल्लागार समितीच्या एकूण पाच उपसमित्या आहेत– जर मूलभूत हक्क उपसमितीत माझी संकल्पना मांडता

येत नसेल तर मला वाटले की, निदान अल्पसंख्याक उपसमितीत माझे म्हणणे मांडण्यास अनुमती देण्यात येईल पण माझ्या दुर्दैवाने अल्पसंख्याक उपसमितीच्या अध्यक्षांनीही माझी संकल्पना त्याही उपसमितीच्या कक्षेबाहेरची ठरविली तर सर्व रस्तेच मला बंद होतील त्यातूनही एक मार्ग काढता येईल तुमच्या अध्यक्षतेखालील सल्लागार समितीची आणखी एक उपसमिती आर्थिक नियोजनाचा विचार करण्यासाठी आपण नेमावी किंवा घटना समितीच्या अध्यक्षांनी स्वतंत्रपणे आर्थिक नियोजन समिती नेमावी माझ्या दृष्टीने कोणताही पर्याय स्वीकारला तरी चालेल कारण मी मांडत असलेली संकल्पना अथवा तरतुदी फार महत्त्वाच्या आहेत कोणत्या का समितीत होईना, पण माझ्या या योजनेचा विचार व्हायलाच पाहिजे केवळ मामुली तांत्रिक कारणासाठी माझी सूचना उडविली जाता कामा नये देशातील सर्वसामान्य मजूरवर्ग आणि विशेषत: अनुसूचित जाती यांच्यासाठी माझी सूचना फार महत्त्वाची आहे या सूचनेचा विचार गुणवत्तेवर व्हावा

पण सरदार पटेलांनी कळविले की, देशाच्या दृष्टीने सर्व महत्त्वाच्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीकरण, शेतजमिनीचे राष्ट्रीकरण, सामूहिक शेती हे विषय मूलभूत हक्कात येऊ शकत नाहीत तेव्हा आचार्य कृपलानी यांचा निर्णय योग्य आहे असे माझेसुद्धा मत आहे

## डॉ. राजेंद्रप्रसादांना व पंडित नेहरूंना आवाहन

अखेर २५ एप्रिल १९४७ रोजी डॉ बाबासाहेबांनी घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्रप्रसाद यांच्याकडे एका पत्राद्वारे दाद मागितली, पण देशाच्या घटनेद्वारा आर्थिक रचना मुक्रर करण्याची डॉ आंबेडकरांची अभिनव क्रांतिकारक कल्पना डॉ राजेंद्रप्रसाद यांनाही मान्य झाली नाही

अखेर डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूनाही एक पत्र लिहून आपल्या समाजवादी संकल्पनेला भरभक्कम पाठिंबा देण्याचे कळकळीचे आवाहन केले डॉ बाबासाहेबांनी १४ मे, १९४७ या दिनांकाचे पत्र पंडितजींना पाठविले व सोबत 'स्टेटस् ॲन्ड मायनॉरिटीज'ची पुस्तिका पाठविली त्याला पंडित नेहरूंनी २२ मे, १९४७ या दिनांकाच्या पत्राने उत्तर पाठविले नेहरू स्मारक निधीने सदर पत्र ऑक्टोबर १९८४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'सिलेक्टेड वर्क्स ऑफ जवाहरलाल नेहरू–सिरीज दुसरी–खंड दुसरा' यात प्रथमतःच प्रसिद्ध केले आहे आणि हा सर्वांत ताजा निर्विवाद पुरावा आहे डॉ बाबासाहेबांनी तक्रार केली होती की, माझ्या योजनेची घटनेच्या सल्लागार समितीत किंवा सल्लागार समितीच्या मूलभूत हक्क उपसमितीत चर्चा करण्यासही परवानगी मिळत नाही त्यांनी पंडितजींना

विचारले होते की, आर्थिक योजनेसाठी स्वतंत्र समिती नेमण्याच्या माझ्या सूचनेला पाठिंबा द्याल काय? पंडित नेहरूंनी आपल्या उत्तरात सुचविले की, डॉ बाबासाहेबांच्या सूचना घटनेतच समाविष्ट करण्याचा आग्रह इष्ट ठरणार नाही आर्थिक योजनेसाठी एक वेगळी समिती नेमणे उपयुक्त ठरू शकेल, पण तिचा घटनेशी काही संबंध रहाणार नाही। सध्या सर्व प्रकारच्या फुटीर शक्ती असून त्यांचा मुकाबला करण्यासाठी आणि त्याचवेळी देशातील पुरोगामी शक्तींना सामर्थ्य देण्यासाठी स्थिर व समर्थ प्रशासन निर्माण करणे ही अर्थातच पहिली निकड आहे जर आपण संयमपूर्ण पावले टाकली नाहीत तर प्रतिगामी प्रवृत्ती भारतात गोंधळ माजवितील आणि कुठल्या तरी प्रकारची हुकूमशाहीसुद्धा आणतील

तरीही डॉ आंबेडकरांचे प्रयत्न संपले नाहीत आपल्याला नियोजन समितीवर नेमण्यात यावे आणि तेथे ही अभिनव क्रांतिकारक कल्पना साकार करण्याची संधी मिळावी अशी त्यांची इच्छा होती पण १५ मार्च १९५० रोजी भारत सरकारने क्रमांक १पी (सी) ५० या ठरावानुसार जी नियोजन समिती स्थापन केली त्या समितीत डॉ आंबेडकर नव्हते पंडित जवाहरलाल नेहरू अध्यक्ष आणि चिंतामणराव देशमुख, गगनविहारी मेहता, रा कृ पाटील व कृष्णम्माचारी हे सदस्य होते सप्टेंबर १९५१ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात प्रथमच नियोजन मंत्रीपद निर्माण केले, पण गुलझारीलाल नंदा नियोजन मंत्री झाले। नंदा यांना नियोजन मंत्री नेमल्यावर एका महिन्याच्या आंतच डॉ आंबेडकरांनी आपल्या कायदे मंत्रीपदाचा राजीनामा दिला त्यांनी ११ ऑक्टोबर १९५१ रोजी राजीनाम्याच्या जाहीर निवेदनात सांगितले की, "मला नियोजन मंत्री नेमण्याचे आश्वासन दिले होते, पण नियोजन खाते दिले नाही, हे राजिनाम्याचे पहिले व महत्त्वाचे कारण आहे"

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या प्रकृतीची पर्वा न करता घडविलेले हिंदू कोड बिल लोकसभेत संमत करून घेण्याचा प्रयत्न याच वेळी फसला होता पंडित नेहरूंनी अत्यंत निकराने पाठिंबा देऊनही, राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद आदींच्या त्याच 'जैसे थे' लॉबीने हिंदू कोड बिल स्थगित करणेही भाग पाडले हिंदू कोड बिल संमत न झाल्यास राजीनाम्याचा इशारा पूर्वी देऊनही अखेर पंतप्रधान पंडित नेहरूंनी २६ सप्टेंबर १९५१ रोजी लोकसभेत बिलाच्या स्थगितीची घोषणा खेदपूर्वक केली. १९५२ च्या निवडणुकीपूर्वीचे लोकसभेचे ते अंतिम अधिवेशन होते डॉ आंबेडकरांच्या राजिनाम्याचे हेसुद्धा महत्त्वाचे कारण होते

अशा प्रकारे आर्थिक समता आणि सामाजिक समता देशाला देण्यासाठी

क्रांतिकारक बदल करण्याची डॉ आंबेडकरांची प्रयत्नाची पराकाष्ठा दोनही आघाडयांवर विफल ठरली होती!

## पंडितजींचे डॉ. आंबेडकरांना पत्रोत्तर

पतप्रधान पंडित नेहरूनी डॉ बाबासाहेबांना १९४७ साली लिहिलेले पत्रोत्तर या संदर्भात इतके महत्त्वाचे आहे की, त्याचे संपूर्ण भाषांतर पुढे दिले आहे

नवी दिल्ली,
२२ मे, १९४७

प्रिय डॉ. आंबेडकर,

तुमचे १४ मेचे पत्र आणि तुम्ही पाठविलेले तुमचे 'स्टेटस् अॅन्ड मायनॉरिटीज' पुस्तक मिळाले मी आभारी आहे अर्थात मी तुमचे पुस्तक वाचीनच तूर्त मी तुम्ही उल्लेखिलेली पाने १४ ते १६ आणि ३० ते ३५ वाचली आहेत (म्हणजे आर्टीकल २, सेक्शन २, क्लॉज ४ आणि त्यावरील टीपा)

मी प्रारंभीच सांगू इच्छीतो की, या प्रश्नाबाबतच्या तुमच्या सर्वसामान्य दृष्टिकोनाशी, त्यातही विशेषत उद्योगधंदे व विम्याबाबतच्या दृष्टिकोनाशी, मी सहमत आहे शेतीबाबतच्या दृष्टिकोनाशीही मी सहमत आहे, पण तुम्ही सुचविता ते पाऊल तावडतोब टाकणे सहजी शक्य आहे असे मला वाटत नाही तुम्ही उद्योगधंदे आणि शेती यासंबंधातील नॅशनल प्लॅनिंग कमिटीच्या सूचना पाहिल्याच असतील शेती व्यवसाय भविष्यकाळात मोठ्या प्रमाणात सहकारी किंवा सामुदायिक पायावर करावाच लागेल याविषयी मला शंका नाही, पण आपल्याला छोटी खाजगी शेती पूर्णपणे नाकारता येईल काय याबद्दल मला काहीशी शंका आहे काहीही असले तरी शेतीत असा महत्त्वाचा बदल फक्त संबधिताच्या सर्वसाधारण संमतीनेच घडविता येईल (यात बडचा जमिनदाराच्या संमतीचा मी समावेश करीत नाही) किंवा कोणत्या तरी हुकूमशाही सक्तीने घडविता येईल हुकूमशाही सक्तीच्या मार्गाला माझा विरोध आहे आणि, कोणत्याही प्रकारे, आज असा मोठ्या प्रमाणात बदल शक्य आहे असे मला वाटत नाही आपल्याला शेतकऱ्यांची सर्वसाधारण संमती, महत्त्वाचा बदल त्याना पुरेसा स्पष्टपणे समजावल्याशिवाय आणि त्यानी प्रत्यक्षातील सहकारी शेती आणि कदाचित सामुदायिक शेती पाहिल्याशिवाय, मिळविता येईल काय याबद्दल मला भरपूर शंका आहे जर कोणताही अपरिपक्व प्रयत्न केला तर त्यात मोठे अपयश येण्याची शक्यता आहे आणि अशा अपयशाला तोंड देण्यास आपण पूर्णपणे असमर्थ असू शकतो

घटनेत तुम्ही म्हणता तसे क्लॉज अंतर्भूत करण्यास सैद्धांतिक दृष्ट्या

कसलाच प्रतिबंध नाही, पण मूलभूत हक्कांची जी जुनी कल्पना आहे त्यानुसार तुमची संकल्पना नाही तुमचे म्हणणे अगदी अचूक आहे की, जुन्या धारणा व्यापक केल्याच पाहिजेत आणि त्यात आर्थिक लोकशाहीचा समावेश केलाच पाहिजे एकप्रकारे, घटना समितीच्या उद्दिष्टाच्या प्रस्तावात, काहीशी संदिग्धपणे असली तरी, आम्ही ही दिशा स्वीकारली आहे तथापि, आपण तयार करीत असलेल्या घटनेत, ज्या नेमक्या अर्थरचनेचे उद्दिष्ट स्वीकारीत आहोत ती नेमकी अर्थरचना घटनेतच आणि त्यातही विशेषत मूलभूत हक्कांत समाविष्ट करण्याच्या औचित्याबद्दल मला शंका आहे शेवटी ही बाब व्यवहाराची असून शक्य तितक्या लवकर आपले उद्दिष्ट कसे साकार करता येईल त्याचा व्यावहारिक विचार केला पाहिजे

आज भारतात सर्व प्रकारच्या फुटीर प्रवृत्ती आणि शक्ती याना आपण तोंड देत आहोत पण त्याचवेळी आपल्यात एकतेची जोमदार प्रेरणा असून ती या विघटनाच्या शक्तींचा मुकाबला करीत आहे एकतेची आकांक्षा अंतिमत विजयी होईल याबद्दल मला क्वचितच शंका वाटते भारताचा काही भाग भारतापासून वेगळा होणे याचाच केवळ नव्हे, तर विघटक स्वरूपाच्या अन्य शक्तींचाच उल्लेख मी अधिक करीत आहे बिकट परिस्थिती ओढवणार आहे ही गोष्ट उघडच आहे की, विघटक प्रवृत्तींचा मुकाबला करू शकेल आणि त्याचवेळी देशातील पुरोगामी शक्तींना पुढे नेईल असे स्थिर व समर्थ प्रशासन स्थापन करणे हेच आज आपले सर्वप्रथम अत्यावश्यक उद्दिष्ट आहे जर यावेळी आपण अगदी मूलभूत आर्थिक प्रश्न, घटना निर्मितीच्या प्रक्रियेतूनच सोडवू लागलो तर कदाचित आपण विघटक शक्तींचीच ताकद वाढवू आणि काहीच साध्य करणार नाही योग्य वेळ फार महत्त्वाची असते आणि आज विविध प्रश्न अधिक गुंतागुंतीचे करण्याचे साहस करणे शक्य नाही आपण घटनानिर्मितीचे कार्य पुढे नेले पाहिजे आणि येत्या काही महिन्यात संपविले पाहिजे

मला खात्री आहे की, तुम्ही अडचणी लक्षात घ्याल तसेच तुम्हाला आणि मला जे हवे आहे ते साध्य करण्याचा सर्वांत जवळचा मार्ग म्हणजे प्रथम राजकीय क्षेत्रात स्थैर्य निर्माण करावे आणि नंतर तुम्ही सुचविता ते अन्य मूलगामी प्रश्न लगेच सोडवावेत हेही तुम्ही समजून घ्याल पण उलट प्रकारचा प्रयत्न केला तर स्थैर्यही येणार नाही आणि या समस्येची सोडवणुकही होणार नाही

यात शंकाच नाही की, भारत स्वतंत्र होताच त्वरीत आर्थिक बदल घडविण्याचे उद्दिष्ट असलेल्या बलवान शक्ती उसळतील जसे व्हायला पाहिजे तसेच ते होईल प्रतिगामी शक्ती आज निश्चितच अस्तित्वात आहेत, पण पुरोगामी

शक्तीवर त्या मात करतील अशी मला भीती वाटत नाही मात्र मला नक्कीच काळजी वाटते की, जर आपण सावधपणाने पावले टाकली नाहीत तर या प्रतिगामी प्रवृत्ती भारतात गोंधळही माजवितील आणि कुठल्या तरी प्रकारची हुकूमशाहीही आणतील जर्मनीतील नाझी पक्ष कसा फोफावला आणि लोकप्रिय घोषणा देत त्या पक्षाने प्रतिगामी राजवट कशी निर्माण केली त्याचे उदाहरण आपल्यासमोर आहेच.

म्हणून मी तुम्हाला सुचविन की, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे घटनेद्वाराच आर्थिक रचनेतून बदल करण्याचा आग्रह धरू नका तथापि, आर्थिक नियोजनासाठी एक स्वतंत्र समिती नेमणे कदाचित उपयुक्त ठरेल, पण या समितीचा घटनेशी संबंध जोडता कामा नये आणि घटनानिर्मितीला विलंब होता कामा नये

शुभेच्छांसह

आपला प्रामाणिक

जवाहरलाल नेहरू

: १६ :

# प्रथम समाजवाद ! त्यासमवेत लोकशाही अन्यथा ती भांडवलदारी हुकूमशाही

डॉ बाबासाहेब आंबेडकरानी स्टेटस् अॅण्ड मायनॉरिटीज या घटनेतील आर्टीकल २, सेक्शन २, क्लॉज ४ यात जी समाजवादी योजना माडली ती लोकशाही जगतात अपूर्व आहे डॉ बाबासाहेबांनी या एकाच क्लॉजच्या स्पष्टीकरणाला पाच पाने दिली आहेत त्यांनी स्वतःच म्हटले आहे की लोकशाही जगात कुठल्याही घटनेत अशी सकल्पना स्वीकारलेली नाही ! यामुळे त्यांनी स्पष्टीकरणार्थ जे दीर्घ विवरण केले आहे ते दोन हजार शद्बांहून अधिक असून, बुद्धिमतांना विपरित अर्थ लावण्याचा रस्ता बद केला आहे अर्थात फक्त उपेक्षा करण्याचा रस्ता उरला व धनिकधार्जिण्या बुद्धिमतानी तेच केले !

डॉ बाबासाहेबांचे सपूर्ण स्पष्टीकरण असे आहे – (पाने ४०८ ते ४१२– डॉ बाबासाहेब आबेडकर–राईटीग्ज अॅण्ड स्पीचीस–खड पहिला – महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन )

"लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करण्याचे बधन सरकारवर आणणे हा सदर क्लॉजचा मुख्य हेतू आहे खाजगी उद्यमशीलतेला प्रत्येक मार्ग बद न करता, जास्तीत जास्त उत्पादकता निर्माण होईल आणि त्याचवेळी सपत्तीचे न्याय्य वाटप होईल अशा प्रकारे आर्थिक जीवनाचे नियोजन करण्याचे सरकारवर बधन आहे

"शेतीचे राष्ट्रीयीकरण, सामुदायिक पद्धतीची शेती आणि औद्योगिक क्षेत्रात सुधारित स्वरूपाचा स्टेट सोशॅलिझम याची सकल्पना या क्लॉजमध्ये

आहे शेतीला व उद्योगधंद्यांना आवश्यक असलेले भांडवल पुरविण्याची जबाबदारी पूर्णपणे सरकारवर टाकली आहे. सरकारने भांडवलाचा पुरवठा केल्याशिवाय शेतीचे उत्पादन किंवा औद्योगिक उत्पादन वाढविता येणार नाही त्याचप्रमाणे विम्याच्या राष्ट्रीयीकरणाचीही सूचना केली असून तिची दोन उद्दिष्टे आहेत (१) एखाद्या खाजगी विमा कंपनीपेक्षा राष्ट्रीकृत विमा अधिक सुरक्षितता देतो कारण विमा पॉलिसीची अंतिम रक्कम देण्यासाठी सरकारच्या सर्व साधनसामुग्रीची हमी असते (२) सरकारला आर्थिक नियोजनासाठी भांडवल उभारण्याकरिता आवश्यक असे साधन मिळते जर भांडवल उभारणीचे असे साधन नसेल तर सरकारला फार व्याज देऊन कर्ज काढावे लागेल

## स्टेट सोशॅलिझम का ?

"भारताच्या झपाट्याने औद्योगिकरणासाठी स्टेट सोशॅलिझम अत्यंत आवश्यक आहे याची कारणे दोन आहेत (१) खाजगी उद्योग असे जलद औद्योगिकरण करू शकत नाहीत (२) जरी खाजगी उद्योग जलद औद्योगिकरण करू शकतील असे मानले तरीही त्यातून संपत्तीची विषमता निर्माण होईल ! युरोपात खाजगी उद्योगधंद्यांमुळे आर्थिक विषमता निर्माण झाली आहे आणि भारतीयांना हा एक इषाराच आहे !

"शेतजमिनीचे एकीकरण आणि कूळ कायदे निकामी आहेत अगदी पार निकामी आहेत त्यामुळे शेती संपन्न होऊ शकणार नाही सहा कोटी अस्पृश्य केवळ भूमीहीन मजूर असून, त्यांना शेतजमिनीचे एकीकरण किंवा कूळ कायदे यांचा काहीही उपयोग नाही माझ्या योजनेतील सामुदायिक शेतेच त्यांना सहाय्यक आहेत या योजनेत संबंधित हितसंबंध नष्ट केले जात नाहीत आणि म्हणून या योजनेला तशा कारणावरून काहीही आक्षेप घेता येणार नाही

## घटनेद्वारेच समाजवाद

"सदर योजनेची दोन खास वैशिष्ठ्ये आहेत पहिले असे की, आर्थिक जीवनाच्या महत्त्वाच्या क्षेत्रात स्टेट सोशॅलिझम आणावयाचा आहे दुसरे खास वैशिष्ठ्य असे की, स्टेट सोशॅलिझमची प्रस्थापना ही कायदेमंडळाच्या इच्छेवर सोपविलेली नाही घटनेच्या कायद्यानेच स्टेट सोशॅलिझम अमलात आणला जाईल आणि यामुळे तो अपरिवर्तनीय असेल म्हणजेच कायदेमंडळांना कोणत्याही कायद्याने त्यात बदल करता येणार नाही तसेच प्रशासन यंत्रणेलाही बदल करता येणार नाही !"

(इतक्या सुंदर स्पष्टतेने स्टेट सोशॅलिझमचे स्पष्टीकरण डॉ बाबासाहेबांनी केले असल्यामुळे बुद्धी वाकडी चालवून भलता अर्थ लावण्याची फसवी

वकिली करायला कुणालाही वाव उरलेला नाही! पण डॉ बाबासाहेब तेवढ्या-वरच थांबलेले नाहीत पैशाच्या थैल्यांतून कोणत्या आक्षेपांचा खणखणाट सुरू होईल त्याची अचूक आणि अगोदरच कल्पना करून, डॉ बाबासाहेबांनी अशा आक्षेपांच्या चिंध्या केल्या आहेत आपला युक्तिवाद करताना डॉ बाबासाहेब कसलीही आदळआपट करीत नाहीत डॉ बाबासाहेब सुप्रीम कोर्टात उभे आहेत आणि टाटा-बिर्ला-मफतलाल-जैन यांचे बुद्धिमंत 'पालखीवाला' वकील जे आक्षेपांचे फुगे फुगवित आहेत ते वास्तवाची टाचणी लावून सपाट करून टाकत आहेत असेच दृश्य तुमच्या डोळ्यांसमोर उभे राहील)

## आक्षेपांच्या चिंध्या

डॉ बाबासाहेब पुढे म्हणतात – "घटनात्मक कायद्याचे विद्यार्थी लगेच एक आक्षेप घेतील ते नक्कीच विचारतील की, नेहमीच्या मूलभूत हक्कांची जी लक्ष्मणरेषा आहे तिच्याबाहेर ही संकल्पना जात नाही काय? माझे उत्तर आहे की, नाही, तसे होत नाही! मूलभूत हक्कांच्या मर्यादा-रेषेबाहेर ही संकल्पना जाते असा आभास जर आक्षेप घेणाऱ्यांना होत असेल तर त्याचे कारण एवढेच की, आक्षेप घेणाऱ्यांची मूलभूत हक्कांची कल्पनाच संकुचित आहे किंबहुना यापुढेही पाऊल टाकून असे म्हणता येईल की, घटनात्मक कायद्यात फक्त मूलभूत हक्कांचा समावेश असतो अशी संकुचित मर्यादा जरी युक्तिवादासाठी मान्य केली तरीसुद्धा माझी ही संकल्पना उचित ठरविणारी भरपूर कारणे देता येतात

समाजाच्या आर्थिक बांधणीचे स्वरूप घटनेच्या कायद्यानेच निश्चित करण्याच्या माझ्या संकल्पनेचा हेतू काय आहे? एका व्यक्तीच्या स्वातंत्र्या-वर अन्य व्यक्तींनी आक्रमण करू नये यासाठी संरक्षक व्यवस्था करण्याचाच हेतू आहे! मूलभूत हक्क तर त्यासाठीच असतात ना? कुणाही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अन्य व्यक्तींना आक्रमण करता येऊ नये अशी व्यवस्था करण्या-चाच हेतू लक्षात घेतला म्हणजे चित्र कसे स्वच्छ दिसू लागते! व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि समाजाची आर्थिक बांधणी यांचा परस्पर संबंध कसा स्पष्ट नजरेसमोर येतो! हा परस्पर संबंध अगदी खराखुरा आहे आणि तो अधिक उघड करण्यासाठी काही गोष्टी लक्षात घेऊ या

"राजकीय लोकशाही चार तत्त्वांवर आधारलेली असते ही तत्त्वे पुढीलप्रमाणे मांडता येतील —

(१) व्यक्तीचे कल्याण हेच अंतिम उद्दिष्ट आहे

(२) व्यक्तीला काही व्यक्तिगत हक्क असतात ज्यांची हमी घटनेने व्यक्तीला दिली पाहिजे.________

(३) खास लाभ दिल्याखेरीज व्यक्तीला तिचा कोणताही घटनात्मक हक्क सोडायला लागता कामा नये

(४) सरकारने खाजगी व्यक्तींना इतरांवर सत्ता चालविण्याचे अधिकार देता कामा नये

"खाजगी उद्योग आणि व्यक्तिगत नफ्याची धडपड यावर आधारलेल्या सामाजिक-आर्थिक पद्धतीचे विश्लेषण जो कुणी अभ्यासपूर्वक करील त्याच्या लक्षात येईल की, राजकीय लोकशाहीचे तिसरे तत्त्व आणि चौथे तत्त्व यावर व्यक्तिगत नफ्यासाठी चालणाऱ्या खाजगी उद्योगाची कुरघोडी होते कदाचित प्रत्यक्ष भग होत नसेल, पण या तत्त्वांना बाधा येतेच येते! अन्न-वस्त्र-निवारा यासाठी कितीजणांना आपल्या घटनात्मक हक्कांवर पाणी सोडावे लागते? खाजगी मालकाचे नियत्रण कितीजणांना पत्करावे लागते?

"जे बेकार आहेत त्यांना विचारा की ज्यांना मूलभूत हक्क म्हणतात ते तुमच्या काही तरी कामाचे आहेत काय? बेकाराला निवड करायला सांगा की, कामाचे तास नक्की नसलेली आणि संघटनेला मनाई केलेली काही ना काही वेतनाची नोकरी हवी की भाषण स्वातत्र्य, सघटन स्वातत्र्य, धार्मिक स्वातत्र्य हवे? बेकार इसम कशाची निवड करील ते अगदी नक्की आहे! तो त्या नोकरीलाच तयार होणार, कारण दुसरे काय करू शकतो? त्या बेकाराला भीती आहे उपासमारीची! त्याचा निवारा गमावण्याची! काही बचत असेलच तर ती खलास होण्याची! मुलाची शाळा बद करावी लागेल याची! भीक मागावी लागेल याची! मेलाच तर सार्वजनिक पैशाने जाळावे किंवा पुरावे लागेल याची! अशा भीतिग्रस्त बेकाराला मूलभूत हक्कांचा काही उपयोग नाही आणि नोकरी मिळून जगण्यासाठी बेकाराला सर्व मूलभूत हक्क सोडावेच लागतात

## भांडवलशाहीची हुकूमशाही

"आता ज्याना नोकरी आहे त्यांचे काय? घटनेचे तज्ज्ञ वकील असे गृहीत धरतात की, घटनेने मूलभूत हक्क जारी केले की, लोकांच्या स्वातत्र्याचे रक्षण झालेच आणखी काहीही करायला नको त्यांचे म्हणणे असते की, जर सरकारने आर्थिक आणि सामाजिक बाबतीत हस्तक्षेप केला नाही तर जे उरते ते व्यक्तीचे स्वातत्र्य! यासाठी सरकारी हस्तक्षेप कमीत कमी असावा म्हणजे व्यक्तीचे स्वातत्र्य जास्तीत जास्त होईल असा त्यांचा युक्तिवाद!

"सरकारने सामाजिक-आर्थिक जीवनात हस्तक्षेप केला नाही म्हणजे जे उरते ते व्यक्तीच स्वातत्र्य हे खरे आहे पण इथेच सर्व प्रश्न सपत नाहीत

ना! आणखी एका प्रश्नाचे उत्तर शिल्लक रहाते आणि तो प्रश्न असा की व्यक्तीस्वातंत्र्य कुणाला आणि कुणासाठी? उघडच आहे की, असे व्यक्ती-स्वातंत्र्य म्हणजे जमीनदाराना भुई-भाडे वाढविण्याचे स्वातंत्र्य! भांडवल-दारांना कामाचे तास वाढविण्याचे आणि वेतन कमी करण्याचे स्वातंत्र्य! व्यक्तीस्वातंत्र्य त्याचेच असणार! दुसरे तिसरे काही असूच शकत नाही कारण कामगाराच्या तांड्यांना नोकरीवर ठेवून वस्तुचे प्रचंड उत्पादन कर-ण्याच्या या पद्धतीत कुणीतरी नियम केलेच पाहिजेत! कामगारांनी काम करावे, उत्पादन होत रहावे आणि उद्योगाचे चक्र फिरत रहावे यासाठी नियम करावेच लागतात जर सरकारने अर्थव्यवस्थेचे नियम केले नाहीत तर खाजगी भांडवलदार नियम करतील म्हणजेच सरकारी हस्तक्षेप नको याचाच अर्थ भांडवलदारांची हुकूमशाही!"

डॉ. बाबासाहेब पुढे म्हणतात— असे घडू नये म्हणून कसा प्रतिबंध करता येईल? जीवन, स्वातंत्र्य आणि सुखाकरिता प्रयत्न यासाठी मूलभूत हक्क असतात, पण बेकारांचे तसेच कामगारांचे मूलभूत हक्क कागदावरच राहू नयेत म्हणून काय करावे? जगातील लोकशाही राष्ट्रांनी अशी उपाय-योजना केली की राजकीय क्षेत्रात लहरी निर्बंध लादण्याचे सरकारचे अधि-कार मर्यादित करावेत आणि कायदे मंडळाचे सर्वसामान्य अधिकार वापरून आर्थिक क्षेत्रात धनिकांना सामान्य माणसावर लहरी निर्बंध लादण्यास प्रति-बंध करावा! पण या उपाययोजनेचा अपुरेपणा किंबहुना फोलपणा यापूर्वीच सिद्ध झाला आहे

कायदेमंडळाची सत्ता सामान्य माणसाच्या बाजूने उभी राहील ही शक्यता संशयास्पद आहे प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार असला तरीही प्रत्येक कायदेमंडळ आणि प्रत्येक सरकार याच्यावर धनिकांचे नियंत्रण असते असाच अनुभव आहे सामान्य माणसावर धनिकांच्या स्वात-त्र्याचे आक्रमण होते तेव्हा कायदेमंडळे सामान्य जनतेसाठी हस्तक्षेप करतील असे मानता येणार नाही म्हणून माझी अगदी वेगळी उपाययोजना आहे. त्यानुसार सरकारने हवे तसे निर्बंध जारी करू नयेत यासाठी सरकारी सत्ता मर्यादित केली आहेच, पण तेथेच न थांबता धनिकाना सामान्यजनावर लहरी निर्बंध लादता येऊ नयेत यासाठी धनिकाची शक्तीही मर्यादित केली आहे किंबहुना अगदी अचूक प्रतिपादन करायचे तर असे म्हणावे लागेल की, धनिकाचे जनतेच्या आर्थिक जीवनावरील नियंत्रणच नाहीसे करून धनिकांची जनतेवर पकड रहाण्याची शक्यताच नाहीशी केली आहे समर्थांनी दुर्बलाच्या हक्कांवर व स्वातंत्र्यावर गदा आणू नये यासाठी जे दोन प्रतिबंधक मार्ग आहेत त्या दोन मार्गांपैकी माझ्या पद्धतीचाच मार्ग अधिक प्रभावी आहे

याबद्दल काडीचीही शंका नाही। या दृष्टीने पहाता माझी संकल्पना ही मूलत व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण करणारीच पद्धती आहे म्हणून घटनेची मर्यादारेषा ओलांडली असे कारण सांगून कोणीही घटना तज्ज्ञ आक्षेप घेऊ शकणार नाही"

## समाजवादाच्या निश्चितीसह लोकशाही

यानतर तर डॉ बाबासाहेबांनी युक्तिवादाच्या तर्कशुद्ध सौदर्याचा कळस गांठला आहे ते म्हणतात, "आतापर्यंत व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण कसे होईल या दृष्टिकोनातून माझ्या सकल्पनेचा विचार केला, पण या सकल्पनेत त्याहून अधिक आहे याची नोंद घ्यायला हवी ससदीय लोकशाही नाहीशी न करता स्टेट सोशॅलिझम प्रस्थापित करण्याचा हा प्रयत्न आहे। तसेच ससदीय लोकशाहीच्या इच्छेवर स्टेट सोशॅलिझमची प्रस्थापना न सोपविता घटनेच्या कायद्यानेच स्टेट सोशॅलिझम अमलात आणण्याचा हा प्रयत्न आहे।"

(म्हणजेच ससदीय लोकशाही ही धनिकाच्या आणि धनिकधार्जिण्याच्या वर्चस्वाखाली रहाणार हे लक्षात घेऊन प्रथम स्टेट सोशॅलिझम घटनेच्या कायद्यानेच अपरिवर्तनीय स्वरूपात प्रस्थापित करून, त्यासमवेत ससदीय लोकशाही देण्याची डॉ बाबासाहेबांची उपाययोजना अपूर्व आहे। भारतालाच नव्हे तर जगालाही मार्गदर्शक आहे। यामुळे लोकशाहीसाठी जे खरेखुरे तळमळतात त्यांचे आक्षेप दूर होतातच, पण धनिकांच्या थैल्या फुगत रहाव्यात यासाठी कावेबाजपणाने जे लोकशाहीचा उदो उदो करतात त्या लुच्च्या बुद्धिमंतांचा कपाळमोक्षच होतो!)

: १७ :

# समाजवादासह लोकशाहीसाठी हीच वेळ आहे !

समाजवादाच्या निश्चितीसह लोकशाहीची संकल्पना सुस्पष्ट करणाऱ्या आपल्या टीपांमध्ये युक्तिवादाचा कळस बिंदु गांठताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात--"स्टेट सोशॅलिझमचे टीकाकार आणि हितचिंतकसुद्धा निश्चितच विचारतील की, स्टेट सोशॅलिझम देशाच्या घटनात्मक कायद्यातच का समाविष्ट करता ? कायद्याच्या सर्वसामान्य पद्धतीने कायदेमंडळेसुद्धा स्टेट सोशॅलिझम प्रस्थापित करू शकतात मग कायदेमंडळांवर का सोपवित नाही ? तसे का करीत नाही त्याचे कारण कळायला कठीण नाही समाजवादातील सर्वंकष नियोजित अर्थव्यवस्थेच्या यशाची एक अत्यावश्यक अट अशी आहे की, नियोजन मध्येच तहकूब करता कामा नये आणि सोडून देता कामा नये नियोजन कायम स्वरूपाचे असलेच पाहिजे नियोजन कायम राहील याची निश्चिती कशी करावी हा प्रश्न आहे अर्थातच संसदीय लोकशाहीतील सरकारचे स्वरूप अशी निश्चिती देत नाही, कारण संसदीय लोकशाहीत त्या त्या वेळच्या बहुमताची सत्ता संसदेत तसेच सरकारात असते शेती आणि उद्योगधंदे या क्षेत्रात स्टेट सोशॅलिझम आणणाऱ्याचा एका निवडणुकीत विजय होईल, पण नंतरच्या निवडणुकीत विरोधी विचारांच्या व्यक्तींचे बहुमत होऊ शकेल म्हणजे एका निवडणुकीनंतर स्टेट सोशॅलिझम अमलात आणला तर दुसऱ्या निवडणुकीनंतर तो सोडून दिला जाण्याची शक्यता राहील

"म्हणून स्टेट सोशॅलिझमच्या संकल्पनेनुसार ज्यांना समाजाची आर्थिक बांधणी करावयाची आहे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे की, असे मूलभूत

उद्दिष्ट सर्वसामान्य कायद्यावर अवलंबून ठेवता येणार नाही कारण साधे बहुमत ज्याप्रमाणे एकादा कायदा करू शकते त्याचप्रमाणे तोच कायदा फेकूनही देऊ शकते शिवाय राजकीय लाटा तर्कशुद्ध विचारानुसार येत नसतात व जात नसतात म्हणून स्टेट सोशॅलिझमच्या उद्दिष्टासाठी राजकीय लोकशाही समर्पक आहे असे वाटत नाही

"तर मग स्टेट सोशॅलिझम अमलात आणण्यासाठी पर्यायी मार्ग कोणता? हुकूमशाही हा पर्याय आहे! स्टेट सोशॅलिझम यशस्वी होण्यासाठी कायम स्वरुपात अमलात आणायला हवा आणि हुकूमशाहीमुळे स्टेट सोशॅलिझमला कायम स्वरूप प्राप्त होईल यात काहीच शंका नाही पण हुकूमशाहीविरुद्ध जी एक वस्तुस्थिती आहे तिचे काय? ज्यांचा व्यक्तीस्वातंत्र्यावर विश्वास आहे त्यांचा हुकूमशाहीला कडवा विरोध आहे आणि खुल्या समाजासाठी संसदीय लोकशाहीच हवी असा त्यांचा आग्रह आहे कारण त्याना असे वाटते की, संसदीय लोकशाहीतच व्यक्तीस्वातंत्र्य लाभू शकते हुकूमशाहीत व्यक्तीस्वातंत्र्य नसते म्हणून व्यक्तीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते संसदीय लोकशाही सोडायला तयार नाहीत त्यांचा स्टेट सोशॅलिझमला कितीही पाठिंबा असला तरी ते संसदीय लोकशाही सोडणार नाहीत! हुकूमशाहीमुळे स्टेट सोशॅलिझम कायम स्वरुपात अमलात येत असला तरी संसदीय लोकशाहीच्या बदल्यात सोशॅलिझमला ते तयार नाहीत!

"म्हणजे आता प्रश्न असा आहे की, हुकूमशाहीविरहित स्टेट सोशॅलिझम म्हणजेच संसदीय लोकशाहीसह स्टेट सोशॅलिझम कसा आणावयाचा? त्यातून मार्ग असा दिसतो की, स्टेट सोशॅलिझम घटनेच्या कायद्यानेच प्रस्थापित करून संसदीय लोकशाही राहू द्यायची!! त्यामुळे संसदीय बहुमताला स्टेट सोशॅलिझम तहकूब करता येणार नाही, बदलता येणार नाही आणि नष्टही करता येणार नाही! याच मार्गाने आपण तीनही उद्दिष्टे साकार करू शकतो—(१) समाजवाद अमलात आणतो (२) संसदीय लोकशाही राहू देतो आणि (३) हुकूमशाही टाळतो!!"

## होय! आता नक्कीच वेळ आली आहे!

पाश्चात्य लेखक आणि विचारवंत म्हणजेच प्रत्यक्षात ब्रिटीश-अमेरिकन लेखक आणि विचारवंत जे जे लिहितील त्याची निव्वळ अर्धवट पोपटपंची करणारे 'उधारउसनवार बुद्धिमंत' बहुत झाले पाश्चात्यांच्या लोकशाही मांडणीत दोष कोणता आहे? दीडशे वर्षे ज्यानी भारताची संपत्ती लुटून नेली आणि भारतातील भेदभावांना पद्धतशीरपणे खतपाणी घालून भारताची फाळणी करण्याची आपत्ती आणली ते ब्रिटीश उदारमतवादी कसे? अशा प्रश्नांचे चिंतनमनन

उधारउसनवार बुद्धिमतांनी केले नाही इंग्रजी वाचायचे आणि नाचायचे एवढाच धंदा त्यांनी वर्षानुवर्षे केला इंग्रजी भाषेमुळे या विद्वानांचे पोकळ आणि भोंगळ स्वरूप सामान्य जनतेला कळू शकले नाही एखादा वकील कोर्टात फाडफाड इंग्रजीत बोलला म्हणजे तो अगदी गैरलागू व फालतू बोलला तरी-अशिल थक्क होतात ! इंग्रजीचा महिमा असा की, सामान्य विचारही सफाईदार इंग्रजी भाषेत सांगताच विशेष वाटतात आणि ज्यांना इंग्रजी येत नाही ते गारच होतात। यामुळे तथाकथित विद्वत्ता म्हणजे पडक्या विटक्या खोलीला केलेले इंग्रजी भाषेचे इंटीरियर डेकोरेशन आहे ही वस्तुस्थिती लोकांच्या लक्षात आली नाही

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पाश्चात्यांच्या लोकशाहीतील आणि विचारसरणीतील दोष दाखविला पाश्चात्य देशांच्या घटनातील दोष फेकून देऊन, लोकशाही आदर्श ठरावी अशी समाजवादी संकल्पनेची घटना त्यांनी सांगितली कारण ते भारतातील सामान्य जनतेच्या कल्याणासाठी आणि देशाच्या भरभराटीसाठी तळमळत होते। या तळमळीतूनच ते द्रष्टे झाले आणि १९४६ सालीच 'स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटीज'मध्ये त्यांनी बजावले की, लोकशाहीमध्ये धनिकांची हुकूमशाही निर्माण होईल कायदेमंडळांतील लोक प्रतिनिधी ही धनिकाचीच बाहुली असतील आणि म्हणून संसदीय लोकशाहीतून स्टेट सोशॅलिझमची प्रस्थापना होणार नाही। त्यांनी जे सांगितले तसेच घडलेले आज १९८५ साली दिसत आहे ना ?

स्टेटस अॅन्ड मायनारिटीज मधील स्टेट सोशॅलिझमच्या स्पष्टीकरणात डॉ बाबासाहेब पुढे म्हणतात—"जगातील लोकशाही राष्ट्रांच्या ज्या घटना आहेत त्यांचे उद्दिष्ट, समाजाच्या राजकीय बांधणीचे स्वरूप निश्चित करणे एवढेच आहे त्या घटनांमध्ये आर्थिक बांधणी करण्याचे सोडूनच दिलेले असते. त्याचा परिणाम असा होतो की, आर्थिक रचना ही राजकीय लोकशाहीशी विसंगत असते आणि या आर्थिक रचनेतून ज्या शक्ती निर्माण होतात त्या शक्ती लोकशाहीची राजकीय रचना पूर्णपणे निरर्थक करतात"

भांडवलदारांच्या थैल्यामुळे राजकीय लोकशाही सामान्य जनतेला निरर्थक होते असे डॉ बाबासाहेबांनी सदर परिच्छेदात म्हटले आहे किंबहुना हा आक्षेप त्यांनी वारंवार घेतला आहे

डॉ बाबासाहेब पुढे म्हणतात की, "लोकशाही जगातील विद्यमान घटनांपेक्षा माझी सूचना आगळी आहे ज्यांना समाजवाद हवा आणि संसदीय लोकशाहीसह आणि हुकूमशाहीशिवाय समाजवाद हवा त्यांनी माझ्या संकल्पनेचे स्वागत केले पाहिजे

## जुनेपुराणे घटना तज्ञ

"लोकशाहीत प्रत्येक माणसाला समान मूल्य असते एक माणूस आणि त्याचे एक मूल्य हे तत्त्व म्हणजे लोकशाहीचा आत्मा आहे पण दुर्दैवाने हे तत्त्व फक्त राजकीय क्षेत्रातच अमलात आणण्याचा लोकशाहीने प्रयत्न केला आहे प्रत्येक माणसाला एक मत असा नियम करून राजकीय क्षेत्रातच समान मूल्य प्रत्येक नागरिकाला लाभले, पण आर्थिक रचनेत या समानतेचा अमल केला नाही ज्यांच्या हातात आर्थिक रचना घडविण्याचे आहे त्यांच्यावरच आर्थिक घडण सोडून दिली ! असे का झाले ? कारण घटना तज्ज्ञांवर जुन्या पुराण्या कल्पनेचाच प्रभाव होता त्याची कालहृत कल्पना अशी की, सरकार जनतेला जबाबदार राहील आणि सरकार जनतेवर जुलूम करू शकणार नाही अशी घटना बनविणे म्हणजे लोकशाहीची निर्दोष घटना तयार करणे ! यामुळे लोकशाही राष्ट्रे म्हणून जी ओळखली जातात त्या बहुतेकांच्या घटना प्रत्येक प्रौढाला मताचा अधिकार आणि व्यक्तीचे मूलभूत हक्क बहाल करून तियेच थांबतात दुसऱ्या शब्दात सांगायचे तर समाजाची राजकीय घडण निश्चित करणे हेच त्यांच्या घटनेचे कार्य आहे आणि हीच घटनेची मर्यादा आहे असे जुन्या काळातील घटना तज्ज्ञ मानत असत जर लोकशाहीचे 'एक माणूस एक मूल्य' हे तत्त्व साकार करावयाचे असेल तर समाजाची आर्थिक रचनाही निश्चित करणे अत्यावश्यक आहे याची त्यांना कधीही जाणीव झाली नाही !

"आता वेळ आली आहे घटनेच्या कायद्याने समाजाची राजकीय रचना त्याचप्रमाणे आर्थिक रचना निश्चित करण्यासाठी धाडसी पाऊल टाकण्याची ! घटनानिर्मितीच्या क्षेत्रात भारतासारखे जे देश उशिरा आले आहेत त्यांनी अन्य देशांतील दोषांचे अनुकरण करता कामा नये ! त्यांच्या अनुभवांचा फायदा घेऊन त्यांच्या चुका टाळल्या पाहिजेत !"

डॉ बाबासाहेब म्हणाले की, आता वेळ आली आहे ! पण धनिक धार्जिण्यांची लॉबी आणि सनातनी कर्मठांची लॉबी कांग्रेसमध्ये आणि परिणामी घटना समितीत एवढी बळकट होती की, डॉ बाबासाहेबाना आपले हे विचार साकार करता आले नाहीत ! धनिकांनी व सत्ताधाऱ्यानी पाळलेल्या पोकळ व भोंगळ बुद्धिमतांनी डॉ बाबासाहेबांची क्रांतिकारक सकल्पना उपेक्षेने आणि दिशाभूल करून मारली डॉ बाबासाहेबाना केवळ 'दलिताचे नेते' ठरवून विस्मृतीत गाडली ! दडवते बुद्धिमत व गडवते बुद्धिमत याना या कामी इंग्रजी भाषा उपयोगी पडली 'डॉ बाबासाहेबानी दिलेली लोकशाही

वाचवा' हा प्रत्यक्षातील भांडवलशाहीच्या बचावाचा हाकारा उपयोगी पडला. पण सर्व काळात सर्व लोकांना फसविता येत नाही। भारतालाच नव्हे तर जगाला तारणाऱ्या या क्रांतिकारक आणि खऱ्याखुऱ्या लोकशाहीच्या विचारांचा प्रभाव गेल्या ३४ वर्षांतील विदारक अनुभवानंतर निश्चित पडणार आहे। डॉ बाबासाहेब १९४६ साली म्हणाले की, धाडसी पाऊल टाकण्याची आता वेळ आली आहे आणि आता तर नक्कीच ती वेळ आली आहे !

# गौतम बुद्धाने आम्हाला नेमके काय शिकविले ?

: १८ :

# परिवर्तनशील बुद्ध धम्म

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यानी बौद्ध धम्माचा स्वीकार आपल्या लाखो अनुयायासह केला तो विजयादशमीचा म्हणजे दसऱ्याचा दिवस होता तेव्हापासून विजयादशमीचा दिवस हा धम्म चक्र परिवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले (जिल्हा नासिक) येथे दलित वर्गीय परिषदेत डॉ आंबेडकरांनी घोषणा केली होती की, "मी हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही" हिंदू धर्मात मरायचे नाही हा ज्याप्रमाणे डॉ बाबासाहेबांचा निर्धार झाला होता त्याचप्रमाणे मुस्लीम धर्मात जायचे नाही हाही त्यांचा पक्का निर्णय त्यापूर्वीच झाला होता

## इस्लामचा स्वीकार का केला नाही ?

याचे अनेक निर्णायक पुरावे आहेत—डॉ आंबेडकरांनी लंडनहून १३-९-१९३३ या दिनांकाचे एक पत्र सुभेदार सवादकर यांना लिहिले. डॉ आंबेडकर मुसलमान होणार अशी बातमी पसरल्यामुळे सुभेदार सवादकरांनी डॉ आंबेडकराना पत्र पाठवून खुलासा विचारला तीक्ष्ण उत्तराच्या पत्रात डॉ आंबेडकर म्हणतात —

"गवईने (नागपूरचे एक पुढारी गणेश अ गवई) केलेल्या मूर्खपणाबद्दल मला आश्चर्य वाटते धर्मांतरासबधाने त्याचे माझे दोनचार वेळा भाषण झाले त्यात मी त्याला दोन गोष्टी निश्चयात्मकपणे सांगितल्या. पहिली ही की, मी स्वत. हिंदू धर्मात रहाणार नाही व हिंदू म्हणवून घेणार नाही.

दुसरी गोष्ट मुसलमान होणार नाही तिसरा कोणता तरी धर्म स्वीकारीन तूर्त माझा कल बुद्ध धर्माकडे आहे माझी कारणे त्याला पटली असे असता त्या मूर्खाने असे खोटे का लिहिले याचे मला आश्चर्य वाटते मी मुसलमान झालो अशी बातमी वाचून मुसलमान लोकाना का हर्ष व्हावा याचे त्याच्याहीपेक्षा आश्चर्य वाटते " (विश्रब्ध शारदा–खड पहिला–पान ४३१)

डॉ आंबेडकर चरित्रात धनजय कीर यांनी डॉ आंबेडकराची इस्लाम धर्माविषयीची मनोधारणा पुढीलप्रमाणे सागितली आहे—"रा ग प्रधान यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमडळ डॉ बाबासाहेबाना येवले येथील धर्मातराच्या घोषणेनतर भेटले तेव्हा मुसलमान धर्माचा उल्लेख करून डॉ बाबासाहेबांनी सागितले की, ज्यांच्या धार्मिक भावना आणि व्यवहार यात हात घालणे अत्यत धोक्याचे आहे असा जर कुठला समाज असेल तर तो मुस्लीम समाज होय!" (पान २६८) डॉ बाबासाहेबांच्या या एका वाक्यात एकाद्या जाड-जुड ग्रथाचा आशय सामावलेला आहे त्याना असा धर्म नको होता की, ज्यात अक्षराचाही बदल होऊ शकत नव्हता! मुस्लीम धर्म हा कुराणाला बाधलेला आहे आणि कुराणातील प्रत्येक शब्द हा अल्लाचा अतिम शब्द आहे महमद पैगबर हे अल्लाचे अखेरचे प्रेषित आहेत आणि अल्लाच्या आज्ञा त्यांनी अतिमत सांगितल्या असल्याने कुराणात अक्षराचाही फरक होऊ शकत नाही डॉ बाबासाहेबाना धर्म कसा हवा होता? तर बुद्धिवादी धर्म हवा होता! ज्यात अनुभवानुसार परिवर्तन करता येईल असा धर्म हवा होता! "बुद्ध आणि त्याच्या धम्माचे भवितव्य" नांवाचा एक महत्त्वाचा लेख डॉ आबेडकरानी महाबोधी सस्थेच्या मे १९५० च्या मासिकात लिहिला त्यात त्यानी म्हटले आहे की, "जर धर्म चालू रहावयाचा असला तर तो बुद्धिप्रामाण्यवादी असला पाहिजे विज्ञान हे बुद्धिप्रामाण्यवादाचे दुसरे नाव आहे!"

## परिवर्तनशील धम्म

वेगळ्या शब्दात आपण असे म्हणू या की, विज्ञानाने जे सिद्ध केले ते स्वीकारण्यास ज्याची यत्किंचित हरकत नाही असा धर्म बाबासाहेब आबेडकराना हवा होता किमान चोवीस वर्षे म्हणजे दोन तपे सतत वाचन-मनन-चिंतन करून अगदी अखेर डॉ आंबेडकर यानी बुद्ध धम्माचा स्वीकार केला आपण ईश्वराचे अतिम प्रेषित आहोत असा दावा गौतम बुद्धाने कधीही केला नाही गौतम बुद्धाचा धम्म हा मानवाने मानवांना सागितलेला धम्म आहे अर्थात तो अखेरचा शब्द नव्हे म्हणूनच डॉ बाबासाहेब आबेडकराना प्रचलित बौद्ध धम्मापेक्षा मूलगामी बुद्धिनिष्ठ बदल करून आधुनिक रूपात बौद्ध धम्म मांडता

: १८ :

# परिवर्तनशील बुद्ध धम्म

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार आपल्या लाखो अनुयायांसह केला. तो विजयादशमीचा म्हणजे दसऱ्याचा दिवस होता तेव्हापासून विजयादशमीचा दिवस हा धम्म चक्र परिवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले (जिल्हा नासिक) येथे दलित वर्गीय परिषदेत डॉ आंबेडकरांनी घोषणा केली होती की, "मी हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही" हिंदू धर्मात मरायचे नाही हा ज्याप्रमाणे डॉ बाबासाहेबाचा निर्धार झाला होता त्याचप्रमाणे मुस्लीम धर्मात जायचे नाही हाही त्यांचा पक्का निर्णय त्यापूर्वीच झाला होता

## इस्लामचा स्वीकार का केला नाही ?

याचे अनेक निर्णायक पुरावे आहेत——डॉ आंबेडकरांनी लंडनहून १३-९-१९३३ या दिनांकाचे एक पत्र सुभेदार सवादकर यांना लिहिले डॉ आंबेडकर मुसलमान होणार अशी बातमी पसरल्यामुळे सुभेदार सवादकरांनी डॉ आंबेडकरांना पत्र पाठवून खुलासा विचारला तीक्ष्ण उत्तराच्या पत्रात डॉ आंबेडकर म्हणतात ——

"गवईने (नागपूरचे एक पुढारी गणेश अ गवई) केलेल्या मूर्खपणाबद्दल मला आश्चर्य वाटते धर्मांतरासंबधाने त्याचे माझे दोनचार वेळा भाषण झाले त्यात मी त्याला दोन गोष्टी निश्चयात्मकपणे सांगितल्या पहिली ही की, मी स्वत. हिंदू धर्मात रहाणार नाही व हिंदू म्हणवून घेणार नाही.

असा डॉ आंबेडकर म्हणत असत की, बुद्धिला शरण जा--ज्ञानाला शरण जा असे गौतम बुद्धाने सांगितले म्हणून बुद्धाने आम्हाला काय शिकविले ?

## १) बुद्धाने आम्हाला सर्वप्रथम बुद्धिवाद शिकविला. बुद्धिलाच प्रमाण मानण्यास शिकविले.

गौतम बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर गौतमाने चार आर्य सत्ये सांगितली पहिले आर्य सत्य असे की, दुःख आहे! जीवनात अनेकविध दुःखे आहेत दुसरे आर्य सत्य असे की, या दुःखाचे कारण आहे! तृष्णा हे या दुःखाचे कारण आहे! सदर दुःखाचे कारण दूर करता येते हे तिसरे आर्य सत्य आहे आणि दुःखनिवारणाचा अष्टांग मार्ग हे चौथे आर्य सत्य होय अशा चार आर्य सत्यांचा प्रचार बुद्धाने सर्वत्र केला वरकरणी पाहिले असता त्यातील महान अर्थ उमगत नाही यात विशेष ज्ञान ते कोणते असे वाटू लागते पण या चार आर्य सत्यांत क्रांतिकारक आशय आहे या चार आर्य सत्यांत ईश्वराचा किंवा अल्लाचा कुठेही संबंध नाही मानवी दुःखाचे कारण ईश्वर नाही आणि दुःखातून मुक्ततेचा मार्ग ईश्वराची कृपा संपादन करणे हा नाही असा क्रांतिकारक आशय बुद्धाच्या आर्यसत्यांत आहे दुःखाला कारण आपणच आहोत आणि आपणच आपल्या प्रयत्नांनी दुःखाचे कारण नाहीसे करावयाचे आहे असे गौतम बुद्धाने सांगितले! गौतम बुद्धाचे महापरिनिर्वाण अगदी निकट आले तेव्हा त्याचा सर्वोत्तम शिष्य आनंद व्याकूळ झाला बुद्धाला आनंद म्हणाला की, "स्थापिलेल्या धर्माच्या व्यवस्थेविषयीच्या इच्छा शिष्यवर्गास सांगितल्या-शिवाय गुरुमहाराज निर्वाणाप्रत जाणार नाहीत अशी माझी खात्री होती" गौतमाने उत्तर दिले, "आनंदा, मी आता काय करावे अशी शिष्य मंडळीची अपेक्षा आहे ? धर्मरहस्य काय हे मी त्यांना सविस्तर सांगितले आहे शेलक्या मंडळीकरिता गुप्त मताचा उपदेश, सर्वांच्या देखत सांगायची निराळीच तत्त्वे, असा पंक्तीप्रपंच तथागताने केला नाही मला जे काही सांगायचे होते ते सर्व शिष्यमंडळीस मी सांगितलेच आहे धर्माधिकारी बनून जगद्गुरूच्या श्रेष्ठत्वाची ज्याला मिरवणूक काढावयाची असेल त्याने धर्मानुयायांना आपल्या अमुक इच्छा आहेत म्हणून सांगावे धर्मानुयायावर अंमल मिरविण्याचा तथागतांचा उद्देशच नाही आनंदा, स्थापिलेल्या धर्माविषयीचे माझे हेतू तरी काय असणार ? आनंदा, माझे आता वय झाले मी अशक्त झालो माझ्या आयुष्याची यात्रा संपली मी आता म्हातारा झालो आहे माझ्या वयाला आज ऐंशी वर्षे झाली तेव्हा, आनंदा, आता तुम्ही स्वतःवरच अवलंबून राहिले पाहिजे तुम्हीच तुमचे वाटाडे तुमचाच तुम्हाला आश्रय दुसऱ्या कोणाचा आश्रय करू नका सत्यावर तुम्ही विसंबून असा सत्याच्या मार्गाने चाला दुसऱ्या कशावरही आपली भिस्त ठेवू

नका मी इहलोकची वस्ती सोडल्यावर जे जे म्हणून स्वतःवरच अवलंबून राहतील, दुसऱ्या कोणाच्याही आश्रयाकरिता धावणार नाहीत, सत्यावरच सर्व भार टाकून इतर कशावरही विश्वास ठेवणार नाहीत, तेच तेच केवळ, माझे खरे शिष्य होत।"

म्हणजेच बुद्धाने आनंदाला सांगितले की, सत्य हाच धम्म आहे। सत्याखेरीज इतर कशावर विश्वास ठेवता कामा नये। सत्य कुणीही अंतिमतः सांगितलेले नाही तर ज्याचे त्याने अनुभवाने व बुद्धीने पारखायचे असते। गौतम बुद्धाने शेवटचे शब्द उच्चारले की, "ऐका शिष्यहो, माझे शेवटचे सांगणे इतकेच आहे ज्यास उत्पत्ती आहे त्याचा लय झालाच पाहिजे सतत तुमचा प्रयत्न चालू द्या"

म्हणून बुद्धाने आम्हाला शिकविले की, सत्य ज्ञानप्राप्ती हेच उद्दिष्ट, बुद्धिवाद हेच साधन आणि सतत प्रयत्न हेच कर्तव्य! वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर म्हणता येईल की,

## २) सतत प्रयत्न करा असे अखेरचे शब्द उच्चारणाऱ्या गौतमाने स्वावलंबी प्रयत्नवाद शिकविला!

गौतम बुद्धाने कधीही असा दावा केला नाही की, आपणास ईश्वराचा साक्षात्कार झाला आहे! गौतमाकडे जे मार्गदर्शनासाठी येत त्यांना आपले म्हणणे पटवून देताना गौतम वारंवार विचारीत असे की, "माझे म्हणणे तुझ्या आजवरच्या अनुभवाला पटते का?" त्याने 'होय' असे उत्तर दिल्यावरच गौतमाचा उपदेश पुढे सुरू होत असे "मी जे सांगत आहे ते नीट ऐक आणि तेच अंतिम सत्य आहे असे मान! कारण मी ईश्वराचाच संदेश तुला सांगत आहे" असा गौतम बुद्धाचा कधीही दावा नव्हता आपण एक उदाहरण पाहू या —

ब्रम्ह नित्य आणि अविनाशी आहे या सिद्धांताबद्दल चर्चा सुरू असता तथागताने म्हणजे बुद्धाने विचारले,

"कुणी ब्रम्ह प्रत्यक्ष पाहिले आहे का?"

"नाही, निश्चितच पाहिले नाही" वासेठ्ठा उत्तरला

"पूर्वीच्या सात पिढ्यांत तरी कुणी पाहिले आहे का?"

"नाही"

"प्रत्यक्ष कुणी पाहिले नाही! मग अशी दुसरी कोणती गोष्ट अनुभवली आहे काय की जिच्यामुळे ब्रम्हाबद्दल अनुमान बांधता येते?"

"नाही"

"तर मग कधीही न पाहिलेल्या स्त्रीवर प्रेम करण्यासारखेच हे नव्हे का?"

"होय, तसेच आहे"

यावरून असे स्पष्ट होते की, ईश्वरी संदेश किंवा ईश्वरी साक्षात्कार असली भाषा गौतम बुद्ध बोलत नव्हता गौतम बुद्ध प्रत्यक्ष अनुभव आणि प्रत्यक्षाची अन्य अनुभवातून निश्चिती करणारे अनुमान यांचाच आश्रय करीत होता म्हणजेच बुद्धाने कोणतेही शब्दप्रामाण्य मानले नाही अमुक एका ईश्वरी ग्रंथात किंवा पवित्र ग्रंथात सांगितले म्हणून प्रमाण मानणे म्हणजे शब्दप्रामाण्य ! पण आपले मत मांडण्यासाठी बुद्धाने ईश्वराचा आधार कधीच घेतला नाही

**३) यावरून बुद्धाने आम्हाला शिकविले की, जे प्रत्यक्ष अनुभवाला येते किंवा अन्य अनुभवातुन ज्या प्रत्यक्षाबद्दल अनुमान करता येते तेच स्वीकारले पाहिजे ! बुद्धाने आम्हाला अनुभवनिष्ठा शिकविली !**

: १९ :

# नास्तिक नसलेला मज्जिपद धम्म

या सृष्टीचा कर्ता आणि करविता ईश्वर आहे काय? या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे देता येते अगदी उलट उत्तर 'नाही' असेही देता येते 'माहीत नाही' असाही पवित्रा घेता येतो सर्वांत सोपे उत्तर 'होय' हेच आहे सर्वसामान्य माणसाला ते झटकन पटते संकट प्रसंगी त्याला आधार मिळतो. अशी कल्पना करा की, दहशतवाद्यांनी विमान पळविले आहे बॉम्बस्फोट करून विमान उडवून देण्याच्या धमक्या दहशतवादी देत आहेत मृत्यूच्या जबड्यात प्रवाशांची मान सापडली आहे प्रवासी जीव मुठीत धरून या स्थितीत अनेक तास आहेत या महाभयंकर ताणात त्यांना आधार कोणता? ईश्वराची प्रार्थना हाच ना? म्हणजे संकटात माणूस निराधार असतो तेव्हा ईश्वरच माणसाला धीर देतो — मग तो असो किंवा नसो! माणसाचा स्वभावही असा आहे की, संकटातच त्याला ईश्वर आठवतो हा भाग अलाहिदा! त्याचा अपुरेपणा ईश्वरामुळे भरून निघतो आणि म्हणून माणसाला 'ईश्वर आहे' असे झटकन पटते दुसरे कारणही महत्त्वाचे आहे माणूस दररोज पहात असतो की, प्रत्येक गोष्टीला कर्ता आहे मूर्ती घडविणारा मूर्तिकार दिसतो शिल्प उभारणारा शिल्पकार असतो जन्म देणारे आईबाप असतात यामुळे त्याला लगेच पटते की, सृष्टी घडविणारा सृष्टीकर्ता असलाच पाहिजे तोच ईश्वर! मानवी कमतरता आणि अपुरेपणा तसेच दैनंदिन अनुभव 'ईश्वरा'ला तत्काळ दाद देतात म्हणूनच ईश्वरवाद्यांसमोर निरीश्वरवादी विचारवंत शर्यतीच्या प्रारंभीच निम्मी शर्यत हरलेली असतात! जगाचा इतिहास पाहिला तर 'ईश्वर आहे' असे सांगणाऱ्या धर्मांनी 'ईश्वर नाही'

असे सांगणाऱ्याचा नेहमीच पराभव केला आहे जगात आज सर्वात अधिक प्रसार ख्रिस्ती धर्माचा आहे त्याचा संस्थापक येशू ख्रिस्त याने स्वतःला साक्षात 'ईश्वराचा पुत्र' असे म्हटले आहे या धर्माचे सुमारे शभर कोटी अनुयायी आहेत त्या खालोखाल इस्लामचा प्रसार झाला असून साठ कोटी लोक मुस्लीम आहेत इस्लामचा धर्म संस्थापक महमद पैगंबर (इ स ५७० ते ६३२) याने असा दावा केला की, अल्ला एकच आहे आणि मी त्याचा अखेरचा प्रेषित आहे म्हणजे जगामध्ये सर्वात अधिक प्रसार ईश्वरवादी धर्मांचा झाला "ईश्वर,ईश्वराचा दूत किंवा पुत्र आणि त्या दुताने सांगितलेले अंतिम सत्य" या त्रिसूत्रावर आधारलेल्या धर्मापुढे निरीश्वरवादी धर्मांचा किंवा पंथांचा टिकाव लागला नाही

जागतिक प्रसारात बुद्ध धम्माचा क्रमांक तिसरा आहे महायान पंथाचे २२ कोटी तर हीनयान पंथाचे ८ कोटी असे एकूण तीस कोटी लोक बुद्ध धम्मात आहेत गौतम बुद्ध (इसवी सनापूर्वी ५६३ ते ४८३) ईश्वराचे नाव घेत नाही स्वतःला ईश्वराचा दूत म्हणवित नाही तरीही बुद्ध धम्माचा प्रसार तिसऱ्या क्रमांकावर जगात का झाला? त्याचा आता आपण विचार करू या

## बुद्धाचा मज्जिपद धम्म

बुद्ध धम्माचा जागतिक प्रसार झाला याचे एक कारण असे की, गौतम बुद्धाने 'मध्यम मार्ग' (मज्जिपद धम्म) स्वीकारला चार्वाक पंथियांनी 'ईश्वर नाही' आणि 'आत्मा नाही' असे सतत सांगितले हिंदू धर्मीय 'ईश्वर आहे' आणि 'अविनाशी आत्मा आहे' असे म्हणत होते गौतम बुद्धाने मध्यम मार्ग स्वीकारून असे मांडले की, "ईश्वर आहे काय? किंवा ईश्वर नाही काय? आत्मा आहे का? शरिरापेक्षा तो भिन्न आहे का? याचा काथ्याकूट करणे म्हणजे वेळ फुकट घालविणे!! मी असा मधला सन्मार्ग दाखवित आहे की, तुम्हाला तो लाभदायकच आहे—ईश्वर असला तरी लाभदायक आहे आणि ईश्वर नसला तरी लाभदायक आहे!"

बुद्ध धम्म हा नास्तिक धर्म नव्हे, कारण पाली सूत्रांत नास्तिकाची वारंवार निंदा आहे त्या काळातील महान नास्तिक विचारवंत अजित केशकंबल याचा गौतम बुद्धाशी वादविवाद झाला होता पाली सूत्रांत ज्या पाच नास्तिक विचारवंताचा उल्लेख आहे त्यापैकी अजित केशकंबल हा सर्वात अधिक तर्कशुद्ध व सखोल आहे ए के वॉर्डर असे मानतात की, "चार्वाक पंथ या नावाने जो नास्तिक पंथ गौतम बुद्धापूर्वीच प्रचलित होता त्या पंथातील मताची मांडणी सर्वांत उत्तम प्रकारे अजित केशकंबल याने केली!"

भारतीय संस्कृतिकोशात पुढीलप्रमाणे नोंद आहे "अजित केशकंबल हा बुद्धाच्या काळातील एक विख्यात पथप्रवर्तक होता तो माणसाच्या केसाची घोंगडी बनवून वापरीत असे आणि म्हणून त्याला केशकंबल म्हणत असे दिसते बुद्धाचा उदय झाला त्यावेळी हा एक सुप्रसिद्ध आचार्य म्हणून गाजत होता हा सारखा फिरत असे नास्तिक चार्वाक मतांची (लोकायत मतांची) सुव्यवस्थित मांडणी करून त्यानेच चार्वाक मतांचा संघटित पंथ निर्माण केला असे काही विद्वानांचे मत आहे तो सूक्ष्म व तर्कशुद्ध विचार करणारा होता याचा आणि बुद्धाचा राजगृह येथील वर्षावासात वाद झाला होता बौद्ध वाङ्मयात त्याची सर्वत्र निंदाच आढळते अजित केशकंबल हा पूर्ण भौतिकवादी होता आत्मा, पुनर्जन्म, पापपुण्य, कर्मसिद्धांत, यज्ञ, दान, हवन या सर्वांना तो झूट ठरवीत असे" यावरून असे स्पष्ट होते की, गौतम बुद्ध नास्तिक नव्हता आणि आस्तिकही नव्हता बुद्ध आणि पोठ्ठपद यांचा जो संवाद डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी खास सादर केला आहे तो आता पाहू या

## बुद्ध-पोठ्ठपद संवाद

**पोठ्ठपद**—विश्व शाश्वत आहे का ?

**बुद्ध**—तथागताने (बुद्धाने) त्यावर मत प्रदर्शित केले नाही

**पोठ्ठपद**—विश्व अनादि अनंत आहे का ?

**बुद्ध**—नो कॉमेन्टस प्लीज (गौतम बुद्धाने पुन पहिलेच उत्तर दिले आणि त्या उत्तराचे हे आधुनिक स्वरूप सांगितले !)

**पोठ्ठपद**—आत्मा व शरीर एकच आहे ?

**बुद्ध**—तथागताने त्यावर मौन धारण केले आहे

**पोठ्ठपद**—मृत्यूनंतर काय होते ?

**बुद्ध**—तथागताला काही म्हणावयाचे नाही !

**पोठ्ठपद**—पण तथागत मत का व्यक्त करीत नाहीत ?

**बुद्ध**—कारण या प्रश्नांपासून काही लाभ नाही त्याचा धम्माशी काही संबंध नाही सम्यक् आचारतत्त्वाशी संबंध नाही कामवासनेतून मुक्ततेशी संबंध नाही पोठ्ठपद, मी चार आर्य सत्ये सांगितली आहेत—(१) दुःख आहे (२) दुःखाचे कारण तृष्णा आहे (३) मी दुःख दूर करण्याचा मार्ग दाखविला आहे (४) तो मार्ग म्हणजे सदाचरणी अष्टांग मार्ग होय

**पोठ्ठपद**—पण तथागताने त्याबद्दलच का सांगितले ?

**बुद्ध**—कारण हा मार्ग लाभदायक आहे म्हणून सांगितले त्याचा धम्माशी संबंध आहे तो सन्मार्गाकडे नेतो वैराग्याकडे, शुचितेकडे, कामवासनेपासून मुक्ततेकडे, शांततेकडे, अंतःकरणाच्या समतोलाकडे, प्रज्ञेकडे,

साक्षात्काराकडे, निर्वाणाकडे नेतो म्हणून पोठठपद, मी तो मार्ग सांगतो त्यापासून नुकसान काहीच नाही !

## राजा अजातशत्रुची शंका

एकदा मोठा मजेदार संवाद झाला विख्यात बौद्ध तत्त्वज्ञानी धर्मानंद कोसंबी यांच्या 'बुद्धलीलासारसंग्रह' या ग्रंथात २८९ व्या पृष्ठावर राजा अजातशत्रु व बुद्ध यांचा संवाद दिला आहे अजातशत्रु बुद्धाला म्हणाला, "तुम्ही याप्रमाणे सद्‌वर्तन करता याचे फळ काय ? योद्धे, न्हावी, स्वयंपाकी, माळी, धोबी, कुंभार, कारकून यांना आपल्या श्रमाचे फळ मिळते तुमच्या श्रामण्याचे फळ काय ? "

बुद्ध उत्तरला, "तुझा एकदा दास माझ्या धम्माचा भिख्खू झाला व सद्‌वर्तन करू लागला तर तू त्याला पकडून नेऊन पुन दास करशील काय ?"

राजा अजातशत्रू–"नाही ! उलट तो मजकडे आल्यास माझ्यासमोरच मी त्याला आसन देईन अन्न-वस्त्र देईन "

बुद्ध–"म्हणजे त्याला सद्‌वर्तनाचे फळ मिळाले ना ?"

यावरून असे स्पष्ट होते की, आपल्या सद्‌वर्तनी मार्गाने स्वर्गलाभ होईल असे गौतम बुद्धाने कधीही सांगितले नाही त्यांचा युक्तिवाद होता की, सद्‌वर्तनाच्या अष्टांग मार्गामुळे कुणाशीही वैर होणार नाही, प्रत्यक्ष जीवनातच लोक सन्मान करतील आणि तृष्णा म्हणजे षड्‌रिपु काबूत राहून इहलोकात चांगले होईल ! मनस्तापाऐवजी मन शांती लाभेल ! शिवाय नुकसान नक्कीच होणार नाही ! जर स्वर्ग असेल तर त्यात सद्‌वर्तनी माणूसच जाणार ना ? जर ईश्वर असेलच तर त्याला सद्‌वर्तनी माणूसच आवडेल ना ?

**म्हणून बुद्धाने शिकविले आहे की, ( ४ ) आपल्या विवेक-बुद्धीला स्मरून चांगला आचार करा. सद्‌वर्तन करा. कारण त्यामुळे इहलोकी सुखशांती लाभेल. जर ईश्वर असला तर मृत्यूनंतरही सद्‌वर्तनामुळे तुमचे भले होईल ! जरी ईश्वर नसला तरी इहलोकी हाच मार्ग कल्याणकारी आहे ! तसेच त्यात नुकसान काहीच नाही !**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र.
मुंबई शाखा (स्थळ ...)

: २० :

# बुद्धाचा विधायक उपदेश

## उच्छेदवादाचा अखेर उच्छेद होतो

चार्वाक पंथ म्हणजे नास्तिक पंथ। या पंथातील मतांची तर्कशुद्ध मांडणी अजित केशकंबलने केली तो इसवी सनापूर्वी सहाव्या शतकात होऊन गेला आणि बुद्धाचा समकालीन होता वैदिक धर्मापूर्वीच चार्वाक मते मांडली जात होती आणि तसे होणे स्वाभाविकही आहे कारण एकमेव ईश्वराची कल्पना ही विकासाच्या क्रमात मागाहूनच येणार। चार्वाक मतांचे आचार्य उत्तम युक्तिवाद करणारे होते खुद्द कौटिल्याने सांख्य व योग याबरोबरच चार्वाक पंथाचा 'अन्विक्षकी विद्या' म्हणजेच तर्कशास्त्रावर आधारलेली विद्या असा उल्लेख केला आहे (कौटिलीय अर्थशास्त्र १-१) चार्वाक पंथाचे हे वैशिष्ठ्यही स्वाभाविक आहे कारण ईश्वर मानत नाहीत ते स्वतःला ईश्वराचे दूत म्हणवून घेऊ शकत नाहीत ईश्वराच्या नावाने बोलू शकत नाहीत अर्थातच त्यांचा भर तर्कशास्त्रावर म्हणजेच युक्तिवादावर असतो

तथापि, चार्वाक पंथीयांचा एकही मूळ ग्रंथ आज उपलब्ध नाही हे अत्यंत विलक्षण आहे चार्वाक पंथाला लोकायत किंवा आसुरी विद्या, देहात्मवादी आदि अनेक नावे आहेत पण ही सर्व नावे देताना या पंथाला 'नावे ठेवण्याचाच' उद्देश उघड आहे। मैत्रायणी उपनिषदात तर चार्वाक मताची निंदा एका विलक्षण कथेद्वारा केली आहे बृहस्पतीकडे देवांचा प्रमुख इंद्र आणि दैत्यांचा प्रमुख विरोचन गेले. तेव्हा देवांचे रक्षण करावे म्हणून बृहस्पतीने दैत्यांना देहात्मवादाचा चार्वाकपंथ दाखविला आणि दैत्यांचे सामर्थ्य या चार्वाक मार्गामुळे कमी होऊन त्यांचा पराभव झाला अशी ही कथा आहे।

म्हणजे चार्वाक-वादाची त्याच्या प्रारभापासूनच बदनामी साधली आहे बृहस्पतीने सांगितलेली विद्या म्हणून चार्वाक मताला 'बार्हस्पत्य' असेही म्हणतात

चार्वाक पथाच्या मताची आज आपल्याला माहिती होते ती त्यावरील टीकेमुळे। टीका करताना मूळ मते मांडावी लागतात आणि त्याद्वारे ही मते समजतात पण टीकाकार मूळ मते माडताना प्रामाणिक असतोच असे मानता येत नाही किंबहुना चवताळलेले टीकाकार प्रतिपक्षाची मते विकृत स्वरूपातच मांडतात हा अनुभव आहे। चार्वाकांनी तीन वेदांच्या कर्त्यांना "धूर्त, लबाड व भोंदू" असे म्हटले होते—

त्रयो वेदस्य कर्तार। भण्ड धूर्त निशाचराः।

अर्थातच टीकाकार चवताळलेले असणारच मैत्रायणी उपनिषद, छांदोग्य उपनिषद, विष्णुपुराण, महाभारत, भगवद्गीता, शंकराचार्यांचे ब्रम्हसूत्रभाष्य ग्रंथपासून विख्यात वेदांती माधवाचार्य (सायणाचार्यांचा मुलगा, मृत्यू १३८७) याचा 'सर्वदर्शन सग्रह' व चौदाव्या शतकातील जैन पडित गुणरत्न यांचा 'षट्दर्शन समुच्चय' या ग्रथांत चार्वाक पथाची कमीअधिक हेटाळणीच आहे बौद्ध साहित्यात लोकायत मतांची म्हणजे चार्वाक मताची क्वचित प्रशंसा आहे, पण इतरत्र या मताचे खंडन केले आहे

## निरीश्वरवादी सांख्यांचा गौरव

चार्वाकांनी ईश्वर नाकारला तसाच साख्य तत्त्वज्ञान मांडणाऱ्या कपिल मुनींनी नाकारला पण साख्यांना प्रचड प्रतिष्ठा मिळाली श्रीकृष्णाने सागितलेल्या भगवद्गीतेत दहाव्या अध्यायाचा सव्वीसावा श्लोक पहा। त्यात श्रीकृष्णाने म्हटले आहे की, सांख्य तत्त्वज्ञान माडणारा कपिल मुनी मीच आहे

अश्वत्थ. सर्व वृक्षाणां देवर्षीणां च नारद

गधर्वाणा चित्ररथ' सिद्धानां कपिलो मुनीः।

गौतम बुद्धाने ईश्वराचे नावही आपल्या धम्मात घेतले नाही ईश्वर आणि आत्मा याची चर्चा म्हणजे कालाचा अपव्यय आहे असे बुद्ध सागत होता 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रथात डॉ आबेडकर म्हणतात—"सुरुवातीलाच भगवान बुद्धांनी आपल्या पहिल्या शिष्यांना सांगितले की, आपला जो धम्म आहे त्याला ईश्वर आणि आत्मा यांच्याशी कर्तव्य नाही त्याच्या धम्माचा कर्मकांडाशी काही सबध नाही" (पृष्ठ १००) तथापि गौतम बुद्धाला विष्णूचा अवतार मानले गेले मग चार्वाकाचीच सर्वांनी निंदा का केली ?

## चार्वाक मतांची मांडणी

त्याचे उत्तर समजण्यासाठी चार्वाकांचे म्हणणे काय होते ते पाहू या सातव्या शतकातील जयराशिभट्ट (तत्त्वोपप्लवसिंह नामक ग्रथाचा कर्ता)

दक्षिणारंजनशास्त्री (ए शॉर्ट हिस्ट्री ऑफ मटेरिॲलिझम अँड हिडॉनिझम) तसेच अलिकडे प्रा सदाशिव आठवले (चार्वाक इतिहास व तत्त्वज्ञान) यानी चार्वाक मताची जास्तीत जास्त अनुकूल माडणी केली आहे चार्वाकांचे असे म्हणणे होते की जे पचेंद्रियांनी जाणता येते असे प्रत्यक्षच फक्त मानता येते तसेच अनुमान स्वीकारता येते पण त्यालाही प्रत्यक्ष पुराव्याचा आधार हवाच

प्रत्यक्षम् एव प्रमाणम् । प्रत्यक्षनिष्ठम् एव अनुमानम् ।

या दोन तत्त्वांनुसार ते ईश्वर, परलोक, पापपुण्य, आत्मा आदि सर्व कल्पना फेटाळून लावत ते म्हणत असत की, परलोकातून आलेला कुणी कधी भेटत नाही तेव्हा परलोक अमान्य आहे

परलोकित· अभावात् । परलोक अभाव· ।

तीन वेद म्हणजे ईश्वरी वाणी नसून निव्वळ लबाडी आहे असा घणाघाती हल्ला करून ते यज्ञाची हेटाळणी करीत यज्ञात जो पशु बळी दिला जातो तो स्वर्गाला जातो या कर्मकाडातील दाव्याची कुचेष्टा करताना ते विचारीत की, असे असेल तर पशुऐवजी स्वत·च्या बापालाच स्वर्गप्राप्तीसाठी यज्ञात का बळी देत नाही ? आत्मा नाकारून ते म्हणत की, देह हाच आत्मा आहे ! म्हणून त्यांना देहात्मवादीही म्हणत ! जर पुनर्जन्म आत्म्याचा असेल तर मागील जन्माचे काहीच का स्मरण नाही ? असा त्यांचा सवाल होता म्हणून देह जाळला की काहीच शिल्लक उरत नाही असे ते बजावत असत—

भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमन कुत ।

ईश्वरापासून सुरुवात करून चार्वाक पथीय सर्वच मानसिक श्रद्धांचा उच्छेद करीत असत त्यामुळे त्याच्यावर 'उच्छेदवादी' म्हणून ठपका ठेवण्यात येत होता या मताचा प्रभाव पडत असलाच पाहिजे एरवी या पथावर महत्त्वाच्या ग्रथात टीका झाली नसती अखेर चार्वाक मताचा पराभवच नव्हे तर उच्छेदवादाचाच उच्छेद झाला ! माझ्या मते याचे स्पष्ट कारण असे की, चार्वाकांना श्रद्धांचा उच्छेद करता येत होता, पण त्या जागी त्यानी नवीन श्रद्धा निर्माण केली नाही लोकांना नवीन उद्दिष्ट दिले नाही किंवा नवीन आदर्शाने भारले नाही कोणत्याही विचारावर गनिमी काव्याने हल्ला करणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांची तीन हत्यारे असतात—(१) उपेक्षा–कशलाही उल्लेखच टाळायचा आम्ही वाचले नाही आणि वाचण्यालायक नाही असे म्हणावयाचे (२) उपेक्षा अशक्य झाल्यास बदनामी करावयाची विचार विकृत बनवून लोकासमोर माडावयाचे व हल्ला चढवायचा (३) त्यानेही भागले नाही तर प्रत्यक्ष हिंसा करावयाची चार्वाकांविरुद्ध मुख्यत बदनामीचे तत्र वापरले गेले भस्म झालेल्या देहाचे पुन आगमन कसे होणार ? या त्याच्या सवालामागे

आणखी एक ओळ चिकटवून चार्वाक मताची विपर्यासाने वाट लावण्यात आली घुसडलेल्या एका ओळीने चार्वाक मतांची किती बदनामी झाली पहा--

यावत् जीवेत् सुखं जीवेत् । ऋण कृत्वा घृत पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमन कुत ।।

म्हणजे जिवत आहात तोवर मजा मारा कर्ज काढूनही तूप प्या (म्हणजे चैन करा), कारण देह जाळला की सपला. ऋण करून तूप प्राशन करा ही ओळ घुसडून, हा विचार म्हणजे दुराचारी लोकाचा, असुराचा म्हणजे दैत्याचा विचार ठरविला गेला ! चार्वाकानाही नवीन कशावरच श्रद्धा किंवा विश्वास निर्माण करता आला नाही आणि त्यामुळेच त्यांची अशी बदनामी सुलभ होऊन, त्याचा उच्छेद शक्य झाला

## बुद्धाचा विधायक मार्ग

याउलट गौतम बुद्धाने ईश्वराची व परलोकाची चर्चा बद करतानाच सद्वर्तनाचा नवा अष्टांग मार्ग सांगितला वैदिक धर्मातील अविनाशी आत्म्याचा पुनर्जन्म नाकारतानाच बुद्धाने पुनर्जन्माची नव्या स्वरुपात मांडणी केली स्वर्ग नाकारतानाच जीवनमरणाचा फेरा सपविणाऱ्या निब्बाणाचे ध्येय लोकासमोर ठेवले त्याच वेळी बौद्ध सघ स्थापन करून बौद्ध विचाराचा यथायोग्य प्रसार होईल अशी व्यवस्था केली यज्ञातील पशुहत्येचा आणि सपत्तीनाशाचा कडक निषेध करतानाच, सर्वच यज्ञाचा निषेध करीत नाही असे सांगितले ! तसेच भिन्न मत माडणाऱ्या तपस्व्याना चार्वाकांप्रमाणे 'धूर्त, लबाड' असे न म्हणता सर्वच तपस्व्याचा आदर करण्याचा सिंह सेनापतीला उपदेश केला चार्वाक पथातील विधायक विचारांचा अभाव गौतम बुद्ध पहात होता एक श्रद्धा गाडताना दुसरी श्रद्धा निर्माण करण्याविषयी गौतम बुद्ध दक्ष राहिला त्याच्या पुराव्यादाखल बुद्ध धम्माचे श्रेष्ठ पडित धर्मानद कोसबी याच्या ग्रथातील बुद्धाची हकीगत पहा--(बुद्धलीलासारसग्रह-पृष्ठ २७०)

बुद्ध भगवन् श्रावस्तीमध्ये रहात असता वत्सगोत्र नांवाचा परिव्राजक त्याच्याजवळ आला आणि म्हणाला, "भो गौतम, आत्मा आहे काय ?"

बुद्धाने उत्तर दिले नाही

वत्सगोत्र म्हणाला, "भो गौतम, आत्मा नाही काय ?"

बुद्ध काहीच बोलला नाही व वत्सगोत्र उठून चालता झाला

तेव्हा आनद बुद्धाला म्हणाला, "भगवताने वत्सगोत्राच्या प्रश्नाचे उत्तर का दिले नाही ?"

बुद्ध म्हणाला, "आनंदा, मी जर आत्मा आहे काय? या प्रश्नाला आत्मा आहे असे उत्तर दिले असते, तर आत्मा नित्य आहे असे सांगणाऱ्यांपेक्षा माझे मत भिन्न आहे हे स्पष्ट झाले नसते, आत्मा नाही असे उत्तर दिले असते, तर जे देहात्मवादी आहेत, त्यांच्या मताहून माझे मत भिन्न आहे हे स्पष्ट झाले नसते, रुपादि पंचस्कंध आत्मा नाही, सगळे धर्म अनात्म आहेत, असे मी सांगितले असते, तर ते माझ्या मताला अनुरूप झाले असते, परंतु त्यामुळे वत्सगोत्र घोटाळ्यामध्ये पडला असता! त्याला असे वाटले असते की, पूर्वी माझ्या शरीरात आत्मा म्हणून काही पदार्थ होता तो या बुद्धाच्या सांगण्यामुळे नाहीसा झाला!"

यावरून, आपल्या मतांचा विकृत अर्थ लावता येऊ नये किंवा चुकीचा अर्थ पसरू नये, आणि एक विश्वास मोडतानाच दुसरा विश्वास उत्पन्न केला पाहिजे याबाबत बुद्ध जागरूक राहीला बुद्धाने भिन्न मत धारण करणाऱ्यांची चार्वाकांप्रमाणे निंदानालस्ती केली नाही त्यांच्या देवाची कुचेष्टा केली नाही बुद्ध स्वतःचा धम्म सांगत राहिला विरोधी मत युक्तिवादाने खोडत राहिला, पण विरोधी मत मांडणाऱ्याची हेटाळणी त्याने केली नाही युक्तिवादाने त्यांनाही जिंकण्याचाच त्याचा प्रयत्न होता

**म्हणून बुद्धाने शिकविले की, (५) एक श्रद्धा अथवा विश्वास मोडताना दुसरी श्रद्धा अथवा विश्वास निर्माण केला पाहिजे! तसेच हितसंबंधी लोकांना एकादा विचार विकृत स्वरुपात मांडून बदनाम करता येऊ नये याबद्दल सतत सावध राहिले पाहिजे! आणि इतरांच्या श्रद्धेची नालस्ती करण्याऐवजी स्वतःचा मार्ग समजावित राहिले पाहिजे!**

: २१ :

# तृष्णा हेच मूळ आहे

जन्माला येणारी सर्व अर्भके समानच असतात त्यात जन्मत कुणी उच्च नसतो कुणी नीच नसतो जन्माला येताच अर्भकाला उच्च किंवा नीच ठरविणारी फसवणूक म्हणजे जाती ! जन्मजात जातीयतेला कोणताही शास्त्रीय आधार नाही म्हणूनच ईश्वरापासूनच चार वर्ण निर्माण झाले असे उपनिषदकारांनी वर्णन करून टाकले आणि तर्कवादी चर्चेला वावच ठेवला नाही ईश्वराच्या नांवाने मारलेली ती जगातील सर्वांत मोठी थाप होती ! चार वर्णांतूनच कालांतराने जन्मजात जातीयता आली

जन्मजात जातीयतेला फक्त स्वार्थाचा आधार आहे स्वार्थ कोणता ? तर ज्यांना समाजात शारिरिक, आर्थिक किंवा बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर उच्च स्थान प्राप्त होते त्यांना तेच स्थान आपल्या मुलाबाळांनाही लाभावे असे वाटते हा मोह आहे या मोहातूनच वंशपरंपरा राजेशाही निर्माण झाली राजेपद राजाच्या वंशातच रहात असे, मग राजपुत्र कर्तबगार असो किंवा नसो त्याचप्रमाणे आपल्याला लाभलेले उच्च स्थान आपल्या पुत्रपौत्रानाच मिळत रहावे असे वाटून, उच्च दर्जा लाभलेल्यानी प्रथम चार वर्ण आणि नंतर शेकडो जातींची उतरंड निर्माण केली गौतम बुद्ध ज्याला तृष्णा म्हणतात त्या तृष्णेमुळे — म्हणजेच मोह–लोभ–मद आदि षड्रिपूमुळे असंख्य जाती निर्माण झाल्या म्हणून जातीयतेचे मूळ कोणते ? तर मोह म्हणजे स्वार्थ हे मूळ आहे.

## प्रथम वर्ग आणि नंतर जात

प्राणीसृष्टीची अब्जावधी वर्षांत उत्क्रांती होत गेली त्यातून माकड निर्माण झाले माकडाची उत्क्रांती लक्षावधी वर्षांत होत जाऊन मानवसदृश

प्राणी निर्माण झाला त्याच्या प्रदीर्घ उत्क्रांतीतून आजचा मानव निर्माण झाला उत्खनन शास्त्रज्ञ लकीज आणि डोनाल्ड जोहानसन म्हणतात की, मानवसदृश प्राणी भूतलावर २५ लाख ते ३० लाख वर्षांपूर्वी निर्माण झाला असावा त्यापूर्वी म्हणजे एक कोटी वर्षांपूर्वीचा रामापिथीकस हाही प्राणी काहीसा मानवसदृश प्राणीच होता प्राणी आपला निर्वाह कसा करतात ? मोठा मासा लहान माशाना खातो या न्यायाने इतर कमजोर प्राण्याना खाऊन किंवा झाडावरील फळे खाऊन निर्वाह करतात मानव प्राणी प्रथम हेच करीत होता जे उपलब्ध आहे ते खायचे। अन्न गोळा करून खाण्याची ही अवस्था होती अन्न शोधून आणणे आणि स्वतःचा बचाव करणे या बारमाही दगदगीत तो व्यग्र असे मग त्याला पशुपालनाची युक्ती सापडली ही दुसरी अवस्था आहे या दोनही अवस्थात मानवाच्या भटक्या टोळ्याच होत्या स्वतःसाठी अन्न आणि पशूसाठी कुरण या शोधात त्याला भटकणे भागच होते यानंतर त्याला शेतीची युक्ती सापडली ही तिसरी अवस्था आहे शेतीमुळे तो स्थिर होऊ लागला एका जागी राहू लागला प्रथम सर्वजण सामुदायिक शेतीच करीत त्यातून गरजेपेक्षा अधिक उत्पन्न होऊ लागले त्यातून वर्ग निर्माण झाले ज्याना जिंकले त्याना शेतीवर कामाला लावावे आणि त्यांना पोटापुरते देऊन त्यांच्या श्रमाचे जादा उत्पादन काढून घ्यावे असा प्रकार सुरू झाला जे राबत नव्हते त्या जेत्यांचा उच्च वर्ग आणि राबणाऱ्यांचा, कष्टकऱ्याचा कनिष्ठ वर्ग असे वर्ग निर्माण झाले

## वर्गांना जातींचे कवच

हे वर्ग वंशपरंपरा चालावेत म्हणून वर्ण निर्माण करण्यात आले आणि वर्णातून जाती उदयास आल्या म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या 'कास्टस् इन इंडिया' या प्रबंधात म्हणतात—"समाजात निश्चित असे वर्ग निर्माण झाले होते ही वस्तुस्थितीच आहे कारणे वेगवेगळी असतील—आर्थिक किंवा बौद्धिक किंवा सामाजिक असतील पण समाजातील व्यक्ती ही कोणत्या तरी एका वर्गातील असतेच असते ही विश्वव्यापी वस्तुस्थिती आहे आणि हिंदू समाज हा अपवाद नव्हता यातून आपल्याला जातीचे मूळ सापडते प्रथम वर्ग होते आणि या वर्गांना अबाधित राखण्याकरिता जात निर्माण झाली यावरून जात म्हणजे बंदिस्त केलेला वर्गच होय !" अर्थात उच्च वर्गीयानी वर्ण-जाती कशासाठी निर्माण केल्या ? डॉ आंबेडकर आपल्या प्रबंधात म्हणतात की, "याचा विचार अन्य वेळी करू या" पण उत्तर सरळ आणि अटळ आहे उच्च स्थान वंशपरंपरा रहावे या मोहासाठी उच्चवर्गीयानी वर्ण आणि जाती निर्माण केल्या

म्हणून माझा असा निष्कर्ष आहे की, कार्ल मार्क्सने जातीयतेचे जे मूळ आहे ती वर्गांची निर्मिती जगासमोर अत्यंत शास्त्रशुद्ध अशी मांडली. उत्पादन गरजेपेक्षा अतिरिक्त होऊ लागले तेव्हा उत्पादन साधनांची मालकी मिळविलेला वर्ग आणि त्यावर राबणाऱ्यांचा वर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले. या दोन वर्गांचा संघर्ष म्हणजेच प्रदीर्घ काळातील मानवी इतिहासाची गुरुकिल्ली असे मार्क्सने सांगितले गौतम बुद्धाने वर्गांचे, संघर्षाचे आणि दुःखाचेही मूळ असलेली तृष्णा जगासमोर प्रकर्षाने मांडली दोघांच्याही विचाराचा पाया प्रत्यक्ष व अनुमान हाच आहे ईश्वराचा–आत्म्याचा आपल्या धम्माशी अथवा मार्गाशी संबंध नाही असे उभयतांनी आवर्जून स्पष्ट केले आहे तथापि, मार्क्सच्या संपूर्ण शास्त्रशुद्ध समाजवादात तृष्णेचा किंवा षड्रिपूंचा विचार नाही! त्यामुळे मार्क्सचे गणित समाजवादाच्या टप्प्यांवर चुकत जाते आणि त्याला अभिप्रेत असलेला आदर्श असा मुक्त मानवसमाज आणि राज्यशासनही विलयास गेलेला मानवी समाज निर्माण होत नाही! कारण शोषण संपले तरी तृष्णा कायम रहाते शोषण संपले असतानाही समाजवादी देशांत कामचुकारपणा किंवा फसवणूक का शिल्लक उरते याचे अनेकांना आश्चर्य वाटते. 'तृष्णेमुळे' हेच त्याचे उत्तर आहे

गौतम बुद्धाने सांगितले की, तृष्णेमुळेच मानवाचा जन्म होतो आणि तृष्णेमुळेच जन्ममरणाचा फेरा सुरू असतो अर्थातच तृष्णा उर्फ षड्रिपु हे जन्मजात आहेत आणि तेच जन्माचे कारण आहेत तृष्णेचा उगम भोवतालच्या परिस्थितीतून होत नसून भोवतालच्या परिस्थितीला जन्मजात तृष्णेनुसार वळण मिळते

याचा चांगला उलगडा होण्यासाठी एक दृष्टांत म्हणजे उदाहरण घेऊ या उत्पादन साधनाची मालकी असलेला एक धनिक होता तो कम्युनिस्टांकडे गेला आणि म्हणाला,

"कॉमरेड, माझ्याकडे अफाट संपत्ती आहे पण मला मात्र फोम रबरच्या गाद्यावर शीतागार प्रासादात झोप येत नाही मी तळमळत असतो!"

कॉमरेड म्हणाला, "तू तुझे धन कष्टकऱ्यांना लुबाडून जमा केले आहेस. ते त्यांचे त्यांना परत दे म्हणजे तू सुखी होशील"

त्या धनिकाने तसे केले यामुळे कष्टकरी प्रथम आनंदित झाले आणि नंतर आपापसात भांडू लागले! त्यांच्या नेत्याने जास्तीत जास्त वाटा उचलला आणि नेत्याशीही भांडण झाले तो धनिकही तळमळतच राहिला. पुन्हा कॉमरेडकडे आला व म्हणाला,

"मी अजून तळमळत आहे!"

"आता तू कशासाठी तळमळतोस"?"

"धन पुन: मिळवावे यासाठी तळमळतो आहे!" सारांश, त्या धनिकाने व कॉमरेडने लक्षात घेतले नाही की, तृष्णा कायम राहिली होती आणि यामुळे तळमळ रहाणारच होती! वर्गसंघर्षाच्या परिणामी तृष्णा निर्माण झाली नाही तर तृष्णेमुळे वर्ग निर्माण होऊन संघर्ष सुरू झाला हे नीट लक्षात घ्या असे मला आवर्जून सांगायचे आहे वर्ग आणि वर्गसंघर्ष हे तृष्णेचेच एक स्वरूप आहे वर्ग विलय पावले म्हणजे तृष्णा विलय पावत नाही आणि अंतरंगातील संघर्षही संपत नाही मार्क्सचे स्वप्न अपुरे रहाते याचे कारण त्याच्या विचारधारेत 'omission' चा म्हणजेच मूळ तृष्णेचे परिणाम वगळण्याचा दोष आहे. षड्रिपुवर अर्थात बुद्धाच्या शब्दावलीनुसार तृष्णेवर मानवाने स्वत:च स्वत:च्या प्रयत्नांनी संपूर्ण नियंत्रण मिळविले पाहिजे त्याशिवाय मार्क्सला संपूर्णत्व येऊ शकत नाही

**म्हणून, बुद्धाने शिकविले की, (६) तृष्णा हे जन्माचे व दुःखाचे मूळ कारण असून त्यावरच घाव घातला पाहिजे आणि ज्याचा त्यानेच असा प्रहार केला पाहिजे! बुद्ध फक्त मार्ग दाखवितो!**

: २२ :

# गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स

बुद्ध धम्माचा संस्थापक गौतम बुद्ध इसवी सनापूर्वी सहाव्या शतकात ५६३ या वर्षी जन्म पावला त्याचा धम्म जगातील अनेक देशात पसरला मार्क्सवादाचा प्रणेता कार्ल मार्क्स याचा जन्म एकोणिसाव्या शतकात ५ मे १८१८ रोजी झाला मार्क्सवाद विविध देशात पसरला आणि एकतृतीयांश जगात आज मार्क्सवादी राजवट आहे ज्यांच्या विचाराचा जागतिक प्रभाव पडला असे हे २३८० वर्षांचे कालाचे अंतर असलेले दोन महान विचारवंत आहेत

## मानवाच्या दुःखाने तळमळले

गौतम बुद्ध मानवाच्या दुःखाने तळमळून दुःखाचे कारण आणि दुःख-नाशाचा उपाय शोधण्यास निघाला कार्ल मार्क्सही माणसाचे दुःख पाहूनच अस्वस्थ झाला दुःखाचे कारण आणि दुःखाचा उपाय शोधण्यास निघाला गौतम बुद्ध तसेच कार्ल मार्क्स या दोघांपैकी कुणीही स्वतःसाठी आणि स्वतःच्या सुखासाठी दुःख निर्मूलनाचा महान शोध सुरू केला नाही इतरांचे दुःख पाहून ते तळमळले आणि स्वतःचे सुखी जीवन सोडून मानवी समाजाच्या दुःख निर्मूलनाचा मार्ग शोधू लागले त्यांची प्रेरणा एकच होती आणि तुकाराम महाराजाच्या शब्दांत सांगायचे तर---

**बुडतां हे जन न देखवे डोळां। येतो कळवळा म्हणउनि।**
**उपकारासाठी बोलों हे उपाय । येणेंविण काय आम्हां चाड**

गौतम बुद्धाने आणि कार्ल मार्क्सने दु:ख परिहाराच्या त्या त्या वेळच्या सर्व विचारधाराचा मनःपूर्वक अभ्यास केला या विचारधारांनी त्यांना समाधान झाले नाही तेव्हा त्यानी स्वप्रयत्नानी नवी विचारधारा शोधून काढली व जगाला सांगितली

बुद्धाने प्रथम आलारकालाम ऋषींच्या आश्रमात जाऊन त्यांच्या मार्गाचा अभ्यास केला आलारकालाम म्हणजे कपिलमुनींच्या निरीश्वरवादी सांख्य तत्त्वज्ञानाचा आणि योगमार्गाचा आचार्य ! बुद्धाने सर्व सांख्य सिद्धांत आत्मसात केले त्याशिवाय योगमार्गातील सात पायऱ्या त्याने ओलांडल्या गौतमाने सर्व ज्ञान मिळविल्यावर कालाम ऋषी मोकळ्या मनाने म्हणाला, "तू आता माझ्या योग्यतेचा झालास" पण बुद्धाचे या मार्गाने समाधान झाले नाही. यानंतर गौतम बुद्ध उद्दक रामपुत्ताच्या आश्रमात गेला आणि योगमार्गाची आठवी पायरीही उद्दकाजवळून शिकला पण त्यानंतरही त्याचे समाधान झाले नाही मगध परिसरातील योग्याजवळही गौतम बुद्ध गेला आणि त्याच्या मार्गात पारंगत झाला अखेर भृगू ऋषीच्या तपश्चर्येच्या मार्गाचीही त्याने परीक्षा केली सहा वर्षे त्याने कमालीच्या हालअपेष्टा सोसून या तपश्चर्येचा अवलंब केला या सर्व मार्गांनीही त्याला दुःखनाशाचा उपाय सापडला नाही अखेर गयेजवळ एका पिंपळ वृक्षाखाली चार आठवडे तो ध्यानमग्न झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकर 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात म्हणतात—"नव्या प्रकाशाच्या प्राप्तीसाठी गौतम जेव्हा चिंतनास बसला तेव्हा सांख्य तत्त्वज्ञानाची पकड त्याच्या मनावर होती तथापि, दुःखाचे कारण व दुःखावरील उपाय या प्रश्नाची उत्तरे सांख्य मार्गात बुद्धाला सापडत नव्हती ती या चिंतनाच्या वेळी गौतमाला बिनचूक मिळाली या सम्यक् ज्ञानप्राप्तीने गौतमाचा बुद्ध झाला ! ज्या वृक्षाखाली चिंतन करताना बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाली त्या पिंपळ वृक्षाला 'बोधिवृक्ष' असे नाव मिळाले ! "

आता आपण कार्ल मार्क्सकडे वळू या ! गौतमाने प्रथम आलारकालाम ऋषींच्या सांख्य शास्त्राचा अभ्यास केला तसाच कार्ल मार्क्सने हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला हेगेल हा कार्ल मार्क्सचा आलारकाम ! १८१८ ते १८३१ या काळात हेगेल बर्लिन विद्यापीठात शिकवित होता हेगेलचे तत्त्वज्ञान "विरोधातून विकासाचे" (डायलेक्टिकल) होते मार्क्स हा 'यंग हेगेलियन्स' मोहिमेचा एक जबरदस्त समर्थक होता ईश्वरवादी प्रचलित धर्मावर हेगेलने जबरदस्त टीका केली होती सांख्य जसे निरीश्वरवादी तसेच हेगेल तत्त्वज्ञान निरीश्वरवादी होते काय विलक्षण मौज आहे पहा ! हेगेलच्या विरोधविकासवादाची तत्त्वे सांख्य तत्त्वज्ञानात आहेत असाही एक दावा आहेच ! हेगेलने स्वतःही म्हटले आहे की, तत्त्वज्ञानाचा सूर्य पूर्वेला

उगवला त्याच वेळी पयुअरबाख याची भौतिकवादी विचारसरणी "ख्रिस्ती तत्त्वज्ञानाचे सार" या त्याच्या ग्रथातून १८४१ साली सामोरी आली या विचारसरणीचाही मार्क्सवर परिणाम झाला बुद्धाने अन्य योग्याच्या आणि तपस्यांच्या मार्गांचा अभ्यास केला तसाच कार्ल मार्क्सने सेंट सायमन-फोरियर-ओवेन या विचारवतांचा समाजवाद, अॅडम स्मिथ-रिकार्डो याचे अर्थशास्त्र आणि कान्ट- सिसमॉण्डी-लिस्टर आदि अन्य विचारवतांचा अभ्यास केला पण यापैकी कुणाच्याही विचारसरणीने त्याचे पूर्ण समाधान झाले नाही तेव्हा त्याने दु ख-निवारणाचा स्वत चा मार्ग शोधून काढला

ज्या विचारवताचा या उभयतानी अभ्यास केला त्या विचारवतावद्दल त्याच्या मनात पूर्ण आदरभाव होता त्या त्या विचारधारेत काही प्रमाणात तथ्य आहे याची त्याना पूर्ण जाणीव झाली, पण या विचारधारानी त्याचे सपूर्ण समाधान झाले नाही म्हणून त्यानी खडतर अविरत ज्ञानसाधनेने नवा मार्ग शोधला

**म्हणून बुद्धाने आम्हाला शिकविले की, ( ७ ) विचारवतांचे जे जे चांगले ते ते घ्यावे, हिणकस ते टाकावे आणि पूर्णत्व आणावे. स्वतःच्या अनुभवाने व अभ्यासाने दुधाचे दही करावे, दह्याचे ताक बनवावे आणि ताक घुसळून लोणी लाभावे तशीच या महान् विचार-वंतांची प्रक्रिया आहे ! जो कुणी एकाच विचारवंताचे आणि त्याच्याच ग्रंथांचे पारायण करीत रहातो तो शब्दप्रामाण्य मानीत पोथीवादी होतो आणि जगाला पुढे नेण्याऐवजी कर्मठपणाने अडथळाच होतो !**

## गौतम बुद्ध आणि दुःख : तीन निकषांवर निष्कर्ष

गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स हे दु ख दूर करण्याच्या उत्कट प्रेरणेने मार्ग शोधीत होते दोघाच्याही मूळ प्रेरणेत जरी साम्य आहे तरी दु खाचा अर्थ व दुःखावरील उपाय याबाबत निश्चितच भिन्नपणा आहे मात्र उभय मार्गात विरोध काडीमात्र नाही बौद्ध शब्दावलीत सांगावयाचे तर 'नच सो नच अञ्ञो' एकच नाही पण परस्परविरोधी नाही

गौतम बुद्ध दुःख कशाला मानत होता ? याचे निर्विवाद उत्तर शास्त्र-शुद्ध मीमांसेच्या तीन कसोट्या लावून ठरवू या

(अ) कोणते दु ख पाहून गौतमाने आपला शोध सुरू केला ?

(ब) कोणते दुःख निवारण करण्याचा त्याने मार्ग सांगितला ?

(क) कोणता उपदेश केला ?

(अ) गौतम बुद्धाने एकदा पाटलीपुत्रात फेरफटका करीत असता एक दुःखी म्हातारा माणूस पाहिला केस पांढरे झालेला, दात नसलेला, डोळे खोल गेलेला आणि पाठ वाकलेला, कांपत कापत चाललेला हा म्हातारा माणूस होता नतर पुन फिरत असता त्याने एक रोगी पाहिला छन्नाने म्हणजे सारथ्याने सांगितले की, दोन दिवसापूर्वी हा माणूस सशक्त होता आता तो रोगामुळे विव्हळत आहे यानतर एकदा एका मृत माणसाला अत्यक्रियेसाठी नेताना त्याने पाहिले धर्मानद कोसाबी म्हणतात — (बुद्धलीला सारसग्रह– पृष्ठ ११४) "बुद्धाने अतर्मुख होऊन विचार केला की, या म्हातारपणाचा (जरेचा) विचार केला असता मनुष्याचा तारुण्यमद पार नष्ट होतो रोगाच्या (व्याधीच्या) विचाराने सामर्थ्याचा मद निघून जातो मृत्यूच्या विचाराने आयुष्यमद नाहीसा होतो हे तीनही मद नष्ट झाले असता या प्रपचात आम्हाला कसा उत्साह वाटेल? पाणी आटलेल्या डबक्यातील मासे जसे तडफडतात त्याप्रमाणे प्रपचातील माणसे तृष्णेने तडफडत आहेत तथापि, त्याचवेळी या तीन मदामुळे ते परस्पराशी भांडत आहेत! परस्परांचा मत्सर करीत आहेत! परस्परांना विरोध करीत आहेत!"

यावरून पहिल्या निकषावर दिसून येते की, जरा, व्याधि आणि मरण अशा निसर्गत अटळ दुःखामुळे गौतम व्यथित झाला आणि दुःखावर उपाय शोधण्यास निघाला तेव्हा दुःख कोणते ते स्पष्ट होते

(ब) आता दुसऱ्या कसोटीवर तपासणी करू या गौतम बुद्धाला बोधिवृक्षाखाली चिंतन करताना दुःखाचे कारण किंवा कारण परपरा सापडली ती कोणती? बुद्धाला असे ज्ञान झाले की,

"अविद्येपासून सस्कार होतात सस्कारांपासून विज्ञान, विज्ञानापासून नामरूप, नामरूपासून षडायतन (पचेंद्रिये आणि मन), षडायतनापासून स्पर्श, स्पर्शापासून सुखदुःखादिक वेदना, वेदनेपासून तृष्णा, तृष्णेपासून उपादान, उपादानापासून भव, भवापासून जन्म आणि जन्मापासून जरा, मरण, शोक, परिदेव, दुःख, दौर्मनस्य आणि उपायास उद्भवतात याप्रमाणे इहलोकीच्या दुःखाचा उगम होतो

"अविद्येचा पूर्ण वैराग्याने निरोध केला असता सस्काराचा निरोध होतो, सस्काराच्या निरोधाने विज्ञानाचा, विज्ञानाच्या निरोधाने नामरूपांचा, नामरूपाच्या निरोधाने षडायतनाचा, षडायतनाच्या निरोधाने स्पर्शाचा, स्पर्शाच्या निरोधाने वेदनेचा, वेदनेच्या निरोधाने तृष्णेचा, तृष्णेच्या निरोधाने उपादानाचा, उपादान निरोधाने भवाचा, भवाचे निरोधाने जन्माचा आणि जन्माच्या निरोधाने जरा, मरण, शोक, परिदेव, दुःख, दौर्मनस्य, उपायास यांचा निरोध होतो याप्रमाणे या ऐहिक दुःखांचा निरोध होत असतो"

अविद्येपासून जरामरणापर्यंत जी ही कार्यपरंपरा तिला बौद्ध ग्रंथामध्ये प्रतीत्यसमुत्पाद असे म्हणतात. तिलाच द्वादशनिदान म्हणतात.

यावरून असे स्पष्ट होते की, जन्म, जरा, व्याधि, मरण या मानवाला अटळ अशा दुःखाची कारणपरंपरा आणि त्यावर अष्टांग मार्गाचा उपाय यांचे ज्ञान बुद्धाला झाले. अशा प्रकारे बुद्धाला अभिप्रेत असलेले दुःख म्हणजे मानवाला भोगावे लागणारे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे अटळ दुःख याबाबत याही कसोटीवर तिळमात्र शंका उरत नाही.

## बुद्धाने केलेला उपदेश

(क) आता बुद्धाच्या उपदेशाला तिसरी कसोटी लावू या.

दुःखाची कारण परंपरा सांगणारे द्वादशनिदान ऊर्फ प्रतीत्यसमुत्पाद, चार आर्य सत्ये ज्याला चत्वारि आर्यसत्य म्हणतात आणि त्यातच समाविष्ट असलेला अष्टांग मार्ग (ज्याला मज्जिपाद म्हणजे दोन टोके टाळणारा मध्यम मार्ग असे बुद्ध म्हणतो) याचा समुच्चय म्हणजे बुद्ध धम्माचा पाया होय.

आपल्या भिक्षु संघात दाखल झालेल्या पहिल्या एक हजार भिक्षुंना बुद्ध म्हणाला, "भिक्षुहो! जगात सर्वच वस्तू प्रदीप्त झाल्या आहेत. कोणत्या सर्व वस्तू? पंचेंद्रिये आणि मन या वस्तू प्रदीप्त झाल्या आहेत. कशाने प्रदीप्त झाल्या? कामाग्नीने आणि मोहाग्नीने या वस्तू प्रदीप्त झाल्या आहेत! जरा, मरण, शोक, परिदेव, दुःख, दौर्मनस्य आणि उपायास यायोगे प्रदीप्त झाल्या आहेत. पण भिक्षुहो! जो हे यथार्थत पहातो, तो पंचेंद्रिये आणि मन यांच्याविषयी विरक्त होतो आणि जो सर्व इंद्रिये आणि त्यांचे विषय यांच्या ठायी विरक्त होतो, तोच मुक्त समजावा."

आणखी उदाहरण पहा. एके दिवशी कोसलचा राजा पसेनदी बुद्धाकडे आला. आपले राज्य चिरकाल टिकावे म्हणून मी प्रयत्न करीत आहे असे राजा पसेनदीने सांगितले. त्यावर बुद्ध म्हणाला, "महाराज, आपल्या शत्रूचा सर्व प्रकारे तू बंदोबस्त करीत आहेस हे ठीक आहे. परंतु समज, एखादा मनुष्य धावत येऊन तुला सांगेल का, महाराज, चारी दिशांकडून मोठमोठाले पर्वत तुझ्यावर चाल करून येत आहेत. त्यांनी सर्व प्राण्यांचा संहार चालविला आहे. अशा वेळी तू काय बरे करशील?"

राजा म्हणाला, "भदंत, अशा प्रसंगी माझ्या सैन्याचे काय चालणार आहे? त्यावेळी माझे पुण्याचरणच मला उपयोगी पडेल."

बुद्ध म्हणाला, "महाराज, जरा आणि मृत्यू त्या मोठाल्या पर्वतांपेक्षाही भयंकर आहेत! हत्ती, घोडे, रथ, पादाति इत्यादि सर्व सैन्याकडून जरा आणि मृत्यू यांचा पराजय होण्यासारखा नाही. ब्राम्हण किंवा चांडाळ

हा भेद जरा-मरण ठेवीत नाही म्हणून सुज्ञ मनुष्याने सावधानपणे सद्धर्माचे आचरण करावे सदाचरण करणाऱ्या मनुष्याची इहलोकी प्रशसा होते आणि मृत्यूनतर तो सद्गतीला जातो"

बुद्धाच्या शोधाचा प्रारभ, बुद्धाला लागलेला शोध आणि बुद्धाचा उपदेश या तीनही कसोटचावर निर्विवादपणे सिद्ध होते की, जीवनापासून मृत्यूपर्यंतच्या 'सर्व दु:ख' अशा जीवनमरण फेऱ्यातील दु:खाचा गौतमाने विचार केला या दु:खाचा शेवट ज्याचा त्यानेच करावयाचा असतो स्वत:मध्येच असलेल्या तृष्णेशी झगडावयाचे आहे सर्व काही अनित्य आहे आणि जे अनित्य ते दु:ख आहे हे बुद्धाचे मूलभूत सूत्र होते याउलट कार्ल मार्क्सने काय केले? माणसाने माणसावर उत्पादन साधनाच्या मालकीद्वारे शोषणातून लादलेले दु:ख जाणले आणि त्या दु:खावर त्याने सघर्षाचा मार्ग सागितला आर्थिक शोषण त्याने शास्त्रशुद्ध सिद्ध केले आणि शोषण सपविण्याचा मार्ग पुकारला

म्हणून बुद्धाने आम्हाला शिकविले की, (८) सर्व अनित्य असल्याने वृथा अहंकारी न होता स्वतःच्या ठायी असलेली तृष्णा नाहीशी केली पाहिजे किंवा कह्यात आणली पाहिजे. त्याने सद्वर्तनाचे नीतिशास्त्र सांगून स्वतःलाच सुधारण्यास सांगितले ! स्वतःच्या ठायीच असलेल्या दुःखाच्या कारणांचा निःपात करून स्वतःचे संपूर्णत्व संपादण्यास शिकविले. २४०० वर्षांनंतर कार्ल मार्क्सने गर्जना केली की, "तत्त्वज्ञानी विचारवंतांनी या जगाचा अर्थ विविध प्रकारे सांगितला. पण मूळ मुद्दा आहे जग बदलण्याचा !" दुःखाचे मूळ बुद्धाने स्वतः-मध्येच शोधले तर कार्ल मार्क्सने सभोवतालच्या शोषणाच्या आणि वर्गसंघर्षाच्या परिस्थितीत शोधले! गौतम बुद्ध म्हणाला की, "तृष्णा नाहीशी करू या." कार्ल मार्क्सने आवाज दिला की, "ज्या मानव-निर्मित परिस्थितीने मानवाला हीन दीन, गुलाम, निराधार आणि दरिद्री बनविले आहे ती परिस्थितीच उलथून टाकू या !"

: २३ :

# कार्ल मार्क्सची चार आर्यसत्ये

कार्ल मार्क्सने जगाला जे सांगितले ते गौतम बुद्धाच्या धम्माच्या शैलीत सांगावयाचे म्हणजे कार्ल मार्क्सची विचारसरणी चार आर्य सत्याच्या पद्धतीने मांडावयाची। तशी मांडणी करावयाची तर असे म्हणता येईल की,

(१) जगात शोषण सुरू असते उत्पादन साधनांची खाजगी मालकी जे मिळवितात ते कष्टकऱ्यांनी उत्पादित केलेले अतिरिक्त मूल्य (सरप्लस व्हॅल्यू) म्हणजेच जादा उत्पादन गिळकृत करून त्यांचे शोषण करतात मानवी श्रमातून निर्माण होणारे अतिरिक्त मूल्य–सरप्लस व्हॅल्यू—हे मार्क्सने सप्रमाण सिद्ध केलेले पहिले आर्य सत्य होय

(२) यामुळे उत्पादन साधनांची खाजगी मालकी मिळविलेला, पिळवणूक करणारा भांडवलदार वर्ग आणि त्या उत्पादन साधनावर राबणारा कामगारवर्ग असे दोन वर्ग निर्माण होतात शोषक भांडवलदाराचा वर्ग आणि शोषित कामगारवर्ग यांचे हितसंबंध परस्परविरोधी असून, आजवरचा ज्ञात असा मानवी इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, या परस्परविरोधी वर्गांच्या संघर्षाचा आणि संघर्षातून घडणाऱ्या विकासाचा इतिहास आहे। यालाच ऐतिहासिक भौतिकवाद (हिस्टॉरिकल मटेरिॲलिझम) म्हणतात भौतिकतेतून इतिहासाचा उलगडा करणारा हा सिद्धांत म्हणजे मार्क्सचे दुसरे आर्य सत्य होय.

(३) एका बाजूला भांडवलदाराची संख्या कमी होत जाते, कारण मोठा मासा लहान माशाला खातो या मात्स्य न्यायाने लहान मालक स्पर्धेत उखडले जाऊन कामगार बनतात. दुसरीकडे अर्थातच कामगारांची संख्या वाढत

जाते कारखान्याच्या एका छत्राखाली आलेला शोषित वर्ग भांडवलशाही-विरुद्ध लढ्यासाठी संघटित सिद्ध होतो म्हणजेच भांडवलशाहीच अशा कामगारवर्गाला जन्म देते की, जो वर्ग त्याला पिळणाऱ्या भांडवलशाहीची अखेर कबर बांधतो ! कामगारवर्गावर ही इतिहासाने सोपविलेली कामगिरी आहे आणि याची जाणीव त्याच्यात निर्माण केली पाहिजे म्हणून मार्क्स म्हणाला, "जगातील कामगारांनो, एक व्हा ! तुमच्याजवळ गमावण्यासारखे काय आहे? फक्त बेड्याच आहेत ज्या तुटतील ! ' भांडवलशाही, तिचे रक्षण करणारी उच्च वर्गीयांची राज्य सत्ता व तिचे समर्थन करणारे बुद्धिमंत या त्रिकुटाला उलथून टाका असा संदेश शोषित कामगारवर्गाला देणारे हे क्रांतिकारक सत्य म्हणजे मार्क्सचे तिसरे आर्य सत्य होय

(४) क्रांतीनंतर उत्पादन साधनांची सामाजिक मालकी प्रस्थापित होऊन परस्परविरोधी वर्गच नष्ट होतील, वर्गसंघर्ष संपुष्टात येईल आणि प्रथम समाजवाद व नंतर साम्यवाद निर्माण होईल समाजवादानंतर येणाऱ्या अंतिम साम्यवादात राज्यसत्ताही अनावश्यक होऊन विलयास जाईल, प्रत्येकजण आपल्या कुवतीनुसार उत्पादन करील आणि गरजेनुसार त्याला प्राप्ती होईल असा मुक्त मानव समाज सुखी व सुसंस्कृत होईल ! हे मार्क्सचे चौथे आर्य सत्य

कार्ल मार्क्स म्हणतो की, इतिहासाच्या विकासाचा हा क्रम आहे तो क्रमप्राप्त आहे शोषण करणाऱ्या भांडवलदारवर्गाला उलथून टाकणे हे महान कार्य शोषित वर्गावर इतिहासानेच सोपविले आहे आणि याची शोषित वर्गाला क्रांतिकारक जाणीव करून दिली पाहिजे

कार्ल मार्क्स एवढा अफाट विद्वान आणि विचारवंत, पण आश्चर्यचकित व्हावे इतका विनयी आहे इंग्रज विचारवंतांचे अर्थशास्त्र, फ्रेंचांचा समाजवाद आणि जर्मनांचे तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासातून मला सम्यक् मार्ग सांपडला असे मार्क्स सांगतो तो म्हणतो की, "समाजवाद्यांनी परस्परविरोधी वर्गांची निर्मिती आणि उत्पादन साधनांची मालकी समाजाची करून शोषण संपविण्याची आवश्यकता सांगितलीच होती भांडवलदारांचे हृदयपरिवर्तन करण्याचा भांडवलशाहीतच प्रत्यक्ष उदाहरणांनी सुधारणा करण्याचा मार्ग संदर युटोपियन सोशलिस्टांनी (स्वप्नाळू समाजवाद्यांनी) सांगितला, पण हा मार्ग म्हणजे मृगजळ आहे कारण कुणीही स्वतःच्या हितसंबंधावर स्वतःहून पाणी सोडत नसतो ! म्हणून प्रचंड संख्येतील कामगारवर्गाचे एकजुटीतील सामर्थ्य आणि इतिहासानेच त्याच्यावर सोपविलेली भांडवलशाही उलथून टाकून समाजवाद प्रस्थापित करण्याची कामगिरी याची जाणीव मी दिली इतकेच काय ते माझे आहे !"

पण हीच जाणीव म्हणजे वणवा पेटविणारी जाणीव होती ! 'भांडवल-

शाहीवर सोडलेले सर्वात जबरदस्त अस्त्र" असे आपल्या 'कॅपिटल' या ग्रंथात खुद्द कार्ल मार्क्सने वर्णन केले आहे

गौतम बुद्ध म्हणाला की, सर्व दुःख दुःख ! जन्मापासून मृत्यूपर्यंत दुःख असून या दुःखाला कारण आहे स्वतःमधील तृष्णा ! म्हणून स्वतःच स्वतःला सुधारून, ही तृष्णा नाहीशी करून जीवनमरणाचा फेरा संपविणाऱ्या निर्वाणाची म्हणजेच निब्बाणाची प्राप्ती करून घ्या !

ईश्वर आणि आत्मा फेटाळून बुद्धाने आपला धम्म सांगितला यामुळे ईश्वराच्या नावाने खपविलेले उच्च वर्णांचे जन्मजात श्रेष्ठत्व फेटाळून, आपला धम्म आणि भिक्खू संघ सर्व जातींना समान खुला केला यज्ञयाग आदि कर्मकांडाने ईश्वराला प्रसन्न करण्याच्या मार्गाचा धिक्कार केला अशाप्रकारे बुद्धाने सामाजिक सुधारणेचे महान पाऊल उचलले

बुद्धानंतर २३८० वर्षांनी जन्माला आलेल्या कार्ल मार्क्ससमोर या प्रदीर्घ कालावधीतील विज्ञानाचा पर्वतच उभा होता त्या पर्वतावर उभा राहून तो गरजला की, "आपण हे जगच बदलून टाकले पाहिजे मानवी इतिहासाने मानवावर सोपविलेली ही कामगिरी क्रांतिकारक मार्गाने पार पाडली पाहिजे"

**म्हणून बुद्धाने आम्हाला शिकविले की, (९) सर्वं दुःखं दुःखं । हे दुःख ज्याचे त्याने, ज्याच्या त्याच्या प्रयत्नाने, अष्टांग मार्गाने नाहीसे करून निब्बाण प्राप्त करून घ्यावे ! (१०) जन्मजात चातुर्वर्ण्य व श्रेष्ठत्व खरे नाही, ईश्वरी प्रसन्नतेसाठी यज्ञयागादि कर्मकांड खरे नाही. प्रत्येक मानवाला अष्टांग मार्ग खुला आहे. त्यासाठी स्वतःच प्रयत्न करा ! बुद्धाची मूर्ति ही ध्यानमग्न अंतर्मुख मूर्ती आहे !**

**कार्ल मार्क्सने सांगितले की, सर्वं संघर्षम् संघर्षम् । सर्व शोषितांनो, एक व्हा आणि भांडवलशाही उलथून टाकून संघर्षविरहित समतापूर्ण आणि संपन्न अशा निब्बाणाकडे अखिल मानवजातीला घेऊन चला ! मार्क्सची मूर्ती ही एका हातात शास्त्राची मशाल आणि दुसऱ्या हातात शोषण करणाऱ्या व्यवस्थेचे भस्म करण्याची क्रांतीची मशाल घेतलेली मूर्ती आहे ! ती अंतर्मुख नसून बहिर्मुख आहे !**

: २४ :

# बुद्ध धम्माचे परिवर्तन

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मूलभूत विचाराच्या क्षेत्रात गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स याचे जितके चिंतन केले तितके चिंतन अन्य कुणाही विचारवंताबाबत केले नाही एका जाहीर सभेत ते भारतीय कम्युनिस्टाना उद्देशून म्हणाले होते--"मी मार्क्सवादावर जितके ग्रंथ वाचले आहेत तितके भारतातील सर्व कम्युनिस्टांनी मिळून वाचले नसतील"

सोविएत रशियाचा कम्युनिस्ट राज्यकर्ता मार्शल जोसेफ स्टालीन हा ५ मार्च १९५३ रोजी मरण पावला स्टालीनच्या मृत्यूची बातमी ऐकताच डॉ आंबेडकर ढसढसा रडले यामुळे चकित झालेले सहकारी म्हणाले,

"बाबासाहेब, स्टालीन मरण पावला हे ऐकून तुम्ही रडता आहात? का नि कशासाठी?"

डॉ बाबासाहेबानी सांगितले की, "एका चर्मकाराचा मुलगा देशाचा प्रमुख झाला आणि देश घडवितानाच जागतिक इतिहासाचाही एक नेता झाला!—माझ्या देशात असे घडू शकत नाही म्हणून मी रडतो!"

सोविएत रशियाने शस्त्रबलावर पूर्व युरोपीय राष्ट्रांत आपला वरचष्मा निर्माण केला (आणि ही गोष्ट स्टालीनच्या नेतृत्वाखालीच घडली) याबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकर कडक टीका करीत असत तेच बाबासाहेब स्टालीनच्या मृत्यूनंतर रडले! डॉ बाबासाहेबांचे वाचन प्रचंड होते आणि स्टालीनने केलेल्या हत्याकांडाच्या सर्व भयकथा त्याना माहीत होत्या ते स्टालीन-विषयी सहानुभूतीने नव्हे तर असह्य जुलमापुढे असहाय झालेल्या आपल्या

समाजाबद्दलच्या उमाळयाने रडत होते अशाच असहाय समाजाचा स्टालीनने कायापालट घडविला, पण भारतात ते शक्य नव्हते !

१९५६ साली नेपाळमध्ये खाटमांडू येथे आंतरराष्ट्रीय बौद्ध संमेलन झाले याचेळी डॉ बाबासाहेब आबेडकर उपस्थित होते त्याचे "बुद्ध धम्म व मार्क्सवाद" या विषयावर भाषण झाले डॉ आंबेडकराची प्रकृती ठीक नव्हती पण काही प्रतिनिधींनी या विषयावर बोलण्याचा आग्रह केला भदत आनद कौसल्यायन त्या वेळी उपस्थित होते

भदत कौसल्यायन यांनी आपल्या पुस्तकात पुढील आठवण लिहिली आहे —"काही लोकांत या विषयाच्या मागणीमुळे बरीच खळबळ माजली त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते—आजच्या काळी मार्क्सवाद हा युगधर्म आहे जर तुम्ही या विषयाचा विचार करायलाही घाबरत असाल तर यापुढे तुम्हा लोकांच्या विहारात पचशील व दशशील ग्रहण करण्यासाठी थोडेसे म्हातारे व म्हाताऱ्या यांच्याशिवाय कुणीच येणार नाही"

डॉ बाबासाहेबाच्या त्याच संमेलनातील ऐतिहासिक भाषणातही (२० नव्हेंबर १९५६) या आठवणीला निर्णायक दुजोरा मिळतो डॉ बाबासाहेब म्हणाले, "(प्रकृती ठीक नसतानाही) मी येथे भाषण करण्यास मान्यता दिली खरी, पण या ठिकाणी आल्यावरच ही अनपेक्षित गोष्ट माझ्यावर सोपविण्यात आली तुम्हा लोकापुढे व्याख्यान द्यावे लागेल याची मला किंचितही पूर्व-सूचना नव्हती मी कोणत्या विषयावर बोलू इच्छितो याची मला विचारणा केल्यावर मी 'बौद्ध धर्मातील अहिंसा' हा विषय सांगितला होता परतु सर्व-साधारण मी ज्या विषयाचा ओझरता उल्लेख् केला होता त्या 'बुद्ध धम्म व मार्क्सवाद' या विषयावर मी बोलावे असे परिषदेला उपस्थित असलेल्या बहुसख्याक लोकाना वाटत असल्याचे मला सागण्यात आले" (पहा—पृष्ठ ३०—बुद्ध, मार्क्स व धम्माचे भवितव्य—अनुवाद रत्नमित्रा गणवीर—सुगत प्रकाशन, नागपूर १७) ज्याअर्थी डॉ बाबासाहेबांनी "बहुसख्यांक लोकांना वाटत असल्याचे" सांगितले त्या अर्थी संमेलनात या प्रस्तावाने खळबळ झाली आणि काही लोकाना या विषयावर व्याख्यान नको होते हे नक्की तेव्हा भदत कौसल्यायन यानी लिहिलेली आठवण सत्यच आहे

## डॉ. आंबेडकर आणि विज्ञान

याच भाषणात डॉ आबेडकर म्हणाले—"आपण हेही ध्यानात घेतले पाहिजे की, युरोपमधील बहुसख्य लोक व आशियातील बहुसख्याक तरुण असा दृष्टिकोन बाळगतात की, आजच्या जगात कार्ल मार्क्स हाच केवळ

एक पूजनीय महापुरुष किंवा प्रेषित आहे त्याचबरोबर ते असाही विचार प्रदर्शित करतात की, बौद्ध भिख्खू संघातील फार मोठा भाग केवळ निरुपयोगीच नव्हे तर एक मोठे पिवळे संकट आहे अशा प्रकारची विचारसरणी कशाचे द्योतक आहे हे भिख्खूनी लक्षात घेतले पाहिजे तिच्या मागची पार्श्वभूमी त्यांनी समजून घेतली पाहिजे आणि **कार्ल मार्क्सशी तुलना केली जाऊ शकेल अशा प्रकारे स्वतःला घडवून घेण्याची पराकाष्ठा करावयास पाहिजे तेव्हाच बौद्ध धर्माचे श्रेष्ठत्व शाबित केले जाऊ शकेल!** (पान ३१)

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जे बौद्ध नेत्यांना सांगितले तेच त्यांनी स्वत करून दाखविले! कार्ल मार्क्सशी तुलना केली जाऊ शकेल अशा प्रकारे त्यांनी बुद्ध धम्माची स्वतःच नवी मांडणी केली त्यासाठी त्यांनी कोणते तत्त्व अंगिकारले? त्यांच्याच शब्दांत पाहू या

१) धर्म हा विज्ञानाशी विसंवादी असून चालत नाही तो जर विज्ञानाशी विसंगत असेल तर तो लोकादरास पात्र ठरत नाही तो हास्यास्पद ठरून जीवनविषयक तत्त्वज्ञान रुजविण्यास असमर्थ ठरतो दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, धर्माला जर कार्यप्रवण व्हावयाचे असेल तर त्याचा संबंध कार्यकारणाशी म्हणजे विज्ञानाशी दृढतर असावयास पाहिजे ('महाबोधी' या कलकत्त्याच्या महाबोधी सोसायटीच्या मासिकातील मे १९५० मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूळ इंग्रजी लेख)

२) याच लेखात डॉ आंबेडकर यांनी म्हटले आहे-- "तथागत बुद्ध आनंदाला म्हणाला, 'बुद्धिप्रामाण्य आणि अनुभव हा माझ्या धम्माचा मूलभूत पाया आहे कालानुसार व परिस्थितीनुसार त्यात बदल करता येतो एवढेच नव्हे तर जी मते कालाशी अनुरुप नसतील व परिस्थितीशी सुसंगत नसतील ती मते टाकूनही देता येतात' बुद्धाचा हा उपदेश लक्षात घेता बौद्ध मतात परिवर्तन करण्यास पूर्णपण स्वातंत्र्य दिले आहे"

डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन मुद्यावर नेहमीच भर देत होते. किंबहुना "भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म" या पीपल्स एज्युकेशन सोसायटीने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत ग्रंथात डॉ आंबेडकरांनी आपल्या प्रस्तावनेत पारंपारिक बुद्ध धम्माच्या स्वरुपाबद्दल चार कूटप्रश्नसुद्धा विचारले आहेत त्याबद्दल ते म्हणतात--"वाचक माझ्या प्रश्नांनी विचार करण्यास प्रवृत्त होतील आणि हे प्रश्न सोडविण्यासाठी आपले म्हणणे मांडतील अशी मला आशा आहे!" ग्रंथाला अंतिम स्वरुप देण्यापूर्वी या ग्रंथाचा पहिला आराखडा त्यांनी मुद्दाम खर्च करून छापला होता "भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म" या पुस्तकाच्या प्रस्तावनेत माननीय घनःश्याम तळवटकर, म भि

चिटणीस व शां श रेगे म्हणतात---"पहिल्या आराखड्याच्या साठ प्रती डॉ बाबासाहेबानी छापून घेतल्या भारतातील व भारताबाहेरील बौद्ध पडितांना तसेच इतर विद्वानांना त्या पाठवून त्यांच्या अभिप्रायासाठी विनती केली, पण अपेक्षेप्रमाणे साधकबाधक उहापोह करणारी समीक्षणे आली नाहीत तेव्हा त्या आराखड्यात स्वतःच्या चिंतनाने काहीसा बदल करून त्यांनी ग्रथरचना पूर्ण केली!" '

बौद्ध धम्म स्वीकारण्याच्या आदल्या दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९५६ रोजी सायकाळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना सांगितले की, "भगवान बुद्धाने जी धम्मतत्त्वे उपदेशिली आहेत तीच मी पाळणार आहे हीनयान (मूळ स्वरूप) आणि महायान (सुधारित स्वरूप) या बौद्ध पथांमुळे जे मतभेद झाले आहेत त्यापासून मी माझ्या लोकांना अलिप्त ठेवणार आहे आपला बुद्ध धम्म म्हणजे एक प्रकारचा नव बौद्ध धर्म किंवा नव यान आहे!" (धनंजय कीरलिखित डॉ आंबेडकर चरित्र–पान ५१८)

म्हणून ( ११ ) "माझा धम्म अनुभवाच्या कसोटीवर तपासा" असे सांगणारा पहिला धम्म संस्थापक म्हणजे गौतम बुद्ध होय! त्यानुसार खरोखरीच विज्ञानाच्या कसोटीवर धम्म तपासून कालानुसार धम्मात परिवर्तन करणारे पहिले महान् विचारवंत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर! गेल्या तीनशे वर्षांत विज्ञान प्रचंड वाढले आहे–इतके की ज्ञानाचा स्फोटच सुरू आहे. या सहस्र सूर्यांच्या प्रकाशात प्रत्येक धर्माचीच फेरतपासणी झाली पाहिजे! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदू धर्महो विज्ञानाशी सुसंगत करावयाचा होता, पण पोथीबाद्यांच्या कर्मठपणामुळे ही सुवर्णसंधी गेली. जर अग्नीत काही जाळावयाचे असेल तर शब्दप्रामाण्यवाद, पोथीवाद जाळा हाच गौतमाचा आणि भीमाचा संदेश आहे!

: २५ :

# विज्ञानाची मशाल

एक सुप्रसिद्ध जैन वचन असे आहे—

**पक्षपातो न मे वीरे। न द्वेषः कपिलादिषु।**

**युक्तिमद्वचनं यस्य तस्य कार्यं परिग्रहः।।**

(मराठी भाषांतर—जैनांचे धर्मसंस्थापक असलेल्या महावीराबद्दल माझा पक्षपात नाही किंवा सांख्य शास्त्राचा कपिलमुनी यांच्याबद्दल द्वेष नाही कारण ज्या कुणाचे वचन योग्य वाटेल तेच मान्य करावयास हवे)

याच वृत्तीने नेहमी चर्चा केली असता, ताक घुसळल्यावर त्यातील अदृश्य लोणी दिसू लागते, त्याप्रमाणे सत्यार्थ प्रगट होऊ लागतो

डॉ बाबासाहेब आंबेडकर यानी लिहिलेला "बुद्ध आणि त्याचा धम्म" हा इंग्रजी ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाला त्या ग्रंथाने बौद्ध जगतात खळवळ उडवून दिली

कलकत्त्यातील 'महाबोधी' या मासिकाने डिसेंबर १९५९ मध्ये असे मत व्यक्त केले की, "हा ग्रंथ भयकर आहे बौद्ध धर्माचे हे शुद्ध विवरण नाही ते नवीन मत आहे खरे सांगायचे म्हणजे हा ग्रंथ, जे नवबौद्ध आपल्या मनात द्वेष नि आक्रमक वृत्ती बाळगतात व दाखवितात त्याचे विवरण आहे या ग्रंथातील बुद्धाचे शब्द कोणते याविषयी जागरुक रहाणे अधिक महत्त्वाचे काम आहे या ग्रंथाचे नांव 'बुद्ध आणि त्याचा धम्म' असे न ठेवता 'आंबेडकर आणि त्यांचा धम्म' असे ठेवावे कारण जो धर्मच नाही तो आंबेडकरांनी राजकीय आणि सामाजिक सुधारणेच्या हेतूने उपदेशिला आहे"

ब्रम्हदेशातील रंगूनच्या 'लाईट ऑफ धम्म' या मासिकाने जानेवारी १९५९ च्या अकात असा अभिप्राय दिला की, "हा ग्रंथ एका महापुरुषाने लिहिला आहे पण दुर्दैवाने तो ग्रंथ महान नाही आंबेडकरानी धम्माच्या मूळ सूत्रातसुद्धा ढवळाढवळ केली आहे जेव्हा जेव्हा बुद्ध धम्मातील मते त्यांना गैरसोयीची वाटली आहेत तेव्हा तेव्हा ती मते बौद्ध भिक्खूनी घुसडली आहेत असे म्हणून ग्रंथकर्त्याने त्यांचा धिक्कार केला आहे"

जर डॉ आंबेडकर ह्यात असते तर परपरागत बुद्ध धम्म मानणाऱ्यानी अशी टीका केली याचे त्यांना मुळीच नवल वाटले नसते त्याच्या 'बुद्ध आणि धम्म' या ग्रथाची त्यानीच लिहिलेली प्रस्तावना वाचताच, पूर्वापार बुद्ध धम्म मानणाऱ्याचे हात थरथरावेत यात नवल काहीच नाही प्रस्तावनेत डॉ आंबेडकरांनी म्हटले आहे—"अन्य कोणत्याही धर्म सस्थापकाच्या तुलनेत बुद्धाचे जीवनचरित्र आणि शिकवण सुसगतपणे मांडणे हे अशक्य नसले तरी फार बिकट काम आहे बुद्धाच्या शिकवणीबाबत ज्या समस्या आहेत त्याची बौद्ध धर्मीयानी निदान सर्वसाधारण चर्चा तरी करायला नको काय ?"

## त्या चार प्रश्नांतून नवयान

डॉ आंबेडकरानी चार समस्या मात्र विचारासाठी माडल्या आहेत त्याचा तिसरा प्रश्न असा आहे—"बुद्धाने आत्मा मानला नाही चार प्रश्नांच्या रुपात त्याने कर्म आणि पुनर्जन्म यांचा सिद्धात निश्चितपणे माडला असे सांगितले जाते पण जर आत्माच नाही तर पुनर्जन्म कसा शक्य आहे ? जर आत्माच नाही तर कर्म कसे असू शकेल ?"

त्याचा चौथा प्रश्न आहे—"बुद्धाच्या मते भिक्खूचे काय काय ? निर्दोष मानव निर्माण करणे हा उद्देश होता काय ? की लोकांच्या सेवेसाठी जीवन अर्पण करणारा, लोकाचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ निर्माण करण्याचा उद्देश होता ? ही फार महत्त्वाची समस्या आहे त्यावरच बुद्ध धम्माचे भवितव्य अवलबून आहे ! जर भिक्खू हा फक्त दोषरहित मानव (परफेक्ट मॅन) असेल तर बुद्ध धम्माच्या प्रसारासाठी त्याचा काही उपयोग नाही कारण तो निर्दोष असला तरी तो स्वत पुरता आहे ! उलटपक्षी तो समाजसेवक असेल तर तो बुद्ध धम्माचे आशास्थान ठरू शकेल !"

**डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात—" या प्रश्नाचा निर्णय धर्मविषयक तत्त्वज्ञानाच्या सुसंगतीच्या दृष्टीपेक्षा बुद्ध धम्माच्या भवितव्याच्या दृष्टीनेच लावला पाहिजे ! "**

गौतम बुद्धाला दु:खाचे मूळ शोधण्याची प्रेरणा झाली याची कथा अशी सांगतात की, जरा, व्याधि आणि मरण याच्या दर्शनाने वयाच्या २९ व्या वर्षी गौतमाने संसाराचा त्याग केला पण डॉ आंबेडकरांचा पहिला प्रश्न असा की, ही कथा विश्वासार्ह नाही व बुद्धीस पटत नाही मग स्वीकारणार कशी ?

डॉ आंबेडकरांचा दुसरा प्रश्न तर धरणीकंपासारखा आहे ते म्हणतात—"चार आर्य सत्यानी दुसरा प्रश्न निर्माण केला आहे जर जन्म म्हणजे दु:ख, मृत्यू म्हणजे दु:ख आणि पुनर्जन्म म्हणजे दु:ख, तर मग संपलेच सारे ! असे असेल तर या इहलोकात मानवाला सुख प्राप्तीसाठी धर्मही मदत करणार नाही आणि तत्त्वज्ञानही सहाय्य करणार नाही जे बौद्धेतर आहेत त्यांनी बुद्ध धम्म स्वीकारण्याच्या मार्गात हा फार मोठा अडथळा आहे या चार आर्य सत्यामुळे बुद्धाचा संदेश हा निराशेचा संदेश होतो तेव्हा चार आर्य सत्य हा मूळ धम्माचा भाग आहे की नंतर भिक्खूनी या चार आर्य सत्याचा धम्मात शिरकाव केला आहे ? "

डॉ आंबेडकरानी जे मूलभूत प्रश्न उपस्थित केले त्यांची त्यांनीच आपल्या ग्रंथात उत्तरेही दिली आहेत मी त्या उहापोहात जात नाही, कारण जो मुद्दा मांडावयाचा आहे त्याच्यासाठी असा उहापोह आवश्यक नाही

पण एक उल्लेख केलाच पाहिजे की, डॉ आंबेडकरानी या विविध प्रश्नाची जी बुद्धिवादी उत्तरे दिली ती बुद्ध धम्माच्या पारंपरिक ग्रंथात सांपडणार नाहीत त्यासाठी डॉ आंबेडकरांचाच ग्रंथ वाचला पाहिजे

उदाहरणार्थ, 'दु:ख' या बौद्ध धम्मातील शब्दाचा अर्थ सांगताना ते म्हणतात—"दु:खाचा मूळ अर्थ कपिल मुनीनी असा सांगितला की, दु:ख म्हणजे अशांति—क्षोभ ! "

(सांख्य शास्त्राचा जनक कपिल मुनी आणि अद्वैत सांगणारे शंकराचार्य यांच्या तत्त्वज्ञानाचे डॉ आंबेडकर गुणग्रहण करीत असत, पण कपिलमुनी व शंकराचार्य यांनी चातुर्वर्ण्य– जातीयता यांच्यावर प्रहार केले नाहीत हा त्यांचा मुख्य आक्षेप होता शंकराचार्य बुद्ध धर्मीयच होते असेही त्यांनी म्हटले होते हिंदू धर्मात सर्वात उदात्त विचार सांगितला गेला, पण प्रत्यक्ष आचार मात्र मानवाला पशुपेक्षाही वाईट वागणूक देणाऱ्या जुलमी जन्मजात जातीयतेचा होता असेही ते म्हणाले होते हिंदू धर्माचा त्याग न करण्यासाठी "दहा वर्षांत जातीयता समूळ नष्ट करा" अशी अट त्यांनी सांगितली होती )

डॉ आंबेडकर पुढे म्हणतात की, "प्रारंभी दु:खाचा अशांति व क्षोभ असा अध्यात्मिक अर्थ होता नंतर त्याला वेदना व दु:ख असा अर्थ प्राप्त झाला हे दोनही अर्थ फार भिन्न नव्हते अशांतीने यातना व दु:ख होते

पण लवकरच दु:ख याचा अर्थ सामाजिक व आर्थिक कारणामुळे दु:ख व यातना असा झाला भगवान बुद्धाच्या एका प्रवचनावरून १९१८ होते की दारिद्रय हे दु:खाचे कारण आहे याची तथागताला जाणीव होती" (पृष्ठ ३६९–इंग्रजी ग्रंथ)

## बुद्ध धम्म नि मार्क्सवाद : पाया समान

'बुद्ध आणि मार्क्स' या व्याख्यानात डॉ आंबेडकर म्हणाले की, "दु:ख म्हणजे शोषण, पिळवणूक या अर्थानेही बुद्धाने दु:ख हा शब्द वापरला आहे तसेच बुद्ध भिख्खूने कोणतीही खाजगी मालमत्ता बाळगता कामा नये असा बुद्ध धम्माचा दंडक आहे यामुळे बुद्ध धम्माचा आणि मार्क्सवादाचा मूलभूत पाया समानच आहे" पारंपारिक बुद्ध धम्मीयांना असे म्हणणे मंजूर होणार नाही अर्थातच मार्क्सवाद व बुद्ध धम्म याचा पाया समान होईल अशा प्रकारे पारंपारिक बुद्ध धम्माचे परिवर्तन डॉ आंबेडकरांनी केले असे म्हणावे लागते

बुद्ध वचनाचा अर्थ कसा लावावा ? कोणते वचन बुद्धाचे आणि कोणते वचन बौद्ध भिख्खूंनी घुसडलेले असे मानावे ? डॉ आंबेडकर 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथात सांगतात—" यासाठी त्रिपिटकात जे बुद्धवचन म्हणून मानले गेले आहे ते बुद्धवचन आहे असे मानताना फार सावधगिरी राखली पाहिजे" (इंग्रजी ग्रंथ–पान २५४ आणि मराठी ग्रंथ पान २७८)

या बाबतीत निर्णय कसा करावा ? डॉ आंबेडकर म्हणतात—"तथापि असा निर्णय करण्यासाठी निकष अथवा कसोटी उपलब्ध आहे संपूर्ण निश्चितीने असे म्हणता येते की, १) भगवान बुद्ध म्हणजे साक्षात बुद्धीप्रामाण्य आणि तर्कसुसंगती म्हणून जेथे अन्य काही कारण नाही तेथे जे बुद्धीला आणि तर्कशास्त्राला धरून आहे ते बुद्ध-वचन आहे असे जाणावे २) मानवाच्या कल्याणाला उपकारक नाही अशी चर्चा बुद्धाने कधीच केली नाही म्हणून मानवी कल्याणाला पोषक नसलेली जी वचने बुद्धाशी जोडली जातात ती बुद्धाची आहेत असे मानता येत नाही ३) ज्या विषयी बुद्धाला पूर्ण खात्री होती त्या विषयी त्याने निर्णायक व निश्चित विचार व्यक्त केले आहेत अन्य विषयावर त्याने विचार व्यक्त केले, पण ते फक्त प्रायोगिक अर्थात तूर्त व तात्पुरते (टेन्टेटीव्ह) आहेत

बुद्ध धम्म स्वीकारताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "बुद्ध धम्म स्वीकारून मी देशाचे जास्तीत जास्त हित साधत आहे कारण बुद्ध धम्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे या देशाची संस्कृती, इतिहास याच्या परंपरेला धक्का लागणार नाही अशी मी खबरदारी घेतली आहे" (पान ५१८–धनंजय कीरलिखित चरित्र).

त्याच वेळी त्यांनी असा धम्म स्वीकारला की, जो भारतीय आहे, भारताला हितकारक आहे, जो परिवर्तनशील आहे, ज्याची चर्चा स्वागतार्ह आहे आणि ज्याच्यासाठी बुद्धिवादाची, तर्कशास्त्राची, आधुनिक ज्ञानाची आणि अनुभवाची कसोटी लावता येते.

डॉ आंबेडकर यानी १९३३ सालीच सांगून टाकले होते की, "मी हिंदू धर्माचा त्याग करीन हे नक्की आणि इस्लामचा स्वीकार करणार नाही हेही नक्की ! " कारण इस्लाम धर्मात परिवर्तनशीलता नाही त्यात अखेरचा शब्द आहे ज्यात अक्षराने बदल करता येत नाही असा धर्मग्रंथ म्हणजेच शब्दप्रामाण्यवाद आहे

## शब्दप्रामाण्याविरुद्ध बंडखोरी

आपण मुळात जाऊन विचार केला तर अस्पृश्यतेच्या अनाचाराचे आणि विविध जुलमाचे कारण 'शब्दप्रामाण्य' हेच आहे ! अमुक असे का ? तर धर्मग्रंथात सांगितले आहे म्हणून आणि धर्मग्रंथात सांगितले ते अंतिम का ? तर ते ईश्वराचे म्हणणे आहे म्हणून ! डॉ बाबासाहेबानी शब्दप्रामाण्या-विरुद्ध युद्ध पुकारले होते म्हणून त्यानी परमेश्वराच्या अंतिम प्रेषिताचे अंतिम ज्ञान असलेला इस्लाम नाकारला परमेश्वराच्या पुत्राचे अंतिम सत्य म्हणजे ख्रिस्ती धर्म नाकारला त्यांनी मानवाच्या पुत्राने सांगितलेला बुद्ध धम्म स्वीकारला गौतम बुद्ध ईश्वराशी काहीही संबंध सांगत नाही तो मानवाचा पुत्र होता आणि मानवाचा पुत्र अंतिम ज्ञान सांगत नाही बुद्धाने सांगितले ते अंतिम नव्हे असे खुद्द त्यानेही सांगितले

## १८४८ चा महिमा

हिंदू धर्मातील शब्दप्रामाण्यानेही प्रचंड अन्याय माजविला तथापि, महात्मा फुले यांच्यापासून डॉ आंबेडकरापर्यंत क्रांतिकारक सुधारकानी शब्दप्रामाण्या-वर घावामागून घाव घातले १८४८ साल इतिहासात फार महत्त्वाचे आहे त्याच वर्षी महात्मा फुले यानी पुण्यात अस्पृश्यासाठी शाळा सुरू केली लोक-हितवादी म्हणजे गोपाळराव देशमुख यांची शतपत्रे 'प्रभाकरा'त प्रसिद्ध झाली युरोपात कार्ल मार्क्सच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'चा पुकारा झाला त्याने जगाला हादरा दिला 'तुका झालासे कळस' या चालीवर असे म्हणता येईल की, महात्मा फुले यानी पाया रचला न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे-महर्षि विठ्ठल रामजी शिंदे-छत्रपती शाहू महाराज-गोपाळ गणेश आगरकर-कर्म-वीर भाऊराव पाटील-महर्षि कर्वे आदि अनेकानी विस्तार केला आणि डॉ बाबासाहेबांनी कळस बांधला ! असा श्रेष्ठ समाजसुधारकाचा तारकापुंज

सोडाच, पण या तोडीचा एक तरी क्रांतिकारक सुधारक भारतात अन्य धर्मांत दाखविता येतो का? आजारपणाची पर्वा न करता रात्रदिवस पराकाष्ठा करून आणि हिंदू धर्मग्रंथांचा अफाट अभ्यास करीत डॉ बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल तयार केले ते जसेच्या तसे समत झाले असते तर वेगळा इतिहास घडला असता याउलट इस्लाममध्ये सुधारणा करण्यास डॉ बाबासाहेब गेले नाहीतच, पण 'थॉटस ऑन पाकिस्तान'मधील इस्लामवरील कडवी टीका मित्राच्या आग्रहास्तव त्यानी काढून टाकली! असा प्रकार अन्य धर्माबाबत घडला नाही!

याचा आणखी पुरावा म्हणजे डॉ आंबेडकराचे मत पहा--

"मुसलमानाच्या मनावर लोकशाहीचा प्रभाव पडत नाही मुसलमानांना जर कशाविषयी प्रबळ आस्था वाटत असेल तर ती धर्माविषयी त्यांचे राजकारण हे मुख्यत धर्मनिष्ठ असते मुसलमान समाज सुधारणेचा विरोधक आहे आणि सर्व जगभर तो प्रतिगामी वृत्तीनेच वागत आहे तसेच त्याला मुसलमान धर्म हा जागतिक धर्म वाटतो तो सर्व मनुष्यमात्रास सर्व काळात, सर्व परिस्थितीत उपयुक्त आहे असे त्यांना वाटते पण इस्लामचे बंधुत्व हे सर्वव्यापक नाही सार्वत्रिक नाही ते बंधुत्व मुसलमान समाजाच्या अनुयायापुरतेच मर्यादित असते मुसलमानेतरांविषयी त्यात तिरस्कार आणि शत्रुत्व असते" (कीरलिखित चरित्र--पान ३४४)

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे धर्म-सुधारक होते त्यानीच एकदा 'प्रॉटेस्टंट हिंदू' असा शब्दप्रयोग सुचविला होता हिंदू धर्मातील अशास्त्रीय जुलमावर त्यानी तोफा डागल्या आणि भरीव सुधारणा निश्चित झाली बुद्ध धम्माचा त्यांनी स्वीकार केला आणि बुद्धिवादी, तर्कशुद्ध, आधुनिक ज्ञानाशी सुसंगत अशी बुद्ध धम्माची नवीन अपूर्व मांडणी त्यानी अफाट परिश्रमपूर्वक केली

**म्हणून महान विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती आम्हाला अशीही दिसते की, त्यांच्या एका हातात विज्ञानाची मशाल आहे आणि त्या प्रकाशात दुसऱ्या हातातील धर्मग्रंथांची नि आधुनिक ग्रंथांची ते तपासणी करीत आहेत. धर्मातील अन्यायाने त्यांच्यावर जो जुलूम केला आहे त्याचे विष त्यांनी कंठात धारण केले आहे आणि मुखाने जयघोष करीत आहेत की, मी बुद्धीला शरण जातो, संघाला शरण जातो, परिवर्तनीय धम्माला शरण जातो!**

कुणाचेही शब्दप्रमाण्य झुगारून देऊन त्या त्या देशातील वास्तवाशी सुसंगत अशी बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणी हाच 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'चा पाया आहे. ही देणगी बुद्धापासून डॉ. आंबेडकरांपर्यंतच्या विचारवंतांची आहे.

[ समाप्त ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्र...)
REFBK-0024659